बुलढाणा । रविवार । २३ नोव्हेंबर २०२५ । वर्ष-३ । अंक-१०२ । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. RNI : MAHMAR/2023/89148 DAINIK MAHABHOOMI बुलढाणा । छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम

ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर सनसनाटी विजय



क्रीडा

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, निःपक्ष

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com




## न्यूज ब्रीफ

### अजित पवारांच्या ताफ्यातील वाहनाला अपघात

**बीड :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या ताफ्यातील अग्निशमन दलाच्या गाडीने शनिवारी बीड जिल्ह्यात मोटारसायकलला धडक दिल्याने एक जोडपे आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुली जखमी झाल्या आहेत. ही घटना धारूर तहसीलमधील तेलगाव-धारूर रोडवर सकाळी ११.३० वाजता घडली. उपमुख्यमंत्री पवार परभणीहून धारूरकडे जात असताना त्यांच्या ताफ्यातील अग्निशमन दलाच्या गाडीने त्या जोडप्यासह त्यांच्या दोन मुली जात असलेल्या मोटारसायकलला धडक दिली. विष्णू सुडे, त्यांची पत्नी कुसुम आणि त्यांच्या तीन आणि सात वर्षांच्या दोन मुली जखमी झाल्या.

### दोन अल्पवयीन दहशतवाद विरोधी पथकाच्या ताब्यात

**रायपूर :** छत्तीसगडमधील दहशतवादविरोधी पथकाने (एटएस) रायपूर आणि भिलाई येथून दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. दहावी आणि अकरावीत शिकणारे हे दोन्ही उच्च माध्यमिक विद्यार्थी दहशतवादी संघटना आयएसआयएस हँडलर्सच्या थेट संपर्कात होते. त्यांना ऑनलाइन माध्यमातून कट्टरपंथी सामग्रीद्वारे पद्धतशीरपणे भडकावले जात होते. दोन्ही अल्पवयीन शस्त्रे उचलण्यास तयार होते आणि त्यांनी हँडलर्सना 'ऑपरेशन सिंदूर' संबंधित नकाशाची एक क्लिपिंग (नमुना) पाठवली होती.

### उद्धव ठाकरेंचा भाजपला धक्का

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी डोंबिवलीत भाजपला धक्का दिला. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे निकटवर्तीय असलेल्या योगेंद्र भोईर यांना आपल्या पक्षात प्रवेश दिला आहे. योगेंद्र भोईर हे डोंबिवलीतील भाजप युवा मोर्चाचे उपाध्यक्ष होते. योगेंद्र यांनी शनिवारी पत्नी ट्विंकल भोईर यांच्यासह मातोश्री येथे शिवसेना उद्धव ठाकरे पक्षात प्रवेश केला.

## पंतप्रधान मोदींनी जी-२० परिषदेत मांडले महत्त्वाचे प्रस्ताव

# कौशल्य विकास ते अंमली पदार्थ-दहशतवादाविरुद्ध लढा

**जोहान्सबर्ग, वृत्तसंस्था :**

अंमली पदार्थ (ड्रग्ज) तस्करी, विशेषतः फेंटानिल सारख्या धोकादायक पदार्थांच्या प्रसाराचा सामना करण्यासाठी भारताने अंमली पदार्थ-दहशतवाद संबंधाचा सामना करण्यासाठी जी-२० इनिशिएटिव्हचा प्रस्ताव मांडला आहे. या धोकादायक अंमली पदार्थ-दहशतवाद संबंध कमकुवत करण्यासाठी आपण एकत्र काम करूया, असे आवाहन जी-२० शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

पंतप्रधान मोदींनी जी-२० शिखर परिषदेबाबत सोशल मीडियावर अनेक पोस्ट केल्या आहेत. त्यांनी लिहिले आहे की, मी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे झालेल्या जी २० शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात भाग घेतला. हे सत्र सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासावर केंद्रित होते. आफ्रिका प्रथमच जी २० शिखर परिषदेचे आयोजन करत



आहे. पंतप्रधान मोदींनी म्हटले आहे की, सर्वसमावेशक विकासाचे स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी मी काही ठोस सूचना मांडल्या आहेत. प्रथम, जी २० जागतिक पारंपारिक ज्ञान भांडार तयार करण्याचा प्रस्ताव. भारतात पारंपारिक ज्ञानाचा प्रचंड खजिना आहे. हा उपक्रम आपल्या सामूहिक ज्ञानाला भावी पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यास आणि चांगल्या आरोग्यासाठी आणि जीवनशैलीसाठी मार्ग मोकळा करण्यास मदत करेल. आफ्रिकेची प्रगती जगाची प्रगती आहे. भारत नेहमीच आफ्रिकेसोबत उभा राहिला आहे.

### पंतप्रधान मोदींनी मांडले तीन प्रमुख प्रस्ताव

- जगभरातील पारंपरिक ज्ञान प्रणालींना एकत्र आणण्याचा. त्यांना सुरक्षित, सुरक्षित आणि वापरण्यायोग्य बनवण्याचा प्रयत्न करणे.
- युवा कौशल्य विकासाला गती देऊन आफ्रिकेत नवीन रोजगार आणि नवोपक्रमाच्या संधी निर्माण करणे.
- अंमली पदार्थ-दहशतवादाविरुद्ध एक संयुक्त जागतिक प्रयत्न. हा उपक्रम दहशतवादाचे आर्थिक स्रोत कमकुवत करेल.

### एकत्रितपणे संकटांना सामोरे जावूया

- भारताने जी२० ग्लोबल हेल्थ रिस्पॉन्स टीम तयार करण्याचेही सुचवले आहे. एकत्रितपणेच आपण आरोग्य संकटे आणि नैसर्गिक आपत्तींना सर्वोत्तम प्रतिसाद देऊ शकतो. जी२० देशांमधील प्रशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांच्या टीम तयार असाव्यात, जे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत त्वरित तैनात करण्यासाठी तयार असतील.

### नवीन मानके निश्चित करण्याचे आवाहन

- आफ्रिकेत झालेल्या जी२० शिखर परिषदेत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जागतिक विकासाच्या प्रतिमानांचा पुनर्विचार करण्याची गरज यावर भर दिला. जी २० ने जागतिक अर्थव्यवस्थांना आकार दिला आहे, परंतु सध्याच्या विकास मॉडेलने मोठ्या लोकसंख्येला संसाधनांपासून दूर ठेवले आहे आणि निसर्गाच्या अतिरेकी वापराला प्रोत्साहन दिले आहे.
- आता आपल्या विकासाच्या प्रतिमानांवर पुनर्विचार करण्याची आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारा, समतोल राखणारा विकास निवडण्याची योग्य वेळ आहे. भारताचे प्राचीन विचार विशेषतः समग्र मानवतावादाचे तत्व, आपल्याला पुढे जाण्याचा मार्ग दाखवतात.

# आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश!

## ड्रोनद्वारे शस्त्रास्त्र तस्करी : चार जणांना अटक

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानचा आणखी एक मोठा कट उधळून लावला आहे. गुन्हे शाखेने पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंधित एका मोठ्या आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश केला असून, पाकिस्तानातून भारतात पाठवण्यात आलेला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा मोठा साठा जप्त केला आहे.

पाकिस्तानमधून अत्याधुनिक शस्त्रे ड्रोनद्वारे पंजाबमध्ये पाठवण्यात आली होती. कुख्यात गुंडांना शस्त्रे पुरवणाऱ्या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानातून दिल्ली एनसीआरमध्ये पाठवण्यात आलेल्या शस्त्रास्त्रांचा हा साठा लॉरेन्स बिश्नोई, बंबीहा, गोगी हिमांशू भाऊ टोळीला पुरवण्यात येणार होता. ही शस्त्रे लॉरेन्स बिश्नोई, बंबीहा, गोगी आणि हिमांशू भाऊ टोळ्यांना पुरवली जाणार होती, असेही पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. आरोपींकडून १० महागड्या परदेशी पिस्तूल आणि ९२ जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. ही



### शस्त्रसाठा पुरविण्याचे नेटवर्क आयएसआयशी संबंधित

- हे संपूर्ण नेटवर्क पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंधित व्यक्तींच्या इशाऱ्यावर कार्यरत होते. शस्त्रे प्रथम पाकिस्तानात नेली जात होती, नंतर भारतात तस्करी केली जात होती. या व्यक्तींनी आतापर्यंत भारतात किती शस्त्रे विकली आहेत आणि कोणत्या टोळ्यांना किंवा व्यक्तींना ही शस्त्रे मिळाली आहेत, याचा तपास पोलिस आता करत आहेत. तपास यंत्रणा उर्वरित टोळी सदस्यांचा आणि मोबाईल फोन, बँक तपशील आणि सोशल मीडिया वापरून त्यांच्या लिंक्सचा देखील तपास करत आहेत.

शस्त्रे दिल्ली आणि आसपासच्या राज्यांमधील गुन्हेगारांना आणि गुंडांना पुरवली जात होती.

# भारत-पाक संघर्षाचा चीनने घेतला फायदा!

## अमेरिकेच्या अहवालात धक्कादायक माहिती उघड

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

एप्रिल महिन्यात पहलगामचा हल्ला झाल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सशस्त्र संघर्ष पेटला होता. अण्वस्त्र शक्ती असलेल्या दोन देशातील संघर्ष अधिक पेटू नये, असा प्रयत्न जगातील काही देश करत होते. मात्र आपल्या शेजारी असलेल्या चीनने मात्र या संघर्षात स्वतःचा फायदा करून घेतला. चीनने त्यांच्या शस्त्राची चाचणी घेण्यासाठी या संघर्षाचा लाभ घेतला. त्यांची शस्त्र किती परिणामकारक आहेत आणि त्यांना जागतिक पातळीवर कशी प्रसिद्धी मिळेल, याचा प्रयत्न चीनने केला. अमेरिका-चीन आर्थिक आणि सुरक्षा पुनरावलोकन आयोगाने सादर केलेल्या या अहवालानुसार, भारत-पाकिस्तान यांच्यात चार दिवस चाललेल्या संघर्षात चीनने त्यांच्या हत्यारांची चाचणी केली.

### पाकिस्तानला शस्त्र विकण्याचा प्रस्ताव

- ऑपरेशन सिंदूर नंतर जून २०२५ मध्ये चीनने पाकिस्तानला जे-३५ ही पाचव्या जनरेशनची लढाऊ विमाने, केजे-५०० विमाने आणि बॅलेस्टिक क्षेपणास्त्र संरक्षण प्रणाली विकण्याचा प्रस्ताव दिला होता, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूर नंतर चीनने अनेक दूतावासांशी संपर्क साधून या आधुनिक हत्यारांचे यशस्वी परिक्षण झाल्याचे सांगितले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे शस्त्रास्त्र विकण्याचा प्रयत्न केला. अहवालातील माहितीनुसार, चीनला आपली शस्त्रे विकण्यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर खरेदीदार हवे होते.

# मुझम्मिलने पाच लाख रुपयांना खरेदी केली एके-४७

## धक्कादायक खुलासे : डीप फ्रीजरमध्ये ठेवली स्फोटके

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या आत्मघाती कार स्फोटाच्या तपासात गुप्तचर संस्थांनी अनेक धक्कादायक खुलासे केले आहेत. फरिदाबादमध्ये अटक करण्यात आलेल्या मुझम्मिलकडून २,५०० किलो अमोनियम नायट्रेट जप्त करण्यात आले आहे. त्याने यापूर्वी ५ लाख रुपयांपेक्षा जास्त किमतीची -४७ खरेदी केली होती, ही नंतर आरोपी आदिलच्या लॉकरमधून जप्त करण्यात आली. एका वरिष्ठ गुप्तचर अधिकाऱ्याच्या मते, ही खरेदी या मॉड्यूलची तयारी आणि आर्थिक क्षमता असल्याचे दिसत आहे.या

हल्ल्याचा संबंध एका मोठ्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी मॉड्यूलशी, बहुस्तरीय हँडलर साखळीशी आणि एकाच वेळी अनेक ठिकाणी हल्ला करण्याच्या कटाशी असल्याचे पुरावे तपासात उघड झाले आहेत. हे नेटवर्क आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत होते. दहशतवादी उमर नबीने चालवलेल्या स्फोटकांनी भरलेल्या कारने झालेल्या स्फोटात किमान १५ जण ठार झाले आणि अनेक जण जखमी झाले. उमर नबी जागीच ठार झाला. एनआयएने या मॉड्यूलमधील चार प्रमुख आरोपींना अटक केली आहे. डॉ. मुझम्मिल शकील गनई (पुलवामा, जम्मू आणि काश्मीर), डॉ. आदिल अहमद राथेर (अनंतनाग, जम्मू आणि काश्मीर), डॉ. शाहीन सईद (लखनौ, उत्तर प्रदेश) आणि मुफ्ती इरफान अहमद (शोपियां, जम्मू आणि काश्मीर).

### प्रत्येक सदस्याला वेगळ्या हँडलरकडून मार्गदर्शन

- मॉड्यूलमधील प्रत्येक सदस्याला एका वेगळ्या हँडलरकडून मार्गदर्शन केले जात होते. मुझम्मिलचा एक वेगळा हँडलर होता, तर कार बॉम्बस्फोटाचा सूत्रधार उमर दुसऱ्या हँडलरला रिपोर्ट करत होता. मन्सूर आणि हाशिम या दोन प्रमुख हँडलरच्या वर एक वरिष्ठ पर्यवेक्षक बसला होता हे संपूर्ण मॉड्यूल नियंत्रित करत होता. ही रचना पाकिस्तान-अफगाणिस्तान-आधारित दहशतवादी नेटवर्कच्या शैलीसारखी दिसते.

# देवदर्शनासाठी निघालेल्या वाहनाचा अपघात; पाच ठार, आठ जखमी

**धाराशिव :** सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर आंदुरजवळ क्रुझर गाडीचे टायर फुटल्यामुळे भीषण अपघात झाला असून या अपघातात पाच जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातातील मृतांमध्ये तीन महिलांचा समावेश आहे. या अपघातात सात ते आठ जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी सोलापूरला पाठवण्यात आले आहे. अपघातातील सर्व प्रवासी दक्षिण उळे, सोलापूर येथील



होते आणि ते सोलापूरहून नळदुर्ग येथे देवदर्शनासाठी जात होते. क्रुझरचे टायर फुटल्याने गाडी पलटी झाली आणि पलटी झालेल्या क्रुझरची ट्रॅक्टरला धडक बसली. हा अपघात सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गावर आंदुर गावाजवळ झाला.

# शरद पवारांचे ठाकरेंशी युतीचे संकेत; काँग्रेससोबत जाण्यास नकार

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्षाने आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना (उबाठा) प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्याशी युती करण्याचे संकेत दिले आहेत. मुंबईत शरद पवारांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेसची महत्त्वाची बैठक पार पडली.

युतीसाठी शिवसेना (उबाठा) शी चर्चा करण्याचा एकमताने घेण्यात निर्णय आला. भाजप सोडून इतरांसोबत युती करण्यास हरकत नाही. समाजवादी पक्ष किंवा मनसे



सोबतदेखील युती करण्यास हरकत नसल्याची भूमिका या बैठकीत घेण्यात आली आहे.

दरम्यान, महानगरपालिकेसाठी मनसेला सोबत घ्यायचे की नाही, याबाबत काँग्रेसमध्ये मतभेद दिसत आहेत. शरद पवार यांनी आपण आघाडीत लढलो पाहिजे ही भूमिका मांडल्याचे काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी म्हटले होते. भाजपला हरवण्यासाठी सर्वांनी एकत्रित आले पाहिजे अशी आमची ही भूमिका आहे. आम्ही त्यासंदर्भात सकारात्मक असल्याचे असे सांगत विजय वडेट्टीवार यांनी मनसेसोबत एकत्र येण्याच्या पर्यायाचे संकेत दिले होते.

### 'शिवसेना-मनसे आधीच एकत्र'

- दिल्लीतून आदेश आल्याशिवाय मनसेला आघाडीत घेणार नाही, हा काँग्रेसचा व्यक्तिगत निर्णय असू शकतो. शिवसेना आणि मनसे आधीच एकत्र आले आहेत, ही लोकेच्छा आहे. त्यासाठी कुणाच्या आदेश किंवा परवानगीची गरज नाही. शरद पवार आणि डावे पक्ष सुद्धा एकत्र आहेत, मुंबई वाचवण्यासाठी आम्ही एकत्र लढणार असल्याचे ठाकरेंचे खासदार संजय राऊत यांनी स्पष्ट केले आहे.

# तिरुपती मंदिरात २० कोटी लाडूंसाठी वापरले भेसळयुक्त तूप

**चेन्नई, वृत्तसंस्था :**

तिरुपती मंदिरात भेसळयुक्त तूप वापरून अंदाजे २० कोटी लाडू तयार करण्यात आले होते. २०१९-२०२४ दरम्यान वाटण्यात आलेल्या एकूण ४८.७६ कोटी लाडूंपैकी हे लाडू होते, अशी माहिती श्री वेंकटेश्वर मंदिराचे व्यवस्थापन करणाऱ्या तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष बीआर नायडू यांनी दिली आहे.

ही आकडेवारी २०१९ ते २०२४ दरम्यान वाटण्यात आलेल्या प्रसादाच्या एकूण ४८७.६ दशलक्ष लाडूंपैकी २० कोटी लाडू हे भेसळयुक्त तुपाचा वापर करुन बनवले होते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मंदिरात दररोज येणाऱ्या भाविकांची संख्या, खरेदीची माहिती आणि उत्पादन आणि विक्रीचे आकडे यांचा विचार करून साध्या गणनेच्या आधारे हे आकडे काढण्यात आले आहेत.

## निवडणुकांमध्ये सत्ताधाऱ्यांकडून साम, दाम, दंड, भेदाचा वापर?

# कमळाला 'बिनविरोध' सुगंध!

**ब्रम्हानंद जाधव / बुलढाणा**

राज्यातील नगर पालिकांच्या निवडणुकीत बिनविरोध होत असलेल्या उमेदवारांमध्ये सत्ताधारी पक्षातील नेत्यांच्या नातेवाईकांचा सहभाग सर्वाधिक दिसून येतो. परिणामस्वरूप, सत्ताधाऱ्यांकडे संशयाच्या चष्म्यातून बघितले जात आहे. स्थानिक निवडणुकांमध्ये सत्ताधारी पक्षांकडून आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणण्यासाठी साम, दाम, दंड, भेदाचा वापर करण्यात येत असल्याचा गंभीर आरोपही होत आहे. त्यामुळे स्थानिक निवडणुकांमध्ये भाजपच्या कमळाला 'बिनविरोध' सुगंध येत आहे!

संडे स्पेशल ब्रम्हास्त्र.. ९५

राज्यात सध्या २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकांमध्ये नेत्यांच्या नातेवाईकांना उमेदवारी देण्यापासून ते उमेदवार निवडून आणण्यासाठी पक्षांनी कंबर कसली आहे. अनेक ठिकाणी नगरसेवक पदाच्या उमेदवारांसह नगराध्यक्ष पदाचे उमेदवार बिनविरोध निवडून आणले जात आहेत. यात प्रामुख्याने सत्ताधारी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश दिसून येतो. यावरून शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या मुद्द्यावरून प्रश्न उपस्थित केला आहे. भाजपच्या नेत्यांचेच नातेवाईक का बिनविरोध निवडून आले? भाजपचे सामान्य कार्यकर्ते का आले नाहीत? असा हल्लाबोल शिवसेना ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी केला आहे. आज मंत्र्यांचीच पत्नी, आई, मामेभाऊ किंवा नेत्याची सून 'बिनविरोध' निवडून आणली जाते. असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही ठिकाणी या उमेदवारांना निवडूण आणण्यासाठी विरोधकांनी अर्जच भरले नसल्याचा प्रकार आहे. परंतु बिनविरोध निवडणुकांनी लोकशाहीच्या पायावरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

### कोण-कुठे बिनविरोध?

- अमरावतीच्या चिखलदरा नगरपालिकेच्या निवडणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मामेभाऊ आल्हाद कलोती हे बिनविरोध निवडून आलेत. जळगावच्या जामनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षपदी मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी साधना महाजन बिनविरोध निवडून आल्या आहेत. धुळे जिल्ह्यातील दोंडाईचा नगरपालिकेत भाजप नेते तथा मंत्री जय कुमार रावल यांच्या मातोश्री नयन कुमार रावल यांची बिनविरोध निवड झाली आहे. विशेषतः येथील २६ पैकी ७ नगरसेवकही बिनविरोध निवडून आले आहेत. सोलापूरच्या अनगर नगरपंचायतीत भाजपचे सर्वच्या सर्व १७ उमेदवार व नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्राजक्ता पाटील बिनविरोध निवडून आल्या.

### निवडणुकीपूर्वीच भाजपचे १०० नगरसेवक बिनविरोध

- नगरपंचायत व नगरपरिषद निवडणुकीत निवडणुकीआधीच भाजपच्या १०० नगरसेवकांची बिनविरोध निवड झाली आहे.

कोकणमध्ये चार, उत्तर महाराष्ट्र ४९, पश्चिम महाराष्ट्र ४१, मराठवाडा तीन आणि विदर्भात तीन नगरसेवक बिनविरोध निवडून आले.

# नगरपालिका निवडणुकीत नामदार-आमदारांची प्रतिष्ठा पणाला!

रणधुमाळी दैनिक महाभूमि

**अनुप गवळी**
**खामगाव**

घाटाखाली महायुती आणि आघाडी दोघांमध्ये बिघाडी निर्माण झाल्याने एकला चलो रे ची भाषा करत सर्वच पक्षांनी स्वतंत्र उमेदवार एकमेकांसमोर उभे केले आहेत. त्यामुळे स्वबळाच्या भाषेनंतर घाटाखालील खामगाव, शेगाव, जळगाव जामोद, नांदुरा आणि मलकापूर नगरपालिका निवडणुकीमध्ये नामदार आणि आमदारांची प्रतिष्ठा पणाला लागल्याचे दिसून येत आहे.

मागील नऊ वर्षानंतर होऊ घातलेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये रंगत दिसून येत आहे. खामगाव नगरपालिकेमध्ये नगराध्यक्ष पदासाठी नामदार आकाश फुंडकर यांच्या वहिनी अपर्णा सागर फुंडकर निवडणूक रिंगणामध्ये आहेत. पक्षातील संभाव्य बंडखोरी आणि पदाधिकाऱ्यांची नाराजी टाळण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांकडूनच फुंडकर कुटुंबातून उमेदवार देण्यात आला. त्यामुळे विरोधकांकडून भाजपला घेरण्यासाठी घराणेशाहीचा धब्बा लावण्याचा प्रयत्न केला जात आहे. भाजपच्या विरोधात महायुतीमधीलच घटक पक्ष अजित पवार गटाने चेतना शर्मा नगराध्यक्षचा उमेदवार दिला असून शिवसेना शिंदे गटाने सुद्धा अश्विनी रवी माळवंदे यांना नगराध्यक्ष पदासाठी समोर केले आहे. त्यामुळे खामगावमध्ये चौरंगी लढत होणार असून या ठिकाणी नामदार आकाश फुंडकर आणि अजित पवार गटाचे नेते माजी आमदार दिलीप कुमार सानंदा यांची उमेदवार निवडून आणण्यासाठी प्रतिष्ठा पणाला लागली आहे. जळगाव जामोद आणि शेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांना भाजपची सत्ता खेचून आणण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करावे लागणार असून त्यांच्यासमोर राष्ट्रीय काँग्रेसचे कडवे आव्हान आहे. जळगाव जामोदमध्ये महायुतीतील घटक प्रक्ष स्वतंत्र लढती लढत असून भाजपने नगराध्यक्षपदासाठी गणेश दांडगे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांच्यासमोर राष्ट्रीय काँग्रेसचे गजानन महादेव सूर्यवंशी, शिवसेना उबाठाचे पवन अवचार, वंचित बहुजन आघाडीचे अजय वानखडे यांचे आव्हान आहे. शेगाव नगरपालिका निवडणुकीत भाजपाकडून नवख्या उमेदवार आशिष संजय सावळे आहेत. त्यामुळे शेगावात भाजप गटातील काही पदाधिकाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर असून नगराध्यक्षपदासाठी उभेच्छुक असलेल्या काही पदाधिकाऱ्यांचा हिरमोड झालेला आहे. शेगाव नगरपालिकेत भाजपच्या उमेदवारासमोर काँग्रेस, अजित पवार गट, वंचित बहुजन आघाडी, नगर विकास आघाडी, शिवसेना उबाठाच्या उमेदवारांचे आव्हान आहे.

# छोट्या जमिनीच्या खरेदी-विक्रीवरील अडथळा दूर

## शहरी भागात तुकडेबंदी कायदा लागू राहणार नाही

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्य सरकारने तुकडेबंदी कायद्यात ऐतिहासिक बदल करत शहरी भागातील छोट्या जमिनींच्या खरेदी-विक्रीवरील मोठा अडथळा दूर केला आहे. नव्या अधिसूचनेनुसार जिल्ह्यातील महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायत हद्दीतील अकृषिक जमिनींवर तुकडेबंदी कायदा लागू राहणार नाही. म्हणजेच आता शहरांच्या हद्दीत १ गुंठा, २ गुंठे किंवा त्यापेक्षा कमी क्षेत्राचा भूखंडही कायदेशीररित्या खरेदी-विक्री करता येणार आहे. ३ नोव्हेंबर रोजी राज्य सरकारने जारी केलेल्या अध्यादेशाने हा बदल लागू झाला असून मानक कार्यपद्धती प्रसिद्ध करण्यात आली आहे.



### कोणत्या क्षेत्रांत लागू होणार बदल ?

■ महापालिका, नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्र एमएमआरडीए आणि इतर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणांच्या हद्दी तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांचे क्षेत्र. प्रादेशिक योजनांतील निवासी, वाणिज्य, औद्योगिक आणि इतर अकृषिक झोन या क्षेत्रांमध्ये बदल बदल लागू होणार आहे.

प्रादेशिक योजना विस्तार, नगरविकास आणि शहरांचे जलद वाढते नागरीकरण यामुळे अनेक ठिकाणी शेतीच्या जमिनी अकृषिक वापरांसाठी रूपांतरित झाल्या. मात्र तुकडेबंदी कायद्यामुळे लहान तुकड्यांची सातबाऱ्यावरील नोंद, बांधकाम परवानगी, वीज-पाणी जोडणी, उद्योग, घरबांधणी अशा सर्व प्रक्रियांमध्ये अडथळे निर्माण होत होते. त्यामुळे नागरिक, गुंतवणूकदार आणि बांधकाम क्षेत्र आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले होते. याचा विचार करून सरकारने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

### कोणते बदल करण्यात आले ?

■ सरकारने तुकडेबंदी कायद्याच्या कलम ८ मधील अडथळे हटवून सुधारणा केल्या आहेत. तसेच कलम २ मध्ये नवीन पोटकलम (४) समाविष्ट करून १९६५ ते १७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान झालेले अनियमित व्यवहार नियमित मानण्याचा मार्ग खुले केला आहे. त्यामुळे पूर्वी खरेदी केलेल्या छोट्या भूखंडांना देखील कायदेशीर मान्यता मिळू शकते.

### सातबाऱ्यावर नोंद होणार

■ आतापर्यंत तुकडेबंदी कायद्यामुळे छोट्या जमिनींच्या मालकी हक्काची नोंदणी सातबाऱ्यावर होत नव्हती. त्यामुळे जमीन विकत घेतली तरी ती अधिकृतरीत्या मालकीत येत नसे. पण आता नवीन निर्णयानुसार छोट्या तुकड्यांवरूनही अधिकृत नोंदणी, मालकी हक्क आणि सातबाऱ्यावर नाव नोंदवणे शक्य होणार आहे. त्यामुळे मध्यमवर्गीय आणि कमी गुंतवणुकीत जमीन घेऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# ६९ वर्षाच्या आजीने ९ वर्षाच्या नातीला केली किडनी दान



**पुणे, वृत्तसंस्था :**

पुण्यातील एका आजीने आपली किडनी देत नातीला जीवनदान दिले आहे. किडनीच्या गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या ९ वर्षीय मुलीवर किडनी प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. या मुलीला तिच्या ६९ वर्षीय आजीने किडनी दिली. आजी आणि नातीच्या वयातील अंतर तसेच दोघांमधील गुंतागुंत अशा आव्हानांमुळे ही प्रक्रिया अवघड असली तरी ही शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली.

मुलीचे दोन्ही मूत्रपिंड आकुंचन पावले होते. याचे निदान उशिरा झाले, यामुळे तात्काळ प्रत्यारोपण करणे गरजेचे होते. शेवटी नातीचा जीव वाचविण्यासाठी आजीने आपली किडनी देण्याचा निर्णय घेतला. खराडीतील मणिपाल हॉस्पिटलचे नेफ्रोलॉजिस्ट आणि किडनी प्रत्यारोपणतज्ज्ञ डॉ. मनीषकुमार माळी यांनी याबद्दल बोलताना सांगितले, की आजी आणि रुग्ण यांच्यातील वयाचे अंतर खूप जास्त होतं. मुलीचे वयही कमी आणि तिचे वजनही १४ किलो असून उच्चरक्तदाबाचाही त्रास यामुळे ही शस्त्रक्रिया दुर्मीळ आणि आव्हानात्मक होती. त्यामुळे हे प्रत्यारोपण आव्हानात्मक होते. मात्र, आजी वैद्यकीयदृष्ट्या तंदुरुस्त असल्याने त्यांची किडनी वापरण्याचा निर्णय घेण्यात आला.

## न्यूज ब्रीफ

### शाळकरी मुलावर बिबट्याचा हल्ला

**पालघर :** पालघरमधील विक्रमगड तालुक्यातील उतावळी आदर्श विद्यालयात शिकणाऱ्या ११ वर्षाच्या विद्यार्थ्यांवर बिबट्याने झडप घातली. अचानक झालेल्या या हल्ल्याने हा मुलगा भांबावला. हा विद्यार्थी जंगलातील रस्त्याने त्याच्या शाळेत जातो. घरापासून त्याची शाळा ४ किलोमीटर आहे. जंगलातील पायवाटेने शाळा सुटल्यावर तो घरी परतत होता. त्याचवेळी अचानक बिबट्याने त्याच्यावर हल्ला चढवला. पण शाळेचे दप्तर आणि विद्यार्थ्याच्या समयसूचकतेमुळे तो बचावला. बिबट्याने मागून त्याच्यावर हल्ला चढवला. मयंकच्या पाठीवर दप्तर होते. बिबट्याचे पुढचे पाय या दप्तरावर पडले. यामुळे त्याची पाठ वाचली. पण हातावर बिबट्याच्या पंजामुळे खोल जखमा झाल्या. त्याच्या हाताला अनेक ठिकाणी टाके द्यावे लागले.

### नॉमिनी कायमस्वरूपी सदस्य होऊ शकत नाही

**मुंबई :** सोसायटीतील मुख्य सदस्याच्या निधनानंतर त्याच्या नॉमिनीला गृहनिर्माण सोसायटीचे सदस्यपद थेट मिळू शकत नाही. सक्षम प्राधिकरणाने वारसा हक्कानुसार निश्चित केलेल्या व्यक्तिलाच सदस्याच्या मृत्यूनंतर सोसायटीचे रिकामी झालेले सदस्यत्त्व मिळू शकते, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा मुंबई हायकोर्टने एका निकालात दिला आहे. नॉमिनी हा मालमत्तेचा केवळ कायदेशीर विश्वस्त असतो. त्याचे अस्तित्व हे ठराविक कालवधीपर्यंतच मर्यादित असते. सक्षम प्राधिकरणाने एखाद्या व्यक्तीला कायदेशीर वारस म्हणून जाहीर केल्यानंतर नॉमिनीचे सदस्यत्त्व आपोआप संपुष्टात येते, असे न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठाने याबाबत दिलेल्या निकालातून स्पष्ट केले.

# कचरावेचक महिलेने दहा लाख रुपये असलेली बॅग केली परत

**पुणे, वृत्तसंस्था :**

गेल्या अनेक वर्षांपासून पुण्यातील सदाशिवपेठत स्वच्छता कर्मचारी म्हणून काम करणाऱ्या अंजू माने यांना रस्त्यावर दहा लाख रुपये असलेली बॅग सापडली. माणुसकी दाखवत त्यांनी ती बॅग परत केली आहे. नेहमीप्रमाणे सदाशिवपेठ भागात गुरूवारी सकाळी ७ वाजल्यापासून कचरा गोळा करण्याचे काम करत असताना रस्त्याच्या कडेला पडलेली एक बॅग अंजू यांना दिसली. यापूर्वीही अशीच औषधाच्या बॅग मिळाल्याचा अनुभव अंजू यांना होता म्हणून तशीच कोणाची बॅग असेल असा विचार करून त्यांनी ती बॅग फीडर पॉईंटला सुरक्षित ठेवली.

बॅग उघडून पाहिल्यानंतर बॅगमध्ये औषधांसोबत रोख रक्कम असल्याचे त्यांच्या लक्षात आले. अनेक वर्षांपासून अंजू माने या भागात काम करत असल्यामुळे त्या परिसरातील सर्व नागरिकांना ओळखतात. त्यांनी ओळखीतील नागरिकांच्या मदतीने परिसरातील सर्वांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान एक नागरिक अतिशय अस्वस्थपणे काहीतरी शोधत असल्याचे अंजू माने यांनी पाहिले.

त्या नागरिकाला सापडलेली बॅग त्यांचीच असल्याचे निश्चित करून दहा लाख रक्कम असलेली बॅग त्यांना परत केली. अंजू माने यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करत परिसरातील नागरिकांनी त्यांना साडी व काही रोख रक्कम देऊन त्यांचा सत्कार केला.

# मनसे-उद्धवसेनेत वादाची ठिणगी

## मनसेच्या उमेदवारांना प्राधान्य उबाठात नाराजीचा सूर..

**ठाणे, वृत्तसंस्था :**

शिवसेना आणि भाजपच्या उमेदवारांच्या विरोधात अंबरनाथमध्ये शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांनी युती करत लढण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र विरोधकांना रोखण्यासाठी एकत्र आलेल्या युतीत निवडणुकीपूर्वीच धुसफूस सुरू झाल्याचे बोलले जात आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुकीत शिवसेने विरोधात लढणाऱ्या उबाठाच्या निष्ठावंताना डावलत त्या प्रभागात मनसेच्या उमेदवारांना प्राधान्य देत उमेदवारी दिल्यावरून उबाठा आणि मनसेतही नाराजीचा सूर पाहायला मिळत आहे.



अंबरनाथ नगरपालिका निवडणुकीत यंदा युती, आघाडीतील बिघाडीने अनेक पक्ष स्वबळावर निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. त्यात शिवसेना, भाजप यांच्यात खरी लढत होणार असली, तरी युतीतील राष्ट्रवादी आणि मविआतील काँग्रेसही नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरली आहे. तर दुसरीकडे मविआतील शिवसेना उबाठा, मनसे आणि राष्ट्रवादी (शप) यांनी युती करत उबाठाचा उमेदवार नगराध्यक्षपदी दिला आहे. मात्र निवडणुकीपूर्वीच मविआत शिवसेना (उबाठा) आणि मनसेत काही ठिकाणी जागा वाटपावरून धुसफूस सुरू असल्याचे बोलले जात आहे.

मनसे पक्षाच्या स्थानिक प्रमुखांनी समन्वयाने जागा वाटप केल्या. त्यासाठी मनसेनेही १७ आणि २४ प्रभागांतून आपल्या दोन जागा उबाठासाठी सोडल्या आहेत. एक, दोन ठिकाणी जागा बदलाने नाराजी असल्याचे उबाठा शहरप्रमुख अजित काळे यांनी मान्य केले. मात्र यासह उबाठाकडून अंजली राऊत यांना नगराध्यक्षपद दिल्याने नगराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्यानी काळे यांच्याबाबत नाराजी व्यक्त करत आपण नगराध्यक्षपदासाठी काम करणार नसल्याचे सांगितले.

## पाककला

– रुपाली गायकवाड
सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी,
बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)



### क्वीनोआ सलाद

**साहित्य :** एक वाटी क्वीनोआ, अर्धे बीट रूट चिरून, एक वाटी भिजलेले मोड आलेले चणे किंवा मटकी डाळिंबाचे दाणे अर्धी वाटी कोथिंबीर काळी मिरी पावडर, मीठ लिंबूचा रस, चाट मसाला.



**कृती :** सर्वप्रथम कुकरमध्ये क्वीनोआ मोड आलेले धान्य, आणि बीटचे तुकडे घालून दोन शिट्ट्या करून घ्या थंड झालं की आता एका बाऊलमध्ये काढून घ्या आता यामध्ये कोथिंबीर, डाळिंबाची दाणे,मिरे पावडर, चाट मसाला, आणि लिंबूचा रस घालून मिक्स करा. अतिशय पौष्टिक सुपर फूड असा हा औषधीयुक्त सलाद नक्की खायला पाहिजे.

**टिप :** क्वीनोआ हा एक दक्षिण अमेरिकेतील धान्याचा प्रकार आहे त्यातील पोषक तत्त्वामुळे त्याला सुपर ग्रेन्स व सुपर फूड म्हटलं जातं कुठल्याही सुपर शॉप मध्ये मिळेल.

वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.




### राशीभविष्य

- **मेष** : शैक्षणिक तसंच संशोधन क्षेत्रात अनुकूलता राहील. अपेक्षित भेटी लाभदायक ठरतील. चिंता नसावी.
- **वृषभ** : अपेक्षेपेक्षा अधिक मेहनत करावी लागेल. द्विधा मनस्थिती राहील. शब्दांचा वापर विचारानं करावा.
- **मिथुन** : परिश्रमाचं योग्य फळ प्राप्त होईल. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. आध्यात्मिक कार्याकडे ओढा राहील.
- **कर्क** : भलतं साहस करू नका. दूरच्या पाहुण्यांच्या भेटी होतील. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल.
- **सिंह** : भाग्योदयाचा कालावधी आहे. अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. विवाहाच्या बोलण्याबाबत विचार करावा.
- **कन्या** : उत्पन्नापेक्षा खर्चाचं प्रमाण वाढेल. कोणाच्याही आश्वासनांना भुलू नका. वरिष्ठांची मर्जी राखावी.
- **तूळ** : मुलांची चिंता राहील. शारीरिक दुखापत वा आर्थिक नुकसान संभवते. प्रवासात विशेष काळजी घ्या.
- **वृश्चिक** : आर्थिक व्यवहाराबाबत घाई करू नका. शारीरिक त्रास संभवतो. नवे करार लांबणीवर पडतील.
- **धनु** : शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. वैवाहिक जीवनात समाधान लाभेल. वाहन जपून वापरावं.
- **मकर** : जवळच्या व्यक्तिशी मतभेद संभवतात. स्वाभिमान दुखावला जाईल. पुरेसा संयम बाळगायला हवं.
- **कुंभ** : वाद-विवादापासून दूर रहावं. व्यवसायातील अडचणी दूर होतील. खर्च वाढला तरी प्राप्तीही वाढेल.
- **मीन** : प्रतिष्ठा वाढीस लागेल. मान-सन्मानाचे योग आहेत. जुनी येणी पुन्हा प्रलंबित राहू शकतात.

### २३ नोव्हेंबर — दिनविशेष

१९२६ : अध्यात्मिक गुरु सत्य साईबाबा यांचा जन्म.
१९५५ : युनायटेड किंग्डमने कोकोस द्वीपसमूह ऑस्ट्रेलियाच्या हवाली केला.
२००० : प्रख्यात चित्रकार बाबुराव सडवेलकर यांचे निधन.
२०१३ : शारदा चिटफंड गैरव्यवहारप्रकरणी पोलिसांनी तृणमूल काँग्रेसचे निलंबित खासदार कुणाल घोष यांना अटक केली.
२०१३ : धनुष्य क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी.
२०१५: माजी मंत्री छगन भुजबळ यांची ११० कोटींची मालमत्ता जप्त.

### आरोग्यमंत्र — गुडघेदुखी होईल कमी

गुडघेदुखीमुळे त्रस्त असणाऱ्यांची संख्या खूप मोठी आहे. यावर तज्ज्ञांकडून उपचार घेतले जातातच, पण काही घरगुती उपायांनीही गुडखेदुखीवर उत्तम परिणाम होऊ शकतो.

* पारिजातची पांढऱ्या रंगाची फुलं रात्री उमलतात आणि सकाळी गळून जातात. या झाडाची सहा ते सात पानं वाटून पेस्ट तयार करा आणि एक ग्लास पाण्यात उकळवा. पाणी उकळून अर्धे राहील तेव्हा गॅस बंद करा. हे पाणी कोमट करून दररोज रिकाम्या पोटी प्यावं. यामुळे गुडघ्यातील वेदनेपासून आराम मिळेल. हा एक प्रभावी उपाय आहे.



* कण्हेरीची पानं उकळून बारीक पेस्ट करा आणि तिळाच्या तेलात मिसळून त्यानं गुडघ्यावर मसाज करा. असं केल्यामुळे वेदनेपासून सुटका मिळेल.

* गुडघ्यामध्ये वेदना होत असतील तर रोज रात्री दोन चमचे मेथ्या एक ग्लास पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी मेथ्या चावून खात हे पाणी प्या. यामुळे तुम्हाला कधीच गुडघे दुखण्याचा त्रास होणार नाही.

* एक ग्लास दुधात चार-पाच लसणाच्या काड्या टाकून उकळवा आणि कोमट झाल्यावर हे पाणी प्या. यामुळेही गुदाघादुखीमध्ये आराम मिळतो. दररोज थोडा नारळ खाणं हाही एक चांगला उपाय आहे.

### न्यू टेक — रंजक ईसीजी पॅच

जगभरात हृदयविकाराचं प्रमाण वाढत आहे. आयुष्यात ताणतणाव वाढले आहेत. लहानग्यांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच ताण येतो. मुलांना अभ्यासाचा, परीक्षेचा ताण असतो. हा ताण पटकन लक्षात येत नाही. याचा त्रास नंतर जाणवू लागतो. जगभरातच ताणतणावांची वाढती समस्या पाहता तंत्रज्ञानाच्या मदतीने अशा रूग्णांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. ताणतणावाच्या रूग्णांसाठी ईसीजी पॅच तयार करण्यात आला आहे. हा पॅच छातीवर बसवण्यात येतो. त्यानंतर हृदयाची धडधड मोजून रूग्णाला ताण आहे किंवा नाही हे हा पॅच दाखवू शकतो. व्हायटल स्काउट असं या पॅचचं नाव आहे. आपल्या आरोग्याबाबतची माहिती स्मार्टफोनवर मिळू शकेल. हा पॅच स्मार्टफोनला कनेक्ट करता येईल. एकदा चार्ज केल्यानंतर हा पॅच ७२ तासांपर्यंत काम करेल. रूग्णाच्या आरोग्याबाबत माहिती जाणून घेण्यासाठी हा पॅच किमान ४८ तासांसाठी छातीवर चिकटवून ठेवावा लागतो. या पॅचमध्ये ईसीजी पॅचर्स बसवण्यात आले आहेत. हे पॅचर्स हृदयावर लक्ष ठेऊ न असतात. हृदयाच्या दोन धडधडींमधल्या कालावधीवरून ताणाचं प्रमाण जाणून घेता येतं.

### सौंदर्यसाधना — केसांसाठी नैसर्गिक सनस्क्रीन

तीव्र उन्हामुळे केसही खराब होतात. म्हणूनच केसांसाठीची सनस्क्रीनही बाजारात आली आहेत. हेअर सनस्क्रीनवाले शँपूही बाजारात आले आहेत. अशा उत्पादनांमुळे सूर्याचा अतिनील किरणांपासून केसांना सुरक्षा मिळते. केसांना मूळ रंग टिकून राहतो. तुम्हाला बाजारात मिळणारा सनस्क्रीन शँपू वापरायचा नसेल तर काही नैसर्गिक उपाय करता येतील. बरेच नैसर्गिक घटक केसांसाठी सनस्क्रीन म्हणून काम करतात. त्याविषयी...

* कोरफडीत सूर्याच्या अतिनील किरणांचा प्रभाव कमी करण्याची क्षमता असते. तुम्ही सतत उन्हात जात असाल तर केसांना कोरफडीच्या गराने नियमित मसाज करा. ताज्या कोरफडीचा गर असेल तर अधिक उत्तम. काही वेळानंतर केस थंड पाण्याने धुवून घ्या. कोरफडीच्या गरामुळे केसांना ओलावाही मिळेल.

* चहाचं पाणी हा अजून एक उपयुक्त घटक आहे. पाण्यात थोडा चहा घालून उकळून घ्या. थंड होऊ द्या. पाणी गाळून घ्या. आता या पाण्याने केस धुवा. काही वेळ केसांना शॉवर कॅप घालून ठेवा. साधारण १५ ते २० मिनिटांनी केस साध्या पाण्याने धुवा. (क्रमश:)

### पंचांग

**रविवार, २३ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
मार्गशीर्ष शु. ३, चंद्रराशी : धनु,
नक्षत्र : मूळ, योग : धृति,
सूर्योदय ६.५३, सूर्यास्त ५.५७

### फॉरवर्डस

**मददगार थें हम उनके ज़ब वो ग़रीब थें...**

**मिन्नतें करवा रहें अब वों ज़ब से ख़ुदा बनें हैं...!**

### फॅशन पॅशन

* कॅज्युअल पार्टीचा मूड असेल तर फुलाफुलांचा शर्ट आणि पँट घालता येईल. त्यावर साजेशी हॅट घाला. न्यू ईयर पार्टीसाठी हा लूक बेस्ट आहे.

* इंडो-वेस्टर्नचा पर्याय तुमच्याकडे आहे. हा लूक कॅरी करण्यासाठी हटके रंग निवडा. सण असो वा लग्न, इंडो वेस्टर्न लूक कुठेही चालून जातो. रस्ट ब्राउनसोबत गोल्डन शेड असलेलं फॉर्मल जॅकेट घ्या. लाँग लाईन शर्ट किंवा कुर्त्यावर ते कॅरी करा.

### करिअरवाटा — ऑक्शनरची वेधक कारकिर्द

आजकाल आव्हानात्मक क्षेत्रात कारकिर्द करण्याकडील तरूणाईचा ओढा वाढू लागला आहे. अशांसाठी ऑक्शनर हा उत्तम पर्याय आहे. ऑक्शनरच्या वाट्याला ऑफिस मॅनेजर, पब्लिक रिलेशन मॅनेजर, अकाऊंटंट, को-ऑर्डिनेटर अशा वेगवेगळ्या भूमिका येतात. त्यामुळे या क्षेत्रात कारकिर्द करणाऱ्यांसाठी प्रत्येक दिवस वेगळा आणि नवा असतो. त्यामुळे कामाच्या स्वरूपानुसार वेळेतही बदल होत असतो. या संदर्भात आपल्या देशात डिग्री किंवा डिप्लोमाची सुविधा नाही. परंतु म्युझियम कल्चरल हेरिटेजशी संबंधित ट्रेनिंग प्रोग्राम, शॉर्ट टर्म कोर्स यामध्ये इंटर्नशिप करता येते. अँटीक ऑक्शनर बनण्याची इच्छा असेल तर व्हिजुअल आर्टसमध्ये पदवी किंवा पदविका असेल तरी चालते. ऑक्शनर म्हणून कारकिर्द करू इच्छिणाऱ्यांसाठी चॅरिटी फर्मस, बॅंक, म्युझियम, रियल इस्टेट फर्म यामध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत. एंटरप्रियोर म्हणून शिक्षण घेण्याबरोबर कमाई करण्याची संधीही उपलब्ध होऊ शकते. या क्षेत्रात अनुभवानुसार भरभक्कम वेतनाच्या संधी आहेत. मात्र कामावर, व्यवसायावर मनापासून प्रेम करणाऱ्या आणि त्यासाठी आवश्यक त्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी कठोर मेहनतीची तयारी असणाऱ्यांना यश मिळू शकते. ग्राहकांशी उत्तम, दृढ संबंध प्रस्थापित करण्याची कला आणि उत्तम संवाद कौशल्य असणाऱ्यांसाठी ही चांगली संधी आहे.



### खेचाखेची

**दुखवू नका**

आयुष्यात त्या व्यक्तीला कधीच

दुखवू नका...

जी व्यक्ती तुम्हाला
.
.
.
वेळेवर तंबाखू देते...!


**– एक गायछाप प्रेमी...**

### वेगळं काही

चीनमधल्या शांघायमधल्या सोंगजियांग क्षेत्रात भूमीगत हॉटेलची निर्मिती करण्यात आली आहे. हे हॉटेल बांधण्यासाठी १२ वर्षांचा काळ लागला. हे १८ मजल्याचं हॉटेल असून त्याचे १६ मजले जमिनीच्या खाली आहेत. हे हॉटेल बांधण्यासाठी तब्बल २ हजार कोटी रुपयांचा खर्च आला. तर ५ हजार कर्मचारी राबले. या हॉटेलच्या सर्वात महागड्या खोलीत राहण्यासाठी १४ हजार डॉलर खर्च करावे लागतील. ब्रिटिश वास्तुरचनाकार मार्टिन जोकमॅन यांच्या मार्गदर्शनाखाली या हॉटेलची रचना करण्यात आली आहे. हॉटेलचे सर्वात खालचे दोन मजले तलावाच्या आत आहेत. त्यामुळे या मजल्यांवरच्या खोल्यांमध्ये राहणाऱ्या लोकांना मस्त्यालयात राहत असल्यासारखं वाटेल.

### महिलायन — संसारापासून फारकत नको

मला लहानपणापासून समाजकार्याची आवड आहे. पण विसाव्या वर्षी लग्न होऊन आले त्या घरामध्ये या विचारांचा आदर करणारं कोणी नव्हतं. संकुचित आणि बाळबोध विचारांनी भारलेल्या या घरात काटकसरीत संसार करणं भाग पडलं. नाईलाजाने नोकरी करावी लागली. पतीची यथातथा साथ असताना दोन मुलांना मोठं केलं. आता ती स्वावलंबी झाली आहेत. असं असताना आता वयाच्या पन्नाशीत तरी मनाजोगं जगायला मिळावं अशी इच्छा आहे. काय करु? संसारातून बाजूला होत वेगळी राहू का? ही कृती योग्य ठरेल का?



– वयाच्या महत्त्वपूर्ण टप्प्यावर, विशेषत: शारीरिकदुष्ट्या मोठ्या बदलाला सामोरं जाताना आत्तापर्यंत काहीच न मिळवल्याची भावना दाटून येणं, आयुष्याची संध्याकाळ जवळ येत असल्याची हूरहूर आणि स्वप्नांच्या अपूर्णतेचं दु:ख कुरवाळणं यामुळे विचित्र मानसिक कोंडी अनुभवायला मिळते. तुम्ही या कोंडीत अडकला आहात. पण निराश होऊ नका. अपूर्ण स्वप्नं पूर्ण करण्यासाठी पुरेसा वेळ आहे हे लक्षात घ्या. त्यासाठी संसारापासून फारकत घेण्याची गरज नाही. हा कम्फर्ट झोन सोडला तर वेगळ्याच समस्या भेडसावू लागतील. त्यामुळे आधी कामाची सुरूवात करून नंतरच योग्य निर्णय घ्या.

दैनिक महाभूमि

# बुलढाणा भूमि

रविवार । २३ नोव्हेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | १२२७०० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | १२३७०० |
| चांदी (प्रति किलो) | १५५००० |

## बाजारभाव

**चिखली कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २२०० | २७५० |
| हरभरा | ४५०० | ५३०० |
| सोयाबीन | ३३०० | ४००० |
| तुर | ५४०० | ६३०० |
| ज्वारी | १६०० | १९०० |

**खामगाव कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २२०० | २४६९ |
| हरभरा | ४६०० | ५८०० |
| सोयाबीन | ३५०० | ४५०० |
| तुर | ६००० | ७४२५ |
| ज्वारी | १७०० | २१५१ |

## दखल...

**टेकनिक**

पाच वर्ष लाटायचे
एक वर्ष वाटायचे
तरी आपण प्लसमध्ये
कशाला टेन्शन घ्यायचे ? ..

हे साधं सुत्र लक्षात घेऊन
भावी उमेदवार भाळले
आपले भाग्य आजमाया
निवडणूकित ऊभे राहीले ..!

निवडणूका येता जवळ
सुरु होती पदयात्रा मेळावे
नेत्यांना एकच ध्यास
जनतेपुंढे कसे प्रगटावे ..!

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

## बुध्दम् शरणम् गच्छामीच्या ध्वनीने वातावरण भारावले..

# बौध्द धम्म परिषदेत भिख्खू संघाकडून हजारोंना धम्म देसना

**बुलढाणा / प्रतिनिधी**

धकाधकीच्या जीवनशैलीमुळे जीवन दु:खमय होत चाललयं. मनाच्या शांतीसाठी मानवाची भटकंती सुरू आहे. किरकोळ कारणावरून संघर्ष पेटतो आहे. दु:खाची कारणे स्वत: मध्येच लपलेली आहेत मात्र आपण त्याकडे दुर्लक्ष करतो. जीवनाला दु:खमुक्त करायचे असेल तर, भगवान बुध्दांनी दिलेल्या पंचशीलेचे पालन करणे आवश्यक आहे.

प्रज्ञा, शिल व करूणा या तीन रत्नाचा अंगीकार करावा. एकमेकांप्रती मैत्री भाव जपावा. जीवनात येणाऱ्या संकटांचा सामना करण्याचे बळ बुध्दांच्या अष्टांगिक मार्गात आहे. बुध्दांनी पृथ्वीतलावर कुठलीच दैवी शक्ती नसल्याचे सांगून स्वत:च स्वत:चे जीवन प्रकाशमान करण्याचा संदेश दिला आहे. वैज्ञानिक दृष्टिकोन सांगणारा बुध्दांचा धम्म हा जगातील एकमेव धम्म असल्याची धम्म देसना पूज्य भिख्खू संघाने जागतिक बौध्द धम्म परिषदेत हजारो बौध्द बांधवांना दिली.

मूकनायक फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष सतीष पवार यांच्या पुढाकारातून शनिवारी चिखली रोडवरील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या मैदानावर या धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या निमित्ताने पूज्य भिख्खू संघाच्या उपस्थितीत सकाळी ८ वाजता मलकापूर रोडवरील महामानवांचे तीन पुतळे येथून नगर परिक्रमेनंतर पूज्य भिख्खू संघाच्या मंगलमय सान्निध्यात धम्म ध्वजाचे रोहण करण्यात आले. यावेळी पूज्य भंते उदितज्ञान थेरो, पूज्य भंते ज्ञानरक्षित थेरो,पूज्य भंते यश थेरो, पूज्य भंते धम्मसेन थेरो, पूज्य भंते पुण्ण,पूज्य भंते वेण धम्म चेत्ती, पूज्य भंते गुणानंद अभिभू यांची उपस्थिती होती. सकाळी १० वाजता बुध्द उपासक, उपासिकांना पंचशील व बुध्दवंदना व त्यानंतर श्रीलंकेचे भंते पुण्ण यांनी धम्मदेसना दिली. धम्म परिषदेच्या दुसऱ्या सत्रात पूज्य भंते यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. धम्म परिषदेसाठी जिल्हाभरातील हजारो बौध्द उपासक, उपासिकांची उपस्थिती होती.




### मूकनायक पुरस्काराचे वितरण

■ धम्म परिषदेमध्ये मूकनायक फाऊंडेशनच्या वतीने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना 'मूकनायक' पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पुरस्कारप्राप्त मान्यवरांमध्ये जिल्हाधिकारी अर्चना वानखेडे, सामाजिक न्याय विभागाचे विभागीय आयुक्त विजय साळवे, उद्योजक अमोल हिरोळे, वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.कैलास झिने, ज्येष्ठ नेते भिमराव जाधव, ज्येष्ठ साहित्यिक सागर जाधव, सामाजिक कार्यकर्ते भिमराव मुदगल, पत्रकार सिध्दार्थ आराख, शिक्षण क्षेत्रातील योगदानासाठी दिवंगत बि.ओ.बोर्डे यांना मरणोपरांत मूकनायक पुरस्कार देण्यात आला. भारतीय सैन्य दलाचे सुभेदार श्रीराम जाधव, डाक विभागाचे अधिकारी आशिष इंगळे यांना यावेळी सन्मानित करण्यात आले.

# मेहकर तालुक्याचा शिक्षण विभाग 'प्रभारी भरोसे'!

**डोणगाव:** मेहकर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या सर्वाधिक शाळा असून यावर ६५२ शिक्षक कार्यरत आहेत. या शाळांमधून गोरगरिबांची मुले शिक्षणाचे धडे गिरवतात. मात्र, आजघडीला मेहकर तालुक्याचा शिक्षण विभाग प्रभारींच्या भरोशावर असल्याने तालुक्यामध्ये शिक्षणाचे वाटोळे तर होत नाही ना? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पालकांनी जिल्हा परिषद शाळेवर विश्वास ठेवून आपली पाल्य जिल्हा परिषद शाळेमध्ये टाकावी यासाठी शासन प्रयत्नशील आहे. शाळा सुरू होताच पहिल्याच दिवशी शाळा प्रवेशोत्सव घेण्यात आले. शिक्षण मंत्री, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रवेश उत्सवाला हजेरी लावून विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे तर पालकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण केले होते. मात्र पदांची भरती योग्य प्रमाणात नसल्याने शिक्षण विभागातील महत्वाच्या पदांवर प्रभारी अधिकारी कामकाज पाहत आहेत. मेहकर तालुक्यामध्ये १४ केंद्रात १५ हजार ५६२ विद्यार्थी असून त्यांना शिकवण्यासाठी ६५२ शिक्षक आहेत यात ५९ उच्च प्राथमिक शाळा असून त्यावर अंदाजे ३० च्या जवळपास उच्च श्रेणी मुख्याध्यापक प्रभारी आहेत तर या शिक्षकांवर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रप्रमुख म्हणून १४ केंद्रप्रमुख नियुक्त असायला पाहिजेत जे वेळोवेळी शाळेवर जाऊन शाळा तपासणी करतील मात्र मेहकर तालुक्यामध्ये फक्त तीनच केंद्रप्रमुख कार्यरत आहेत ११ केंद्रप्रमुख रिक्त आहे या केंद्रप्रमुखावर लक्ष देण्यासाठी पाच विस्तार अधिकारी असतात मात्र एकच विस्तार अधिकारी असून चार विस्तार अधिकारी प्रभारी आहेत या विस्तार अधिकाऱ्यावर लक्ष देण्यासाठी गट समन्व्यक असतो ते सुद्धा प्रभारी तर तालुक्यात शिक्षण विभागाचा मुख्य असलेला गट शिक्षणाधिकारी हा सुद्धा मागील दोन वर्षापासून प्रभारी आहे.

### असे आहेत प्रभारी पदे

■ मेहकर तालुक्यामध्ये १४ केंद्रात १५ हजार ५६२ विद्यार्थी असून त्यांना शिकवण्यासाठी ६५२ शिक्षक आहेत गट शिक्षण अधिकारी प्रभारी, ३ शिक्षण विस्तार अधिकारी प्रभारी,११ केंद्र प्रमुख प्रभारी, गट समन्वयक प्रभारी, २५ उच्च श्रेणी मुख्याध्यापक प्रभारी म्हणून कामकाज पाहत आहेत

# ...शेवटी आईच ठरली मुलाची जीवनदायिनी

## किडनी दान करून केली ममत्वाची पाखरण

**संजय गावंडे**



**धाड :** आईच्या मायेची महती थोर आहे. प्रेम, ममता आणि जिव्हाळयाचा त्रिवेणी संगम आईच्या व्यक्तीत्वात निसर्गाने दिला आहे. आईच्या मुलांवरील प्रेमाची तुलनाच होऊ शकत नाही. प्रसंगी आपल्या प्राणाचे बलिदान देऊन आई मुलांचे रक्षण करते. अशाच एका ममतामयी आईच्या त्यागाची अनुभूती नुकतीच धाड परिसरवासीयांना आली.

गेल्या अनेक वर्षांपासून किडनी आजाराने त्रस्त मुलाला स्वत:ची किडनी दान करून त्या माऊलीने आपल्या मुलाचे प्राण वाचवून मुलाला जन्म दिल्यानंतर दुसऱ्यांदा त्याची जीवनदायीनी ठरली.

सावळी येथील प्रशांत देविदास वाघ हा गेल्या अनेक वर्षापासून किडनी आजाराने त्रस्त होता. त्याच्यावर संभाजी नगर येथील मेडीकव्हर हॉस्पीटलला अनेक वर्षापासून उपचार सुरु होते.

परंतू त्या उपचाराचा कुठलाच फायदा होत नव्हता. डॉक्टरांनी त्याला किडनी बदलण्याचा सल्ला दिला . मग, प्रश्न उभा ठाकला तो, किडनी कोण दान करणार ? अशा स्थितीत आईचे ममत्व धावून आले. आपल्या पोटच्या गोळ्याची अवस्था बघून जगातील कोणती आई स्वस्थ बसू शकते? आईने स्वत:ची किडनी मुलाला देण्याचा निर्धार केला.

छत्रपती संभाजी नगर येथील कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये तीन महिन्यांत आई व मुलाच्या विविध तपासण्या करण्यात आल्या. अखेर आई व्दारकाबाई वाघ यांची किडनी मॅच झाल्याचा रिपोर्ट आला. आईचा आनंद गगणात मावेनासा झाला. आपला मुलगा आता त्या दूर्धर आजारातून मुक्त होणार याचा आनंद तिच्या चेहऱ्यावर झळकला.

दरम्यान १७ नोव्हेंबर रोजी किडनी आजारग्रस्त प्रशांतवर किडनी प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करून आईची किडनी मुलाच्या शरीरात प्रत्यारोपित झाली. शस्त्रक्रियेनंतर दोधा मायलेकाची प्रकृती स्थिर आहे.

### राजू भोर यांच्या पुढाकारातून मिळाली मदत

■ केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांचे ओएसडी राजू भोर यांनी पुढाकार घेत कमलनयन बजाज हॉस्पीटलचे किडनी आजार तज्ञ डॉ समिर महाजन यांच्याशी संपर्क साधून प्रशांत वाघ याच्या किडनी प्रत्यारोपणाचा पूर्ण खर्च शासकीय निधीतून करण्यासाठी विनंती केली. त्यानुसार प्रशांतवरील शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली.

# अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पकडले; बुलढाणा तहसीलदारांची कारवाई

**बुलढाणा :** घाटाखालच्या पूर्णा नदीतून रेतीचे अवैधरित्या उत्खनन करून वाहतूक केली जात आहे. अशीच रेती वाहतूक करणारे टिप्पर शुक्रवारच्या रात्री बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे यांनी पकडले. त्यामुळे घाटाखालून बुलढाण्यात येणाऱ्या वाळू माफियांचे धाबे दणाणले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातून वाहणाऱ्या दोन प्रमुख नद्या आहे. त्यात घाटाखालच्या भागात पूर्णा तर घाटावरील भागात खडकपूर्णा नदी वाहते. याच २ नद्यात रेती माफियांचे साम्राज्य पसरलेले आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी रेतीमाफिया विरोधात कडक भूमिका घेतल्यानंतर घाटावरील भागात वाळू माफियांच्या काळ्या कृत्यास लगाम लागल्याचे दिसत असले तरी घाटा खालील वाळू माफिया बेफाम झालेले आहे.



इतकंच नव्हे तर जिल्हा मुख्यालय असलेल्या बुलढाणा शहरात देखील घाटाखालून टिप्पर द्वारे रेतीची अवैध वाहतूक सुरू आहे. शुक्रवारी कडाक्याची थंडीत रात्री २ वाजेच्या सुमारास बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे व चालक अशोक देवकर हे गस्तीवर असतांना मलकापूर रोड वरील रिलायंस मॉल समोर त्यांनी एका मिनी टिप्पर क्र. एमएच १९, सीएक्स-२८९५ ला थांबवून चालक गोकुळ कांडेलकर याला विचारपूस केली असता त्याने सदर टिप्पर संजय रायबोले रा. मलकापूर यांचे असून बुऱ्हानपूर (मध्यप्रदेश) घाटाची वाहतूक मुदत संपलेले रॉयल्टी दाखवली. त्यामुळे सदर टिप्पर जाप्त करून बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले.

## न्यूज ब्रीफ

### ई-केवायसी प्रलंबित; शेतकऱ्यांचे अनुदान रखडले

**अंढेरा :** अतिवृष्टी आणि ढगफुटीसदृश्य पावसामुळे खरीप हंगाम उद्ध्वस्त झाला. पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाने जाहीर केलेली मदत मिळावी अशी अपेक्षा होती; मात्र ई-केवायसी प्रक्रियेत अडचणी येत असल्यामुळे परिसरातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे अनुदान रखडले आहे. सर्व आवश्यक कागदपत्रे आणि फार्मर्स आयडी व्यवस्थित असूनही केवळ ई-केवायसीच्या तांत्रिक अडथळ्यामुळे अनुदान रोखले गेल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष दिसून येत आहे. ग्रामीण भागातील इंटरनेट समस्या, सेवा केंद्रांवरील ताण, आधार पडताळणीतील त्रुटी, बोटांचे ठसे न येणे, ऑनलाईन सिस्टीम एरर यांमुळे ई-केवायसीची प्रक्रिया अत्यंत धीमी गतीने सुरू आहे. अनेक शेतकरी दिवसेंदिवस चकरा मारूनही ई-केवायसी अपडेट न झाल्याने प्रचंड मानसिक आणि आर्थिक तणावाखाली आहेत. तालुक्यात तातडीने ई-केवायसीसाठी विशेष शिबिरे घेऊन प्रक्रिया पूर्ण करून अनुदान त्वरित वितरित करावे. अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

### इस्लामिक मार्गदर्शक केंद्राकडून शुध्द पाण्याची सुविधा

**बुलढाणा :** शहरातील गवळीपूरा येथील महम्मदी मस्जिदच्या अव्वामी बैतूल माल, जमीयत अहेले हदीस, इस्लामिक मार्गदर्शक केंद्राच्या शहरातील बस स्टँड, चिखली स्टाप, बाजार लाईन, टिपू सुलतान चौकात शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा शहरवासीयांसह बाहेरून शहरात येणाऱ्या नागरिकांसाठी करण्यात आली आहे. इस्लामिक मार्गदर्शक केंद्राचे अध्यक्ष उमेर देशमुख यांच्या पुढाकारातून बुलढाणा जिल्हा सामान्य रुणालयात महिन्यात दोनवेळा रूग्णांना फळ वाटप करण्यात येतो. औषधांसोबत फळे खाल्ल्यास आजारातून रूग्णाची लवकर सुटका होते.महम्मदी मस्जिदमध्ये दिवसातून दोन वेळचे शाकाहारी भोजनाची व्यवस्थाही करण्यात आली आहे.

# दुचाकींची समोरासमोर धडक; एक ठार, एक जखमी

**चिखली / प्रतिनिधी**

दुचाकींची समोरासमोर धडक होऊन एकजण ठार तर एकजण जखमी झाल्याची घटना २० नोव्हेंबरला घडली.

या अपघातात देऊळगाव माळी येथील गणेश विश्वनाथ मते यांचा मृत्यू झाला असून सवडद येथील अनिल कचरू खोलगाडगे गंभीर जखमी झाले आहेत. गणेश मते हे दुचाकीने लव्हाळ्याकडून साखरखेर्डा येथे जात होते, तर अनिल खोलगाडगे साखरखेर्ड्यातून आपल्या गावी सवडद येथे जात होते. मोहाडी फाट्याजवळील उतारावर दोन्ही दुचाकी जोरात एकमेकांवर आदळल्या.यामध्ये दोघेही गंभीर जखमी झाल्याने त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

प्रकृती बिघडल्याने पुढील उपचारांसाठी त्यांना चिखलीतील खासगी रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणी करून गणेश मते यांना मृत घोषित केले, तर अनिल खोलगाडगे यांच्यावर उपचार सुरू आहेत. गणेश मते मेहकर येथील गाभणे हॉस्पिटलमध्ये कम्पाउंडर म्हणून कार्यरत होते.

# सारंगवाडी संग्राहक तलाव प्रकल्पात कोट्यवधींचा घोटाळा!

## माजी आमदार राहुल बोंद्रेंचा पत्रकार परिषदेत आरोप

**चिखली / प्रतिनिधी**

बुलढाणा जिल्ह्यातील सर्वात मोठ्या जलसंधारण प्रकल्पांपैकी एक मानला जाणारा सारंगवाडी संग्राहक तलाव प्रकल्प कामात ठेकेदार वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि.पुणे तसेच जलसंधारण विभागातील काही तत्कालीन आणि विद्यमान अधिकाऱ्यांनी विद्यमान आमदार व त्यांचे पती यांना सोबत घेऊन कोट्यवधींचा घोटाळा केला असून १६.६१ कोटीची मूळ निविदा २८०.६४ कोटी वर नेत यात १७०० टक्यांची वाढ झाली आहे. प्रकल्पावर आतापर्यंत २३९ कोटी खर्च केले पण, प्रत्यक्षात काम कुठे ? असा सवाल जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत केला. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करावी अशी मागणीही त्यांनी केली आहे.

आतापर्यंत २२ देयकांद्वारे २३९ कोटी रुपये अदा झाले. पण साईटवरील वस्तुस्थिती वेगळी आहे. मातीमुरूम 'अभाव' दाखवून लाखो घनमीटर सामग्री ८, १७ आणि २० किमी अंतराहून आणल्याचे दाखवले. प्रत्यक्षात साईटवरील तीव्र उताराचा रस्ता असल्याने डंपरच चढू शकत नाहीत. असे असताना ९,९४,६६६ घनमीटर सामग्री बाहेरून आणली असल्याचे दाखवण्यात आले. यासाठी डंपरच्या एक लाख ट्रिप लागल्या असत्या. हे प्रत्यक्षात अशक्य आहे. आणि या प्रकल्पात गौण खणिज प्रकल्पातीलच वापरण्यात आले आहे. म्हणजेच कागदोपत्री खोटे आणि प्रत्यक्षात शून्य काम याद्वारे चिखली मतदारसंघातील नागरिकांची दिशाभूल करण्यात आल्याचे बोंद्रे म्हणाले. मी आमदार असताना हा प्रकल्प मंजूर केला. तेव्हा २००९ साली प्रकल्पाची मूळ निविदा किंमत १६.६१ कोटी होती. कंपनीला गौण खनिज रॉयल्टी संदर्भात २२,५६,५०,४०० रूपये दंडाचा आदेश पारित करण्यात आला. तहसीलदार मेहकर यांचे ३० ऑक्टोंबर २०१८ च्या पत्रानुसार सदर आदेशाची प्रत जिल्हाधिकारी कार्यालय यांना सादर करण्यात आली आहे.



तरी विद्यमान आमदार आणि त्यांचे पती यांनी प्रत्यक्ष साईटवर जाऊन सार्वजनिक खुलासा करावा.आणि जर या लुटीला पाठिंबा देत असाल तर तसे जाहीर करा, असे आव्हानही बोंद्रे यांनी केले.

# दिग्गज नेत्यांसमोर आव्हानांचे 'शिवधनुष्य'




रणधुमाळी दैनिक महाभूमि

**नागेश कांगणे**
**मेहकर**

**नगर पालिका निवडणूक रणसंग्राम**

तब्बल नऊ वर्षानंतर होत असलेल्या नगरपालिका निवडणुकीत केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव , माजी आमदार संजय रायमुलकर, उबाठाचे आमदार सिद्धार्थ खरात, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ तसेच भाजपाच्या नेत्यांचीही प्रतिष्ठा पणाला लागल्याचे चित्र आहे. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यातील मित्र पक्षांमध्ये युती न झाल्याने स्वतंत्र पणाने त्यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार उभे केले आहेत. त्यामुळे सर्वच दिग्गज नेत्यांसमोर ही निवडणूक म्हणजे आव्हानांचे शिवधनुष्य ठरत आहे.

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे विभाजन झाल्यानंतर ही पहिलीच स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक आहे. महायुतीमध्ये जागावाटप होण्याची चर्चा होण्यापूर्वीच शिवसेना शिंदे गटाने अजय उमाळकर हे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केले. उबाठा शिवसेनेच्या वतीने आमदार सिद्धार्थ खरात यांनी फार पूर्वीच किशोर गारोळे यांना नगराध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून लॉन्च केले होते. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून सिद्धार्थ खरात यांना विजयी करण्यासाठी जीवाचे रान केले. तसे पाहिले तर मेहकर लोणार तालुक्यात शिवसेना शिंदे गट आणि काँग्रेस यांचेच वर्चस्व आहे.

उबाठाने गारोळे यांच्या उमेदवारीसाठी प्रतिष्ठा पणाला लावली. त्यामुळे काँग्रेस नेत्यांच्या जीवाचा तीळ पापड झाला. आमच्या मुळेच खरात आमदार झाले व त्यांनी इथली जागा काँग्रेसला सोडली नाही आणि आमच्याशी गद्दारी केली ,असा स्पष्ट आरोप श्याम उमाळकर लक्ष्मणराव घुमरे आदी काँग्रेस नेत्यांनी विविध ठिकाणी भाषणांमधून केला. यानंतर कुठल्याही निवडणुकीत आम्ही काँग्रेस सोबत हात मिळवणी करणार नाही ,अशी घोषणा आमदार खरात यांनी केली. आता शिवसेना शिंदे गटाचे अजय उमाळकर, काँग्रेसचे कासमभाई गवळी, उबाठाचे किशोर गारोळे आणि भाजपचे सारंग माळेकर नगराध्यक्ष पदाची निवडणूक लढवत आहेत. या सर्व पक्षांनी नगरसेवक पदासाठी ही आपले उमेदवार स्वतंत्रपणे रिंगणात उतरवले आहेत.

### मतदारांच्या कौलाची उत्सुकता

■ मेहकर नगर परिषदेची निवडणूक विविध राजकीय पक्षांच्या दावे, प्रतिदाव्यांमुळे लक्ष्यवेधी ठरणार आहे. या रणधुमाळीत ३७,८०० मतदार कोणाला कौल देतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. निवडणुकीचा निकाल काय लागेल हे कुणीही ठामपणे सांगू शकत नाही, अशी सध्याची स्थिती आहे. शिवसेना शिंदे गटाकडून विकास कामांचा पाढा वाचला जात आहे तर, काँग्रेस आणि उबाठा व भाजपचे नेते भविष्यात चांगल्या विकासाची ग्वाही देत आहेत.

# एनसीसीच्या सीएटीसी कॅम्पमध्ये पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल अव्वल

**धाड / प्रतिनिधी**

संरक्षण मंत्रालयाचा भाग असलेल्या १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसीचा वार्षिक सी ए टी सी कॅम्प १० ते १९ नोव्हेंबर दरम्यान आयोजित करण्यात आला होता. यामध्ये धाड येथील पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल धाडचे ४० एनसीसी कॅडेट सहभागी झाले होते. कॅम्प दरम्यान झालेल्या विविध स्पर्धांमध्ये पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूलच्या कॅडेट्सनी विविध मेडल व ट्रॉफीज प्राप्त करून अव्वल मानांकन प्राप्त केले.

अमरावती ग्रुप मधून जवळपास ४०० कॅडेट विविध शाळा कॉलेजेस मधून या कॅम्पमध्ये सहभागी झाले होते. कॅम्प कालावधीत एनसीसी कॅडेट्स ना इंडियन आर्मीच्या सानिध्यात शस्त्र प्रशिक्षण, मॅप रीडींग, ड्रिल, हेल्थ अँड हायजिन, प्रथमोपचार, खामगाव स्थित औद्योगिक वसाहतीतील विविध कारखान्यांना भेट, आपत्ती व्यवस्थापन, फायर फायटिंग इत्यादी विषयांवर प्रशिक्षण देण्यात आले. दहा दिवस सुरू असलेल्या या कॅम्पमध्ये विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींनी मार्गदर्शन केले. या माध्यमातून सायबर क्राईम, सोशल मीडियाचा संयुक्तिक वापर, पोलीस प्रशासन, पोस्को ॲक्ट, वाहतुकीच्या नियमांचे पालन, इत्यादी विषयांवर कॅडेट्सना मार्गदर्शन करण्यात आले. विजेत्यांना तेरा महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल उमेश शुक्ला यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. १३ महाराष्ट्र बटालियन एनसीसी खामगाव मधून या कॅडेट्सना कमांडिंग ऑफिसर कर्नल ओमेश शुक्ला, एनसीसी आरएम दिनेश कुमार , सुभेदार सचिन बोधे, श्याम जामोदे यांचे मार्गदर्शन लाभले.



# ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा। देशात समता नांदवा ॥



## ॥ तुकड्यादास म्हणे..॥

●भगवान राईतकर
हिवरा आश्रम
मो.नं.९७३०३३२१५१


प्रजयंती आणि पुण्यतिथी महोत्सव हा थोरपुरुषांचा किंवा थोरस्त्रीयांचा साजरा होत असतो . त्यामधून त्या थोर व्यक्तिमत्वाच्या कार्याची उजळणी होत असते , त्यातून आळसावलेल्या मनाला आणि शरीराला नवीन ऊर्जा देण्याचे अनेकदा कार्य होत असते . प्रत्येक संत आणि थोरपुरुषांचे अनुयायी जयंती आणि पुण्यतिथी साजरी करून समाजातील स्वार्थी आणि स्वकार्यात मग्न असलेल्या आपल्या बांधवांना आचार आणि विचारांनी उदात्त करण्याचा जणूकाही अप्रत्यक्ष प्रयत्न करीत असतात.

संत हे वेळेनुसार समाजाला दिशा दर्शवीत असतात . जसे डॉक्टर आजारचे निदान करून उपचार करतात अगदी तसेच , संत समाजाची नाडी ओळखतात , सामाजिक आणि मानसिक आजारपण ओळखतात आणि समाज उद्धाराचा मार्ग सांगत असतात . वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाच्या व राष्ट्राच्या उन्नतीसाठी आणि मानवहितासाठी एक नवीन मंत्र सांगितला आहे . तो मंत्र म्हणजे ग्रामजयंतीचा मंत्र होत . याठिकाणी मंत्र याचा अर्थ मांत्रिकाचा मंत्र असा नसून राष्ट्रउध्दारासाठीचा नवीन विचार असा आहे.

ग्रामजयंतीचा नवीन मंत्र हा आहे की , देशात सर्व स्तरावर समानता राबवा . राष्ट्राला जर, आपण एखाद्या खोली सारखं समजलो तर, त्यामध्ये जातीच्या, धर्माच्या , पैशाच्या , पदाच्या , समाजाच्या , देशाच्या, पंथाच्या, श्रेष्ठ आणि कनिष्ठ यांच्या भिंती उभारून जी असमानता निर्माण केली त्या , असमानतेच्या भिंती पाडून देशात समता नांदवा ! असे वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात . समाजातील सर्वांना हा मंत्र घ्या ! असा आग्रहपूर्वक संदेश देतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की , ग्रामजयंतीचा मंत्र घ्या हो नवा । देशात समता नांदवा ।। देशातील विषमता अर्थात असमानता सांगतांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की , एका व्यक्तीकडे निवासासाठी भरपूर जागा आहे. त्यामुळे त्यात तो राहतो, तिथे बाग फुलवितो तर, दुसरीकडे काहींना राहण्यास जागा नाही आणि खाण्यास अन्न नाही . ही तफावत थांबली पाहिजे .त्यासाठी गावा गावात ग्रामजयंती साजरी करणे गरजेचे आहे . समाजातील असमानता पुढील ओळीतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सांगतात की ,

एकाच्या महालात फुलताती बागा । दुसर्यास धड नाही राहण्यास जागा । अन्नासाठी फिरतो नागवा ।।

ग्रामजयंती म्हणजे फक्त उत्सव नसून ग्रामजयंती म्हणजे गावातील सर्व समस्यांचा उपाय शोधण्याचा उत्सव होय . वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज म्हणतात की,ग्रामजयंती ही क्रांतीची लाट असून ती आपल्या गावात आली आहे .त्यामध्ये सत्य , न्याय आणि आपलेपणाचे आणि राष्ट्र उध्दाराचे प्रेम आहे . तिचे हे वैभव आपल्याला टिकवाचे आहे ; असा संदेश राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आपल्याला पुढील ओळीतून देतात की , क्रांतीची ही लाट गावात आली । सत्यास न्यायास प्रेमास व्याली ।। राखा हिच्या या वैभवा ।।




समाज आणि राष्ट्र हितासाठी संत हे नेहमीच लहानपण घेत असतात . स्वार्थासाठी विनंती करतात ती... सामान्य माणसे आणि समाज आणि राष्ट्रहितासाठी विनंती करतात तो, असामान्य माणूस अर्थात ते थोरपुरुष किंवा संत असतात . भजनाच्या शेवटच्या कडव्यात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विनंतीपूर्वक सांगतात की , आपण सर्वांनी एकाच रांगेत बसूया ! आणि असमानतेची दरी संपून टाकू या ! समानता हे धर्माचे अगदी जवळचे तत्व आहे . या धर्माच्या समानतेच्या तत्वाचा जागर आपण सर्व मिळून करूया ! आणि सुखाचे आणि समाधानाचे जीवन जगूया ! राष्ट्रहिताची जोपासना करूया ! त्यासाठी भजनातील शेवटचे कडवे स्मरणात ठेवूया ! तोदासतुकड्याविनवूनिसांगे।बैसूचलासर्वएकाचिरांगे।।निजधर्मतत्वाजागवा।। वंदनीय तुकडोजी महाराजांची जयंती आपण ग्रामजयंती म्हणून साजरी करीत असतो . त्यानिमित्याने आपण सर्वमिळून असमानतेच्या भिंती संपवून टाकुया ! आणि समानतेचा जागर करून राष्ट्रहिताचा संकल्प करूया !

## हितगुज

**प्रिय मित्र**
शुभम,
मला सुद्धा तेच ते काम करताना कधी कधी खूप कंटाळा येतो. काय हे! तेच ते!
अशावेळी सुट्टीचा दिवस गाठावा आणि सारं विसरून सुट्टीत बुडावं. म्हणजे काय तर... मस्त मित्रांसोबत... कुटुंबासोबत मस्त थंड हवेचं ठिकाण शोधून फिरफिर फिरावं.
असं करुनही काही माणसं सहलीतही कामाच्या ऑफिसच्या गोष्टी कोंबतात. मग जाऊन काय फायदा झाला? एक किस्सा सांगतो. ऐक!
असेच कामाने थकले म्हणून काही मित्र फिरायला गेले. मज्जा केली. शेवटी निघायचे म्हणून नावेत बसले. रात्र होती. पिठाळ चांदणं हसत होतं. हे धुंद होते. प्रत्येकजण नाव ताकदीने वल्हवू लागला पण छे! खूप वेळ होऊनही पुढचा किनारा येईना. ते दमले.चुकलो म्हणून थांबायचे ठरले. झोपी गेले. सकाळी उठून पाहिले तर काल ज्या किनाऱ्याला नाव होती... तिथेच आताही होती. धडपड व्यर्थ गेली होती. या सगळ्यात एक गोंधळ झाला होता.... त्यांनी नावेची दोरीच सोडली नव्हती. पुढे जाईल कशी?
आपलेही तसेच होते. मनातल्या विवंचना... कामाचे व्यापताप हे या दोरीचं काम करतात. कुठेही फिरा... कितीही मौज करण्याचा प्रयत्न केला तरी आपण आहोत तिथेच. फक्त दमणं होतं.
आपण एखाद्या गोष्टीतून बाहेर पडायचे ठरवले की बाहेर पडायचेच. तरच निवांत मिळेल. अन्यथा आहे तिथेच नाव वल्हवावी लागेल. हे कौशल्य आहे. ते जमवून घे.
सुट्टीच्या पिकनिकचा आनंद घे. अशावेळी ऑफिसकट्टा तिथे उभा करायचा नाही. अशा सहलीत खरी मजा येते.
चल ठरव एखादा दिवस सुट्टीचा. फक्त आनंदी सहलीचा.
मित्रांसोबत! कुटुंबासोबत!



● संजय गवांदे
९०८२८९२१८३
लेखक प्रसिध्द साहित्यिक आहेत, मुंबई

## 'ती' तीन माकडे..

बालपणी शाळेत कुठतरी एका ओळीत बसलेली तीन माकडाचं चित्र बहुतेक सर्वांनीच बघितलं असेल अन मी ही बघितलं आहे. पहिल्याने तोंडावर दोन्ही हात ठेवलेले, दुसऱ्यांने दोन्हीही कानावर हात ठेवलेले तर तिसऱ्याने दोन्ही हातांनी गच्च डोळे झाकून घेतलेले. माझ्या बाबांनी मला त्यावेळी सांगितलेला अर्थ वाईट बोलू नये, वाईट ऐकू नये व वाईट पाहू नये, अशी ही अबोल संदेश देणारी ती तीन माकडे सर्वांना नैतिक वर्तनाचा उपदेश करतात.

अशाच प्रकारची वेगळी माकडं आठवली. ती मला माझ्या गुरुजींनी शिकवली आहे.

माकड क्र.१: गावाजवळ नदीकाठी एका जांभळाच्या झाडावरील धूर्त माकड व धूर्त नदीतील मगर यांची घट्ट मैत्री जमते. झाडावरील माकड रोज मगरीला जांभळे खायला द्यायचा. मगर अर्धी जांभळे त्याच्या आईसाठी घेऊन जाई. एके दिवशी मगरीची आई लेकीला म्हणाली हे माकड दररोज इतकी गोड जांभळं खातो, तर मग त्याचं काळीजही किती गोड असेल नाही तर ते अतिशय गोड असणारचं! तू काही कर त्याचं काळीज मला आणून दे. लेक लागलीच हो म्हणाली अन निघाली. झाडाखाली आल्यावर माकडाला म्हणाली चल बरं,मी तुला आज नदीमधून फिरवून आणते. माकड ही लगेच तयार झालं अन ठुनकून उडी मारून मगरीच्या पाटीवर बसलं. नदीतील सफर करतांना त्याला मजा वाटू लागली. मगर नदीच्या मध्यभागी आली अन बोलून गेली माकड मित्रा माझ्या आईला तू दिलेल्या गोड गोड जांभळामुळं आता तिला तुझं काळीज हवयं रे... त्यासाठी मी तुला आता माझ्या घरी नेणार... आता मात्र माकड मनातून पुरतंच घाबरलं पण लगेच सावरलं अन म्हणालं अरे त्यात काय एव्हडं! देईन की माझं गोड काळीज तूझ्या आईला. अरे हो पण खरं सांगायचं तर मी माझं गोड काळीज नेहमी करता झाडाच्या डोलीतचं ठेवतो. अगं बाई सतत उड्या माराव्या लागतात नं, अन काळजाला इजा वगैरे झाली तं मग. तू असं कर आपण परत किनाऱ्यावर जाऊ अन मी लगेच झाडावर चढून काळीज घेऊन येतो. मगर लगेच माघारी फिरली. किनारा येताच धूर्त माकडानं मगरीच्या पाठीवरून जोरात उडी मारून पाळालं तं अजूनही पुन्हा कधी मगरीला भेटलं नाही.

माकड क्र. २ : पावसाळ्याचे दिवस होते. एकदा एक माकडीण आपल्या पिलाला घेऊन नदी किनाऱ्यावर निवांत बसलेली असते. काय होते माहित नाही नदीला अचानक पूर येतो. माकडीण झाडावर चढते. पुराचं पाणी जसं जसं चढत जातं तसं तशी माकडीण पिलाला घेऊन झाडावर वरवर चढत जाते. झाडाच्या अगदी टोकाला पुराचं पाणी लागते. माकडीण पिलाला खांद्यावर बसवते. पाणी चढत तिच्या गळ्यापर्यंत येतं. तरीही माकडीण पिलाला डोक्यावर सांभाळत कसा तरी तग धरते आता तर पाणी तिच्या नाका पर्यंत येतं आणि आता तर आणखी वर चढणार असा रंग दिसतो तेव्हा ती माकडीण झटकन आपल्या पिलाला पायाखाली घालून त्यावर उभी राहते. पोरगं मरते. आई जीवंत राहते.

माकड क्र. ३ : एकदा जंगलात सुतारचं लाकूड चिरकाम चालू असते. अशावेळी एक माकड तिथं पोहोचले. तुळईसारख्या एका लांब लाकडावर अगदी दिमाखात जाऊन बसते. हे लाकूड सुताराने अर्ध चिरून त्यावर पाचर मारलेली असते. सुतार बिचारा दमल्यामुळे दुसऱ्या झाडाखाली आराम करू लागला. आता माकड त्या पाचराशी खेळू लागलं. ती पाचर मागेपुढे हलवू लागले असं करता करता ती पाचर चटकन निसटून त्याच्या हातात येते पण त्याची शेपूट त्या फटीत अडकते. माकड जोरा जोरात किंचाळतं. सुताराणे शेपटी तुटे पर्यंत माकडाला झोडपलं. आता या तिघांतलं पाहिलं माकड आत्मसंरक्षण करुन घेण्याइतकं धूर्त, दुसरं आपमतलबी, अन तिसरं आत्मघातकी.

– विष्णु एच धंदर

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहे.)**

# साहित्यिक आणि विचारवंत डॉ.कुल्ली सर

आदरणीय गुरुवर्य प्रा.डॉ. सदाशिव त्र्यंबक कुल्ली सरांना विनम्र अभिवादन. आज त्यांचा सव्वीसावा स्मृतीदीन, २३ नोव्हेंबर १९९९ रोजी त्यांचे दुर्दैवी आणि आकस्मिक निधन आले. त्यांचा स्मृतीदिन ज्ञानदान या कार्यक्रमाच्या रुपाने साजरा केला जातो. गेल्या २५ वर्षापासुन आधी कै. अरुणाताई कुल्ली आणि आता सुजाताताई कुल्ली यांच्या सक्रीय आर्थीक पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. प्रा.डॉ. कुल्ली सर १९७१ पासून २८ वर्षे जिजामाता महाविद्यालय बुलढाणा येथे प्राध्यापक म्हणून कार्य करीत होते. ते व्यासंगी वक्ते आणि कृतीशील विचारवंत होते. ते मार्क्सवादाचे अभ्यासक आणि थोर समीक्षक म्हणून साऱ्या महाराष्ट्राला परीचित होते. तसेच त्यांना कला, क्रीडा, साहित्य, संगीत, नाटक, चित्रपट आणि शेती यांची मनापासुन आवड होती. सरांनी अनेक विद्यार्थ्यांना वैयक्तीक मदत केली, त्यांना जगण्यासाठी आधार दिला आणि हुशार विद्यार्थ्यांना आत्मीयतेने मार्गदर्शन केले.



डॉ. कुल्ली सरांना वाचनाची खुपच आवड आणि हौस होती. वाचन हे माझे पहिले आणि शेवटचे प्रेम आहे, असे ते म्हणत. प्राध्यापक झाल्यानंतर आपला एक मोठा ग्रंथसंग्रह असावा असे त्यांना वाटत असे, त्यातुन त्यांना वाचनालय सुरु करायचे होते. हे वाचनालय त्यांनी प्रारंभी आपल्या राहत्या घरी सुरु केले. त्यांनी १५ जुलै १९८० रोजी भगतसिंग क्रीडा शैक्षणिक आणि सांस्कृतीक मंडळ स्थापन केले. आपल्या सहवासातील तरुण सशक्त, विवेकी, आणि सुसंस्कृत व्हावा म्हणून सरांनी आम्हा विद्यार्थ्यांच्या मदतीने हया दोन्ही संस्था स्थापना केल्या, त्यामध्ये मला स्थापनेपासुन सचिव म्हणुन काम करण्याचे भाग्य लाभले. भगतसिंग मंडळ आणि प्रगती वाचनालयाची कायदेशिर नोंदणी करण्याची जबाबदारी सचिव या नात्याने मी ते काम जबाबदारीने पार पाडले. अध्यक्ष प्रा. डॉ. कुल्ली सर आणि उपाध्यक्ष विनायकराव गायकवाड (संग्रामपूर) कोषाध्यक्ष दादा रायपुरे (मलकापूर) आणि सचिव म्हणुन मी पाठपुरावा केल्यानंतर शाहु नगर मधील मोकळी जागा तत्कालीन नगरसेवक अँड. व्हि. डी. पाटील यांच्या शिफारशीनुसार नगरपालीकेने मंडळाच्या स्वाधीन केली. भगतसिंग मंडळ आणि प्रगती वाचनालय हया दोन्ही संस्था गेल्या ४५ वर्षापासुन बुलढाणा शहरात काम करीत आहेत. त्यामुळे प्रगती वाचनालयाला शहरातील एक वैचारीक, बौध्दीक आणि सांस्कृतीक केंद्र अशी ओळख प्राप्त झाली आहे. सन १९९४-९५ साली प्रगती वाचनालयाला महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कार प्राप्त झाला होता. आज प्रगती वाचनालय हे तालुका व दर्जाचे ग्रंथालय असून वाचनालयाच्या तर्फे वाचकांसाठी नियमीत ग्रंथसेवा उपलब्ध करुन दिली जाते. कै. डॉ. कुल्ली सरांना नाटक, संगीत, व्याख्यान यांची आवड असल्यामुळे त्यांनी स्वतः त्यावेळी अनेक नाटकांमध्ये अरुणाताई कुल्ली सोबत काम केले. तसेच वेगवेगळ्या प्रकारचे सांस्कृतीक कार्यक्रम आणि व्याख्यानेही आयोजीत केली. अशाप्रकारे सरांचे व्यक्तीमत्व ज्ञानपिपासू, सर्जनशिल आणि अनेकांच्या कलागुणांना वाव देणार होते.

बुलढाणा शहरात नामांकित वक्त्याची आणि विचारवंताची व्याख्याने आयोजीत करण्याची आदरणीय डॉ. कुल्ली सरांची इच्छा होती. त्यांनी तसे प्रयत्नही सुरु केले होते. त्यासाठी भगतसिंग मंडळा अंतर्गत प्रगती व्याख्यानमाला सुरु करण्याचा निर्णय घेतला. शहरातील नामांकित डॉक्टर्स प्राध्यापक, साहित्यिक तसेच वकील यांच्याकडून प्रत्येकी १००० रुपये देणगी घेऊन त्यातून उभारलेल्या रकमेच्या व्याजातुन व्याख्याने घेण्याचे ठरले होते. सरांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम सुरुही झाला. या कामासाठी मी तसेच नरेंद्र लांजेवार, पुरुषोत्तम गणगे, प्रा.धांडे, अरुणाताई कुल्ली, बाबुजी कोठारी, मुकुंद पारवे, दयानंद मिसाळकर, प्रा. विनोद देशमुख, रविकिरण टाकळकर, प्रा. डॉ. कानडजे, डॉ. गणेश गायकवाड यांनी ही मनापासुन यथाशक्ती प्रयत्न केले. भगतसिंग मंडळ, प्रगती वाचनालय आणि प्रगती व्याख्यानमाला सुरु करण्याची मुळ संकल्पना कै. डॉ. सदाशिव कुल्ली यांची होती. अरुणाताई कुल्ली आणि आम्ही त्यावेळी कार्यकारणीत असलेल्या सर्वांनी त्यासाठी वेळोवेळी सहकार्य केले. त्याचा परिणाम म्हणुन आज हया संस्था आपली ओळख निर्माण करु शकल्या. कार्यकारणीच्या वर उल्लेख केलेल्या सदस्यांबरोबरच शोभाताई पवार, विजयाताई काकडे, शाहिनाताई पठाण, अमृताताई पाठक, प्रज्ञाताई लांजेवार यांचेही योग्य ते सहकार्य मंडळ आणि वाचनालयाला मिळते आहे.

प्रगती वाचनालयाच्या या प्रशस्त आणि सुसज्ज इमारतीमध्ये प्रौढांसाठी वाचनकक्ष तर आहेच पण तसेच महिला आणि बालवाचकांसाठी ही स्वतंत्र कक्ष आहे. शिवाय तरुण विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षेची तयारी करण्याकरीता खास व्यवस्था करण्याचा प्रयत्न केला जाईल. जिल्ह्यातील साहित्यिकांची ग्रंथ संपदा तसेच संतसाहित्य, बौध्द वाडमःय, छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहु महाराज यांच्यावरील साहित्य, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वाडमःय यांचा स्वतंत्रपणे संग्रह करण्याचा अवश्य प्रयत्न करता येईल. कै.डॉ. कुल्ली सरांच्या निधनानंतर या दोन्ही सस्थांचे नेतृत्व अरुणाताईनी समर्थपणे केले. पुढे दुर्दैवाने अरुणाताईंचे सन २०२१ मध्ये निधन झाले. त्यानंतर सर्वांनी या संस्थांसाठी कुल्ली परिवाराने दिलेले योगदान लक्षात घेऊन सरांची कन्या सुजाताताई कुल्ली यांच्याकडे नेतृत्वाची धुरा दिली. प्रा. डॉ. कुल्ली सर हे प्रगती परिवाराचे अधिष्ठान आहे. त्यांनी शहरांत पुरोगामी विचारांची एक प्रकारे अनौपचारीक चळवळ उभारुन मानवतावादी जीवनमुल्यांची पेरणी केली आहे. त्यामुळेच आजही या संस्थातील कार्यकारणी सदस्य परस्पर सहकार्याने आणि सकारात्मक दृष्टीने काम करीत आहेत. ग्रंथपाल पंजाबराव गायकवाड आणि त्यांचे सहकारी गजानन अंभोरे आणि सरला इंगळे हे कर्मचारी प्रामाणिकपणे पुर्ण वेळ देऊन काम करतात. पुढे सुवर्ण महोत्सवासाठी काही कार्यक्रम उपक्रम नियोजन पुर्वक हाती घ्यावे लागतील. सरांचे विचार कार्य आणि सौजन्यशिल व्यक्तीमत्व समोर ठेवुनच यापुढे ही सर्वजण काम करतील अशी मला खात्री आहे. वाचनालय तसेच मंडळाला असलेला नावलौकीक कायम ठेवुन त्यात आणखी मोलाची भर घालण्यासाठी सर्व संबधितांनी मनापासून प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. सरांना स्मृती दिनानिमीत्त अभिवादन.

–प्रा.डॉ.कि.वा.वाघ,
अध्यक्ष, भगतसिंग क्रीडा शैक्षणिक मंडळ आणि सचिव, प्रगती वाचनालय,
बुलढाणा (मो.८३०८३२२९०६ )

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहे.)**

## ऋतू

उन्हाळा, हिवाळा, पावसाळा
ऋतू कोणता समजत नाही.
कशा संग काय खावं
हेच मला उमजत नाही.

उन्हाळ्यात असायचं ऊन
हिवाळ्यात पडायची थंडी.
शेकोटी जवळ बसायचे लोकं
अंगात घालुनिया बंडी.

पावसाळ्यात यायचा पाऊस
शेतकरी पेरणी करायचे.
जिकडे तिकडे शेतावर
पिके कसे डोलू लागायचे.

पहिले बरोबर यायचे
एका मागून एक ऋतू.
त्यांच्यामध्ये येण्यासाठी
होते आता मी मी तू तू.

– ज्योती केवट, खामगाव
९७६७३२९४६७

## मनाचा गाभारा

मनाच्या गाभाऱ्याला
देवाचा स्पर्श व्हावा,
तसा प्रत्येकाच्या मनात
माणूस जन्माला यावा...

देवघरात देवाचं स्थान जसं असावं,
माणसाला माणुसकीचं भान तसं असावं,
आंब्याच्या डहाळीचं तोरण जसं दाराला,
असावा एक उंबरा माणुसकीचा घराला

माताभगिनींचा आदरसन्मान
व्हावी स्त्रीत्वाची आरती
नभी व्हावा शंखनाद
आकाश नमितो धरती...

चराचरी बोलबाला
होईल तेव्हा रे अमुचा
येईल आनंदाचा पूर
पाऊस पडेल सुखाचा....

– सुरेखा काळुसे, बुलढाणा

## दामखोटा

“ एकलीच काहून बसली वं मोठीमाय अशी.?”
“ कोन परकास व्हय का नाजुक्या , कोन व्हय.?”
“ काहून तुले डोयानं दिसत नाई काय मोठीमाय.?”
“ माये डोये गेले बाबू झ्याव झ्याव दिसते मले.”
“ डोयाचं आपरेशन काहून नाई करत मोठीमाय.?”
“ काय करतं बाबू जे दिसते ते पाहावं.”
“ सरकारी दवाखान्यात तं फुकट काम व्हते.”
“ तू कोनाचा निरोप घिऊन आला काय बाबू.?”
“ नाईवं मोठीमाय काहून काय झालं.?”
“ नाई म्हतलं बाप गेटमन तं लाख पोस्टमन.”
“ नाई माया ध्यानात नाई आलं मोठीमाय.”
“ मायी वायरी दत्ताची बायको तेच म्हनते.”
“ काय म्हनते अलकावयनी मोठीमाय.?”
“ म्हनते असीकसी करते, गाल फुगून बसते.?”
“ काहून काई भांडनगिंडन झालं का दोघींचं.”
“ डोयाचं अप्रेसन सरकारी दावाखान्यात कर म्हनते.”
“ मंग कराचं खर्चापानी कमी लागते.”
“ आंबा पाळी आला अन् हळ्याले मुखरोग झाला.”
“ म्हनजे काय म्हनतं मोठीमाय तू.?”
“ म्हनजे जिंदगीभर कस्ट करा अन् अप्रेसन सरकारी.”
“ तसं नाई आजकाल सबन जनं सरकारीतच करतेत.”
“ इतली मोठी इस्टेट काय संगं बांधून न्याची का.?”
“ जेवळी इस्टेट तुयी हाय तेवळीच अलकायनीची.”
“ नाई रे सबन तिचीच मी भूई फुकूनच आली.”
“ तसं नाई मोठीमाय दोघीचा हिस्सा सारखाच.”
“ येनं म्हना इकळे दाखवतो हिस्सा तिले.”
“ मी तसं नाई म्हनून रायलो काई मोठीमाय.”
“ मंग काहून माया जीव खिजरू आनतं तू.?”
“ कस्ट तुया केले अन् अलकावयनी करते.”
“ आमचा दत्ता इरिया फेकते अन् रानीमाशी बसते.”
“ काईना काई तं हातपाय हालवत अलकाबाई.”
“ काय करते अहिर फत्र्याचा अन् गजर वजात्र्याचा.”
“ जाऊ दे मोठीमाय तुया मतानं कर तू.”
“ आला मोठा वयनी कस्ट करतेवाला टिकोजीराव.”
“ तसं नाई ना मोठीमायवं पैसा वाचते उलसाक.”
“ अलकीची शिफारस घिऊन आला काय तू.?”
“ तसं काई नाई असं वाटलं म्हनून म्हतलं.”
“ गरिबायचा दावखाना हाय बाबू तो.”
“ तसं काई नाई आजकाल कोनी जाते सरकारीत.”
“ भाईरच्या दावाखान्यात घेतलं नाई ताहा जाते.”
“ तुले जिकळे कराचं तिकळे कर मोठीमाय.”
“ करून करनं अन् इटून खानं मले नाई पटत.”
“ जाऊ दे मोठीमाय आप भला तो जग भला.”
“ भल्ला हायस तू करनी कसाबाची अन् जात मानभावाची.”
“ तसं नाई मोठीमाय सभागती म्हतलं म्या.”
“ सकाय मराची तं आजच मरतो सरकारीत मी.”
“ तुले लय आयुष्य देलं भगवंतानं मोठीमाय.”
“ जाऊन सांग तिले अप्रेसन करतच नाई म्हना मोठीमाय.”
“ तसं नाई मोठीमाय म्या या हेतूनं नाई म्हतलं.”
“ परायासी काय झगळा , आपलाच दाम खोटा.!”

– अमोल गोंडचवर
केशव नगर अकोला (८२७५३११९९६)

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर**, *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. **MAHMAR/२०२३/८९१४८**
ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
दैनिक महाभूमि
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** **RNI No.MAHMAR/2023/89148**

दैनिक महाभूमि
रविवार, २३ नोव्हेंबर २०२५
mahabhoomimarathwada@gmail.com
छत्रपती संभाजीनगर भूमि

न्यूज ब्रीफ

## शेंदूरवादा आरोग्य केंद्रास डीएचओंची भेट

**गंगापूर :** तालुक्यातील शेंदुरवादा प्राथमिक आरोग्य केंद्राला जिल्हा आरोग्य अधिकारी (डीएचओ) डॉ. अभय धानोरकर यांनी गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी भेट देऊन कुष्ठरोग शोध मोहिमेचा आढावा घेतला. लसीकरणासाठी मायक्रो प्लॅनिंग काटेकोर राबवण्याच्या सूचना त्यांनी आरोग्य पथकाला दिल्या. घरभेटीदरम्यान मार्किंग, सदस्य संख्या व तपासणीची पडताळणी केली. गैरसमज दूर करून ग्रामस्थांनी शोध मोहिमेत स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. दौऱ्यात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नागेश सावरगावकर, चंदन गणोरे, डॉ. अर्जुन मोरे व आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

## खंडोबा मंदिरात विधिवत घटस्थापना

**छत्रपती संभाजीनगर :** चंपाषष्ठीच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने सातारा परिसरातील खंडोबा मंदिरात घटस्थापना करण्यात आली. यावेळी उपस्थित भक्तांनी देवीची आराधना करून कलशपूजन, नारळ, फुलं आणि धान्य अर्पण केले.खंडोबा मंदिर परिसरात तसेच विविध मंडळांमध्ये भक्तांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. आरत्या, येळकोट येळकोट जयमल्हार दुर्गासप्तशती पठण आणि देवीच्या जयघोषानी वातावरण भारावून गेले होते. महिलांनी पारंपरिक वेषात कलशपूजनात सहभाग घेतला. पुजारी दिलीप धुमाळ, विशाल धुमाळ यांनी पूजा केली. यावेळी अध्यक्ष रमेश चोपडे, सचित साहेबराव पळसकर, विश्वस्त सोमिनाथ शिराणे, सुखदेव बनकर, विजय धुमाळ, अजय चोपडे यांच्या उपस्थितीत भक्तांनी धार्मिक कार्यात सहभाग घेतला. पुढील नऊ दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांनी नवरात्रोत्सव साजरा होणार आहे.

### जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांचे आढावा बैठकीत निर्देश

# नगरपालिका, नगरपरिषद निवडणुकीसाठी यंत्रणा सुसज्ज ठेवा

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जिल्ह्यात होणाऱ्या नगरपालिका आणि नगरपरिषद मतदान प्रक्रियेसाठी नगरपालिका, पोलीस आणि महसूल या तिन्ही यंत्रणाने योग्य समन्वय ठेवून मतदान प्रक्रिया सुरळीत आणि पारदर्शक होण्यासाठी आवश्यक ती सर्व खबरदारी घेऊन यंत्रणा सुसज्ज ठेवावी असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी शनिवारी दूरदृष्टी प्रणालीद्वारे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, तहसीलदार नगरपालिका मुख्याधिकारी यांच्याशी ऑनलाइन संवाद साधत निवडणूक यंत्रणेबाबतचा आढावा घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयातून नगरपालिका मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, पैठण फुलंब्रीच्या उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, कन्नड, वैजापूर, पैठण, गंगापूर, सिल्लोड या नगरपालिकेचे मुख्याधिकारी या बैठकीस उपस्थित होते. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी पुढे म्हणाले की, नगरपालिका निवडणूक नियमावलीप्रमाणे कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवत प्रतिबंधात्मक कारवाई आणि प्रत्यक्ष बंदोबस्त याबाबतचे नियोजन संबंधित नगरपालिका हद्दीतील निवडणूक प्रक्रियेच्या यंत्रणेने करावे. नियंत्रण कक्ष याबाबत विशेष काळजी घेऊन योग्य तो पोलिस बंदोबस्त मागवण्याचे नियोजनही करावे. मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी स्वीप कार्यक्रमांतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन शाळा महाविद्यालयात करण्याबरोबरच मतदान करण्यासंदर्भाचे आवाहन प्रसार माध्यमाच्या माध्यमातून



करण्यात यावे. यामध्ये स्थानिक कलाकार, विविध व्यक्ती यांचा सहभाग करून घ्यावा.

पारदर्शकपणे निवडणूक होण्यासाठी रिस्पॉन्स टाईम किंवा प्रतिसाद वेळ हे कमीत कमी करण्यासाठीचा प्रयत्न करावा. निवडणुकीच्या प्रक्रियेत उमेदवार वेगवेगळ्या परवानग्यासाठी अर्ज करत असतात या अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची यादी नगरपालिका कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावे, जेणेकरून उमेदवाराला आवश्यक असणाऱ्या कागदपत्राची पूर्तता करून त्यांना परवानगी घेणे सुलभ होऊ शकते अशा सूचनाही जिल्हाधिकारी स्वामी यांनी केल्या. नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणूक विषयी प्रसार माध्यमाला वेळेत आणि अचूक माहिती देण्यासाठी माध्यम कक्ष उभारण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सांगितले.

### दुबार मतदार नोंदणीबाबत खबरदारी घ्या



■ मतदारांच्या मतदानाच्या दिवशी योग्य सेवा सुविधा देण्याबरोबरच मतदान केंद्रांची पाहणी आणि सुसज्जता याबाबत विशेष लक्ष द्यावे. त्यासाठी प्रत्यक्ष भेटी देऊन आदर्श आचारसंहिता बाबतचे पालन करण्यासाठी सर्वांनी काम करावे. जिल्ह्यात दुबार मतदार नोंदणी बाबत योग्य ती खबरदारी घ्यावी. यासाठी केंद्र अध्यक्षांना याबाबत विशेष प्रशिक्षण आणि सूचनाचेही निर्देश देण्यात यावेत असे जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले.

## थंडीचा कडाका वाढल्याने पेटल्या शेकोट्या



**सावंगी अवघडराव / प्रतिनिधी**

सध्या वातावरणात बदल झाल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. ग्रामीण भागात सध्या पेरणीचे दिवस सुरु असल्याने अनेकांनी शेतात पाणी सोडले आहे. त्यामुळे वातावरणात गारवा निर्माण झाल्याने विविध ठिकाणी शेकोट्या पेटवून नागरिक उब घेतांना दिसून येत आहे.

यंदाच्या वर्षी पावसाळा लांबल्याने थंडीचे उशीराने आगमण झाले. उशीराने आगमण झाले असले तरी थंडीचा कडाका वाढला आहे. कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी लहान मुलांपासून अबालवृध्दापर्यंत घरात ठेवलेले उबदार कपडे परिधान करीत आहेत.

सकाळी आणि सायंकाळी सात वाजेच्या नंतर थंडीचा कडाका ग्रामीण भागात जास्त प्रमाणात जाणवत असल्याने ग्रामीण भागातील नागरिक जागोजागी शेकोट्या पेटवून थंडीपासून बचाव करतांना दिसून येत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात मका, गहू, हरभरा, ज्वारी आदी पिकांची लागवड केली असून त्यांना रात्री, अपरात्री पिकाला पाणी देण्यासाठी शेतात जावे लागत असल्याने शेतकरी शेकोट्या पेटवून थंडीपासून स्वत:चा बचाव करतांना दिसून येत आहेत.

## भरधाव वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार युवकाचा मृत्यू

**वैजापूर / प्रतिनिधी**

भरधाव वेगाने जाणाऱ्या वाळुच्या टिप्परने दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिल्याने दुचाकीस्वार युवक जागीच ठार झाला. तर दोन जण गंभीर जखमी झाले. हा अपघात वैजापूर तालुक्यातील डाग पिंपळगाव ते नागमठाण रोडवर डाग पिंपळगाव शिवारात शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी घडला असल्याचे विरगाव पोलिस ठाण्याच्या सूत्रांनी सांगितले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गणेश सोमनाथ माळी (१९ वर्ष) असे मयत युवकाचे नाव आहे. तर



सिध्दार्थ महादु काळे व बाळु अंकुश निकम अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. मयत गणेश माळी हे मित्रा सोबत त्यांच्या दुचाकी क्रमांक (एमएच-१७-एक्यू-२२९४) नागमठाण येथील आठवडी बाजार करुन डाग पिंपळगाव येथे दुपारी दोन वाजेच्या सुमारास परत जात होते. त्यावेळी पाठीमागून आलेल्या वाळुच्या टिप्परने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. अपघातानंतर टिप्पर चालक घटनास्थळावरुन फरार झाला. अपघातात जखमी झालेल्या गणेश माळी, सिध्दार्थ काळे, बाळु निकम यांना उपचारासाठी वैजापुरच्या उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी गणेश माळी याला तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी सुनिल सोमनाथ माळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून टिप्पर चालक वैभव विनायक गवांडे याच्या विरुद्ध विरगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक माने हे करीत आहेत.

## शौचालय दिनानिमित्त जि.प.ची विशेष मोहीम

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी**

जागतिक शौचालय दिनानिमित्त जिल्हा परिषदेच्या स्वच्छ भारत मिशन विभागातर्फे हमारा शौचालय, हमारा भविष्य ही विशेष मोहीम १९ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आली आहे. ही मोहीम मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजेच १० डिसेंबरपर्यंत राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या सूत्रांनी दिली. जिल्हा परिषदेचे प्रशासक अंकित यांनी सर्व ग्रामपंचायती व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

## ‘त्या’ बिबट्याला पकडण्यासाठी पिंजऱ्यात ठेवल्या कोंबड्या

**पैठण / प्रतिनिधी**

तालुक्यातील ढाकेफळ शिवारात गेल्या काही दिवसापासून मादी बिबट्याने बछड्यासह वास्तव्य केले असल्याने परिसरातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, बिबट्याला पकडण्यासाठी वन विभागाने लावलेल्या पिंजऱ्यात सावज न ठेवल्याची बातमी ‘दैनिक महाभूमि’ मध्ये प्रकाशित झाल्यावर परिसरातील काही शेतकऱ्यांनी स्व:खर्चाने त्या पिंजऱ्यात दोन कोंबड्या बिबट्यासाठी सावज म्हणून शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी ठेवल्या.



पैठण तालुक्यातील ढाकेफळ शिवारात गेल्या काही दिवसापासून मादी बिबट्याने बछड्यासह वास्तव्य केले असल्याने परिसरातील शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ढाकेफळ शिवारात मादी बिबट्याचा बछड्यासह वावर असल्याने परिसरातील शेतकऱ्यांनी बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी वन विभागाकडे केली होती. त्यानंतर वन विभागाने ढाकेफळ शिवारात पिंजरा लावला होता. परंतु त्यात बिबट्यासाठी सावजच ठेवले नव्हते. त्याबाबतचे वृत्त शनिवारी प्रकाशित झाल्यानंतर ढाकेफळ येथील शेतकरी हरिभाऊ शिंदे, गोरख लिपाने, रिहान पठाण, निजाम शेख, सतिश श्रीसुंदर, शेखर शिसोदे, युनुस पठाण, अक्षय शिरवत, सचिन रणशुर, सुमित शिरवत, संजय शिरवत, रविंद्र पाचे, विष्णू कोल्हे, दिनेश शिरवत, महेश शिरवत आदींनी स्व:खर्चाने दोन कोंबड्या खरेदी करुन बिबट्याच्या पिंजऱ्यात ठेवल्या आहेत.

दरम्यान, शनिवारी सकाळी नऊ वाजेच्या सुमारास शेखर शिसोदे यांच्या गट नं १२४ ढाकेफळ शिवारात भागचंद आदमाने हा तारू पिंपळवाडी कडुन पाटाच्या रस्त्याने दुचाकीवरून ढाकेफळकडे येत असताना या शेतकऱ्याला बिबट्या दिसला. गाडीच्या आवाजामुळे बिबट्या सावधानता बाळगत संजय आदमाने यांच्या शेतातील ऊसामध्ये पळाला. वनविभागाने परिसरातील बिबट्यांचा बंदोबस्त करावा नसता शेतकऱ्यांना सोबत घेऊन पैठण - छत्रपती संभाजीनगर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा छावा महाराष्ट्र सेनेचे संघटना प्रमुख किशोर पाटील शिरवत यांनी वन विभागाला दिला आहे.

## क्षुल्लक कारणावरुन मुलानेच केला जन्मदात्याचा खून

**पैठण / प्रतिनिधी**

क्षुल्लक कारणावरुन झालेल्या वादानंतर मुलानेच जन्मदात्या वडिलांची हत्या करुन त्यांचा मृतदेह घरातच पुरुन ठेवल्याची धक्कादायक घटना शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पैठण तालुक्यातील कडेठाण या गावात उघडकीस आली. या घटनेमुळे पैठण तालुक्यात एकच खळबळ उडाली असून पोलिसांनी आरोपी मुलास ताब्यात घेतले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याण बापूराव काळे (५८ वर्ष), रा. कडेठाण असे




मयताचे नाव असून राम कल्याण काळे (२८ वर्ष), रा.कडेठाण असे वडिलांची हत्या करणाऱ्या मुलाचे नाव आहे. मयत कल्याण काळे हे पत्नी सुमन काळे आणि मुलगा राम काळे यांच्यासोबत राहत होते. तर त्यांचा मोठा मुलगा ऊसतोडीसाठी बाहेरगावी गेला आहे. दहा दिवसापुर्वी कल्याण काळे आणि मुलगा राम काळे यांच्यात वाद झाला होता. वादाचे पर्यावसन हाणामारीत झाल्यावर राम काळे याने वडिलांची हत्या करुन त्यांचा मृतदेह घराचत पुरुन ठेवला होता. मयताची पत्नी सुमन काळे ही भोळसर असल्याने तिने या घटनेची माहिती कोणाला दिली नाही. दरम्यान, काळे यांच्या घरातून कुजल्याचा वास येत असल्यामुळे या खुनाला शनिवारी वाचा फुटली.

या घटनेची माहिती मिळताच पाचोड पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पंडित, उपनिरीक्षक राम बारहाते यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी महसूल कर्मचारी, फॉरेन्सिक पथक यांच्या उपस्थितीत घरात पुरून ठेवलेल्या मृतदेह खड्ड्यातून बाहेर काढून घटनास्थळीच पंचनामा केला. पोलिसांनी आरोपी मुलगा राम काळे याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता किरकोळ कारणातून वाद निर्माण झाला व लथाबुक्यांच्या मारहाणीत कल्याण काळे यांचा मृत्यू झाला असल्याची कबुली दिली. याप्रकरणी राम काळे यांच्यविरुध्द पाचोड पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत ग्रामरक्षक दल उभारणार : सलीम चाऊस



**लासूर स्टेशन / प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यात गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चोरट्यांपासून ग्रामस्थांचे संरक्षण करण्यासाठी शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या प्रत्येक गावात ग्रामरक्षक दल उभारणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांनी दिली. तसेच ग्रामरक्षक दलाच्या स्वयंसेवकांना ओळखपत्र, शिट्टी आणि काठी देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या आवारात पोलिस पाटील, सरपंच, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष यांची बैठक शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी पार पडली. या बैठकीस पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांनी मार्गदर्शन केले.

गंगापूर तालुक्यात गेल्या काही दिवसापासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. चोरट्यांपासून ग्रामस्थांचे संरक्षण करण्यासाठी शिल्लेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या प्रत्येक गावात ग्रामरक्षक दल उभारणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. त्यासाठी संबंधित गावातील पोलिस पाटलाची मदत घेण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीला पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण भोजने, पोलिस अंमलदार तात्याराव बेदरे, श्रीकृष्ण दाणी, विष्णू जाधव, धनंजय गोंडे, हनुमंत सातपुते, राजेंद्र निसर्गे, चव्हाण,राठोड, अर्जुन तायडे, बाबा शेख आदींची उपस्थिती होती.

### अपघातात दुचाकीस्वार जखमी

**छत्रपती संभाजीनगर :** भरधाव वेगाने जाणाऱ्या हायवा ट्रकच्या धडकेत दुचाकीवरील तरुण जखमी झाल्याची घटना सिडको बस स्टॅन्ड सिग्नल जवळ घडली. या प्रकरणी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आदित्य महेंद्र जोगदंड, रा. काबरानगर गारखेडा परिसर यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास फिर्यादी दुचाकीवर सिडको बसस्थानक चौकातील सिग्नल जवळून जात असताना भरधाव वेगाने जाणाऱ्या हायवा ट्रकच्या चालकाने त्यांच्या दुचाकीस धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या डाव्या पायास व डाव्या हातास गंभीर मार लागला असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे.

### शेती विकत घेवून तयार केले विद्यार्थ्यांसाठी मैदान

# चिमुकल्यांच्या मैदानासाठी शिंदोळ ग्रामस्थांनी जमवला ५ लाखांचा ग्रामनिधी

**वरठाण / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ खेळणे फार महत्त्वाचे ठरते. चिमुकल्यांना मैदानावर जावून कबड्डी, खो-खो, फुगडी, रेस, कुस्ती आदी स्पर्धात्मक खेळ खेळता यावे यासाठी शिंदोळ येथील ग्रामस्थांनी ५ लाख रुपयांचा ग्रामनिधी जमवला आहे. या निधीतून शाळेजवळ शेती विकत घेवून त्यावर मैदान तयार करण्यात आले. तसेच मैदानाजवळच पारसबागही तयार करण्यात आली आहे.



जिल्हा परिषदेच्या वार्षिक नियोजन निधीतून शिंदोळ येथील शाळेला दोन वर्ग खोल्यांची मंजूरी यगेल्यावर्षी मिळाली होती. शासनाच्या निर्देशानुसार शिंदोळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने बालकांसाठी जिल्हा परिषदेच्या शाळेत बालसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी सर्वच विद्यार्थ्यांनी मैदानासाठी आग्रह धरला होता. विद्यार्थ्यांची मागणी लक्षात घेता मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून शिंदोळ येथील काही दानशूर व विद्यार्थी हित जोपासणाऱ्या नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या ग्रामनिधीसाठी पाच लाख रुपये जमा केले होते. जमा झालेल्या पैशातून शाळेजवळ शेती विकत घेऊन त्यावर शाळेच्या दोन वर्गखोल्या उभारण्यात आल्या असून उर्वरीत जागेवर मैदान तयार करण्यात आले.

दरम्यान, या ग्रामनिधी संकलन अभियानासाठी शाळेचे मुख्याध्यापक एस.एस.महाजन, उपशिक्षक बिरारी, पाटील, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान सोनवणे, उपाध्यक्ष छोटू भदाणे, सरपंच कल्पना बोरसे, सदस्य रत्ना भदाणे, छोट्याबाई मोरे, ग्रामपंचायत अधिकारी एस.पी.मोरे व ग्रामस्थांनी सहकार्य केले. मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत लहान बालकांचे देखील विचार लक्षात घेऊन त्या विचारांना न्याय देण्याचे काम शिंदोळ ग्रामपंचायत करत असल्याचे सरपंच कल्पना बोरसे यांनी यावेळी सांगितले.

### विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मागण्या पूर्ण करणार

■ गेल्यावर्षी बालदिनाच्या दिवशी बालसभेचे आयोजन करण्यात आले होते, यामध्ये विद्यार्थ्यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग, सीसीटीव्ही कॅमेरे, बोलक्या भिंती, अवांतर वाचनाची पुस्तके, इत्यादी गोष्टींची आणि शाळेसाठी मैदानाची मागणी केली होती. विद्यार्थ्यांच्या मागण्या त्यांच्या भविष्याच्या दृष्टीने रास्त असून लवकरात लवकर त्या पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे बालसंरक्षण समितीचे सदस्य तथा कार्यक्रमाचे समन्वयक जगदीश सोनवणे यांनी सांगितले.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
9021111549 / 7020614645
www.drshaikhah.com

## न्यूज ब्रीफ

### ८ कॅरमपटू विभागीय स्पर्धेसाठी पात्र

**परभणी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने १९ नोव्हेंबर रोजी आदर्श विद्यालय येथे आयोजित जिल्हास्तरीय शालेय कॅरम स्पर्धेत श्री वरद गणेश प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली. १४ वर्षांखालील मुलांच्या गटात सुरज कोंडामंगल, संघर्ष घोडके, नितेश तूपसमुद्रे, रघुवीर कन्हाळे यांनी उत्कृष्ट खेळ सादर केला. मुर्लीच्या गटात श्रुती गवते, रेणुका खाडे, सोनाक्षी ढगे आणि दुर्गा अंभुरे यांनी प्रभावी कामगिरी करत विशेष प्रावीण्य प्राप्त केले. या सर्व ८ खेळाडूंनी परभणी जिल्हा संघात स्थान निश्चित केले असून ते वसमत येथे होणाऱ्या विभागीय कॅरम स्पर्धेत जिल्हाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

### अस्वच्छता प्रकरणी दहा हजारांचा दंड

**जालना :** महानगरपालिकेच्या आयुक्त तथा जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या उपस्थितीत शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी शहरात श्रमदानातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मोहिमेदरम्यान या अनेक ठिकाणी स्वच्छतेकडे दुर्लक्ष केल्याचे जिल्हाधिकाऱ्यांना दिसून आले. स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल वैष्णवी कचोरी च्या मालकास ५ हजारांचा दंड आकारण्यात आला. तसेच, महानगरपालिका व उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक यांच्या वतीने शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान डॉ. दरगड हॉस्पिटल परिसरात रस्त्यावर कचरा जाळल्याचे आढळून आले. यामुळे महानगरपालिकेने हॉस्पिटलला ५ हजारांचा दंड ठोठावण्यात आला.

### महामार्गावर मॉर्निंग वॉक करताना काळजी घ्या

**गंगापूर :** पहाटेचे फिरणे आरोग्यासाठी उत्तम असले तरी महामार्गावर मॉर्निंग वॉक करणे जीवघेणे ठरू शकते, असा इशारा वाळूज पोलिसांनी दिला आहे. तुर्काबादखराडी-जळगाव, जिकठाण फाटा, वाळूज-जळगाव, रामनगर-रहीमपूर फाटा, २०नंबर खोलीपर्यंत नागरिक सकाळी फिरण्यासाठी जात असल्याचे निरीक्षण पोलिसांनी केले आहे. अलीकडे वाळूज-इसारवाडी फाटा, ढोरेगाव परिसरात गेल्या काही दिवसांत अपघातांच्या घटना घडल्या आहेत. पहाटेच्या वेळी वाहनचालक वेगात वाहन चालवत असल्याने अपघाताचा धोका अधिक वाढतो. त्यामुळे नागरिकांनी महामार्गावर मॉर्निंग वॉक करू नये, असे असे आवाहन गुरुवारी वाळूज पोलिस ठाण्याचे निरीक्षक शिवचरण पांढरे आणि सहायक फौजदार दशरथ खोसरे यांनी केले आहे.

### सेलगाव जि. प. शाळेत निबंध स्पर्धा उत्साहात

**बदनापूर :** तालुक्यातील सेलगाव येथील पीएम श्री जिल्हा परिषद शाळेत विधी सेवा प्राधिकरणाच्या वतीने निबंध स्पर्धा व कायदेविषयक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितेश बंडगर मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या पॉक्सो कायद्यासह महत्त्वाच्या कायद्यांची माहिती दिली. मुलांचे हक्क, गुन्हे प्रतिबंध, सुरक्षा, उपाययोजना याबाबत सविस्तर मार्गदर्शन करत शिस्त हीच उद्याच्या यशाची गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. निबंध स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांचा सत्कार करून प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी ॲड. प्रभाकर गवारे, मुख्याध्यापक अरविंद खरात, शालेय समितीचे अध्यक्ष कैलास अंभोरे, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## कार्यकर्त्यांच्या बैठकीत शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांचा दावा

# पैठण न.प.निवडणुकीत मतदार पिता-पुत्रांना धडा शिकवणार

**पैठण/प्रतिनिधी**

आगामी नगर परिषद निवडणुकीत पैठण शहरातील मतदार आमदार, खासदार पिता-पुत्रांना धडा शिकवणार असल्याचा दावा शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी केला आहे. पैठण नगर परिषद निवडणुकीसाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांनी उपस्थित शिवसैनिकांना आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.




पैठण शहरातील आशिर्वाद मंगल कार्यालयात झालेल्या या बैठकीस शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, शिवसेना (उबाठा) पक्षाचे उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे, माजी जिल्हाप्रमुख सुभाष पाटील, सुनिता आऊलवार, सुनिता देव, अविनाश कुमावत, तालुकाप्रमुख मनोज पेरे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती डॉ. सुनील शिंदे, विधानसभा संघटक सोमनाथ जाधव, माजी तालुकाप्रमुख अरुण काळे, शिवसेना (उबाठा) पक्षाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार अपर्णा दत्ता गोर्डे, नगरसेवक पदाच्या उमेदवार पोपट आडसुळ, रेणुका पठाडे, अनिल घोडके, स्नेहल धुपे, मंगल मगरे, सचिन घुंगासे, वैभव दहिफळे, कल्पना निवारे, निता कायस्थ, जगदीश गोरडे, मोना करकोटक, मनोज ढवळे, रोहित हिंगे, संगिता गायकवाड, जयकुमार पगारे, शफीक अवघड, दामिनी अजय परळकर, प्रल्हाद सव्वासे, कौसल्याबाई तुपे, शेख अब्बास कासम, जयश्री गौतम बनकर, मन्नान कुरेशी, शामशाद बेगम नुरूद्दीन वड्डे, शोभा सत्यनारायण लोहीया, परशुराम कमलाकर वानोळे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करतांना जिल्हा परिषदेचे माजी सभापती डॉ. सुनील शिंदे यांनी सांगितले की, आमदार, खासदार यांच्या पॅनलमध्ये जनाधार नसलेले व बदनाम झालेले ४ माजी नगराध्यक्ष व १७ माजी नगरसेवक यांना उमेदवारी दिली आहे. धनशक्तीच्या जोरावर उभ्या केलेल्या या पॅनलला आपल्या जनशक्तीची ताकद दाखवून द्या असे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी बोलतांना उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे यांनी पैठण शहरातील समस्यांचा पाढा वाचत प्रशासकीय कारभारात कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला.

### पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची गरज

■ धरण उशाला आणि कोरड घशाला अशी अवस्था पैठण शहरवासीयांची झाली आहे. पैठण शहरातील पाणी पुरवठा यंत्रणा अजूनही सक्षम झाली नाही, त्यामुळे पैठण शहरातील नागरिकांना २४ तास पाणी मिळत नसल्याची खंत यावेळी शिवसेना उपजिल्हाप्रमुख दत्ता गोर्डे यांनी व्यक्त केली. तसेच पैठण शहरातील पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्याची गरज असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## उंडणगावात सराफा दुकान फोडले; दीड लाखांचा ऐवज लंपास

**चार चोरटे सीसी कॅमेऱ्यात कैद..**

**सिल्लोड/प्रतिनिधी**

तालुक्यातील उंडणगावात चोरट्यांचा धुमाकूळ पुन्हा एकदा पाहायला मिळाला. आठ दिवसांतच गावांत दुसऱ्यांदा चोरीची घटना घडली आहे. चोरट्यांनी गुरूवार, २० नोव्हेंबर रोजी गावातील एक सोन्या, चांदीचे दुकान फोडून सुमारे दीड लाख रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी अजिंठा पोलिस ठाण्यात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उंडणगावात मुख्य बाजारपेठेत गजानन भांबरे यांच्या मालकीचे गजानन ज्वेलर्स हे सोन्या, चांदीचे दुकान आहे. गुरुवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास चोरट्यांनी या दुकानाच्या शटरचे लॉक उचकटून आणि भिंतीला भगदाड पाडून दुकानात प्रवेश केला. काही वेळातच दुकानातील दीड लाख रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने चोरून चोरट्यांनी पोबारा केला. सकाळी चोरीची घटना उघड होताच अजिंठा पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक ढाकणे, उपनिरीक्षक धम्मदीप काकडे, बीट जमादार जाधव यांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. गजानन भांबरे यांच्या तक्रारीवरुन चोरट्याविरुध्द अजिंठा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, गावातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चार चोरटे कैद झाले आहेत. त्यांनी चेहऱ्यावर मास्क घातल्याचे दिसत आहे. या घटनेनंतर गावातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

## कल्याणकर यांची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

**टेंभुर्णी :** क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली येथे आयोजित करण्यात आलेल्या विभागीय कॅरम स्पर्धेत श्रीमती जे बी के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयातील निकीता ज्ञानेश्वर कल्याणकर यांनी उत्कृष्ट कामगिरी केली. निकीता कल्याणकर यांच्या कामगिरीची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे.

क्रीडा व युवक सेवा संचलनालय, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे २१ व २२ नोव्हेंबर रोजी विभागीय शालेय कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

## 'त्या' रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम निष्काशित करा; न्यायालयाचे आदेश

**परभणी/प्रतिनिधी**

येथील कच्छी बाजार येथील नटराज रंग मंदिरासमोरून जुना मोंढ्याकडे जाणाऱ्या ९ मीटर रुंदीच्या रस्त्यावर केलेले अतिक्रमण पाडण्याचा आदेश जिल्हा व सत्र न्यायाधीश निरंजन नाईकवाडे यांच्या न्यायालयाने दिला आहे.

२०१८ मध्ये या अनधिकृत बांधकामाची तक्रार स्थानिकांनी केली होती. मनपा आयुक्त, प्रधानमंत्री पोर्टल, मुख्यमंत्री पोर्टल याठिकाणी तक्रार नोंदविली होती. मात्र त्यात काहीच झाले नाही. केवळ मनपाने प्रादेशिक नगर रचना अधिनियमान्वये अनधिकृत बांधकाम पाडण्याची नोटीस तेवढी बजावली होती. मात्र हनुमानदास सोनी, विनोद सोनी, बद्रीनारायण सोनी, धनराज सोनी व इतरांनी हे बांधकाम थांबविले नव्हते. त्यामुळे संजय चांडक यांनी न्यायालयात दाद मागितली. यामध्ये न्यायालयाने बांधकाम न करण्याचे आदेश दिले. मात्र तरीही हे बांधकाम पूर्ण करण्यात आले होते.




अंतिम न्यायनिवाड्यात वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश फटांगळे यांनी सरकारी रस्त्यावरील अनधिकृत बांधकाम पाडण्याचा आदेश दिला. त्यानंतर मयत हनुदानदास सोनी यांच्या वारसांनी जिल्हा व सत्र न्यायालयात अपील दाखल केले. त्यात १५ नोव्हेंबर रोजी अंतिम निर्णय झाला. जिल्हा व सत्र न्यायाधीश नाईकवाडे यांनी सोनी यांच्या वारसांनी हे अनधिकृत बांधकाम काढून घेण्याचे आदेश दिले. त्यांनी न काढल्यास मनपाने हे ९ मीटर रस्त्यावरील अतिक्रमण पाडावे, असे आदेश दिले आहेत. ॲड. व्ही.एन. पोहंडूळकर व ॲड. किरण चांडक यांनी हे प्रकरण चालविले.

## त्रिभाषा धोरण निश्चिती समिती बुधवारी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्याबाबत राज्य शासनाने गठीत केलेल्या डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समिती लोकांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे येत आहे.



यासंदर्भात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पूर्वतयारीचा आढावा शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी घेतला. यावेळी शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, शिक्षणाधिकारी अरुण शिंदे, जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र कांबळे, डॉ. विशाल तायडे, विवेकानंद महाविद्यालयाचे प्रा. केशरचंद राठोड, पवनकुमार गोरे, देवगिरी महाविद्यालयाच्या प्रा.डॉ.समिता जाधव, डॉ. एम. एफ. मेवाड, पोलीस निरीक्षक शिवाजी तावरे आदी उपस्थित होते. बैठकीत माहिती देण्यात आली की, त्रिभाषा धोरण निश्चिती समिती मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी रोजी रात्री जिल्ह्यात येणार असून बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजेपासून एमआयटी महाविद्यालयाच्या आनंद सभागृहात समिती विविध घटकांना भेटणार आहे.

या समितीत अध्यक्ष डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य डॉ. सदानंद मोरे, डॉ. वामन केंद्रे, डॉ. अर्पणा मॉरिस, डॉ. सोनल कुलकर्णी, डॉ. मधुश्री सावजी, डॉ. भूषण शुक्ल, सदस्य सचिव संजय यादव राज्य प्रकल्प संचालक समग्र शिक्षा अभियान आदींचा समावेश असणार आहे. ही समिती येणाऱ्या सर्व घटकांतील तज्ज्ञांचे म्हणणे ऐकून घेईल. तसेच संवाद साधेल, असे यावेळी सांगण्यात आले. यावेळी विभागातील पाचही जिल्ह्यातील लोक सहभागी होऊन आपले म्हणणे सादर करतील. बाहेरील जिल्ह्यातील लोकांना म्हणणे सादर करण्या करीता ज्यांना येथे येणे शक्य नाही त्यांच्यासाठी त्या त्या जिल्ह्यातून दूरदृष्य प्रणालीची सुविधा उपलब्ध करुन द्यावी,असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले.

## जे.बी.के.विद्यालयात शिक्षक-पालक मेळावा

**टेंभुर्णी/प्रतिनिधी**

नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित. श्रीमती. जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी स्वर्गीय गोपीकिशन काबरा यांच्या स्मरणार्थ शिक्षक-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या शिक्षक-पालक मेळाव्याला इयत्ता दहावी आणि बारावीतील विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते.

श्रीमती. जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात झालेल्या शिक्षक - पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव सत्यनारायण सोनी हे होते. याप्रसंगी शिक्षक - पालक संघ समितीचे उपाध्यक्ष मनोज पंडित, संचालक. प्रा.डि.एस. देशमुख, मुख्याध्यापक. व्हि.के.जाधव, सांस्कृतिक




कार्यक्रम प्रमुख. एस.बी.बोरकर, रेखा सपकाळ, सुरेश साळुंखे, किशोर कांबळे, शांताराम पवार, राजु गवई, संतोष साळवे, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक. व्हि.के.जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक-पालक मेळावा आयोजित करण्या मागची भूमिका व उद्देश या विषयावर आपले मत मांडले. तसेच इयत्ता दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना बोर्ड परिक्षेला सामोरे जातांना घ्यायची काळजी या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सत्यनारायण सोनी, शिक्षक-पालक समितीच्या सदस्या रेखा सपकाळ, एस.बी.बोरकर यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिवसन ससाणे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार राजेंद्र जगताप यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश इंगळे, संजय कुलकर्णी, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे, डि.एस.उखर्डे, समाधान कांबळे, रवींद्र मोरे, प्रा.सुनिल बनसोडे, प्रा.डॉ.अरूण आहेर, सि.डी.उखर्डे, प्रा.रामदास भांगे, प्रा.के. जी.जाधव, प्रा.गजानन धोटे, प्रा.डॉ.आनंद जाधव, वासुदेव क्षिरसागर,, उज्वला आवटी, मंजुषा भिलावेकर, एफ.ए.शेख, ज्योती जाधव, राजुभाऊ डोमळे, विजया लंबे, दिपक देशमुख आदींनी परिश्रम घेतले.

## श्री लक्ष्मीनारायण मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन

**परभणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील जांब येथे श्री लक्ष्मीनारायण मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे आयोजन २५ ते २८ नोव्हेंबर दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक संग्राम बाळासाहेब जामकर यांनी दिली. जांब येथील सावळेश्वर मंदिर परिसरात हा प्राणप्रतिष्ठा सोहळा होणार असून यानिमित्ताने अखंड हरिनाम कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.



श्री लक्ष्मीनारायण मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मंगळवार, २५ नोव्हेंबर रोजी हभप मोहन महाराज रेंगे, जामकर, बुधवार, २६ नोव्हेंबर रोजी हभप नामदेव महाराज चारठाणकर, गुरुवार, २७ नोव्हेंबर रोजी हभप मधुकर महाराज सायाळकर यांचे कीर्तन होणार आहे. तर शुक्रवार २८ नोव्हेंबर रोजी आक्रुर महाराज साखरे यांचे काल्याचे कीर्तन सकाळी अकरा ते दुपारी एक वाजेदरम्यान होणार आहे. काल्याचे कीर्तन झाल्यावर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे. श्री लक्ष्मीनारायण मुर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कीर्तन सोहळ्याचा लाभ भाविकांनी घ्यावा असे आवाहन संग्राम जामकर यांनी केले आहे.

## महिलांची छेडछाड थांबवा; रोडरोमीओंचा बंदोबस्त करा

**महिलांचे पोलिस अधिक्षकांना साकडे..**

**परभणी/प्रतिनिधी**



शहरातील शालेय तसेच महाविद्यालयीन मुलींच्या सोबत टवाळखोर आणि रोडरोमिओ यांच्याकडून होणाऱ्या छेडछाडीच्या घटनांना आळा बसवावा तसेच शहरात दामिनी पथक सक्रिय करून विविध ठिकाणी पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी महिला वर्गाकडून करण्यात आली. टवाळखोर तसेच रोडरोमीओंचा बंदोबस्त करावा, या मागणीचे साकडे पोलिस अधीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे घालण्यात आले.

शहरात गुरुवार, २० नोव्हेंबर रोजी महाविद्यालयीन मुलीची ऑटोरिक्षा चालकाने छेड काढण्याची घटना घडली होती. यानंतर या भेदरलेल्या मुलीने बसस्थानकात आल्यानंतर काही नागरिकांना घडलेल्या प्रकाराची माहिती दिली. त्यानंतर पोलिसांनी यात गुन्हाही दाखल केला आहे. या घटनेतील आरोपीला तत्काळ अटक करून त्यावर कायदेशीर कारवाई करावी तसेच शहरातील शाळा, महाविद्यालय परिसर, खासगी शिकवणी, मुख्य बाजारपेठ, बसस्थानक आणि विविध ठिकाणी टवाळखोर यांची वाढलेली संख्या पाहता पोलिसांनी गस्त वाढवावी आणि बंदोबस्त करावा अन्यथा याबाबत महिला वर्गाकडून आंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला. निवेदनावर डॉ. नम्रता पाटील, डॉ. मंजुषा जोशी नरवाडकर, डॉ. अर्चना जटानिया, रूपाली ठाकरे, अपर्णा जोशी यांच्या स्वाक्षरी आहेत.

**नगराध्यक्ष पदासाठी ३ तर नगरसेवक पदासाठी ८० जण रिंगणात**

# वैजापूर नगरपालिकेत तिरंगी लढत !

**वैजापूर/प्रतिनिधी**

नगर परिषदेच्या निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी अखेर नगराध्यक्ष पदाचे एक उमेदवार व नगरसेवक पदाच्या १३ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता नगराध्यक्ष पदासाठी ३ व नगरसेवकांच्या २५ जागांसाठी ८० जण प्रत्यक्षात निवडणूक रिंगणात उतरले आहेत. नगर परिषद निवडणुकीत महाविकास आघाडी, महायुती व शिवसेना अशी तिरंगी लढत होणार आहे.




महायुतीत भाजप व अजीत पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसची युती आहे. महाविकास आघाडीत शिवसेना (उबाठा) पक्ष, काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) यांचा समावेश आहे. तर शिवसेनेने (शिंदे गट) स्वतंत्र उमेदवार उभे केले आहे. नगराध्यक्ष पदासाठी सुभाष गायकवाड (काँग्रेस), दिनेश परदेशी (भाजप), संजय बोरनारे (शिवसेना) या तिघांमध्ये लढत होणार आहे. या निवडणुकीत शिवसेनेने सर्वाधिक २५ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. भाजप व अजित पवार गटाने अनुक्रमे १९ व ८ जागांवर उमेदवार उभे केले आहेत. शिवसेना (उबाठा) पक्षाचे - ३, काँग्रेस - ९ व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) ३ उमेदवार उभे आहेत. तर ९ अपक्ष उमेदवार निवडणूक रिंगणात आपले नशीब आजमावत आहेत. एमआयएम व वंचित बहुजन आघाडीचे प्रत्येकी दोन उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून डॉ अरूण जऱ्हाड हे काम पाहत आहे. त्यांना तहसीलदार सुनील सावंत व मुख्याधिकारी भागवत बिघोत हे सहाय्य करीत आहेत.

दरम्यान, प्रभाग १- अनुसुचीत जमाती महिला-२, सर्वसाधारण -४, प्रभाग२-अनुसुचीत जाती महिला-२, सर्वसाधारण ३, प्रभाग ३-अनुसुचीत जमाती महिला -३, सर्वसाधारण -४, प्रभाग -४-नागरीकांचा मागास प्रवर्ग -३, सर्वसाधारण महिला -३, प्रभाग -५-नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला -२, सर्वसाधारण -२, प्रभाग-६-नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला-३, सर्वसाधारण -४, प्रभाग -७-अनुसुचीत जाती-४, सर्वसाधारण महिला -३, प्रभाग -८-नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला -२, सर्वसाधारण -२, प्रभाग ९-नागरीकांचा मागास प्रवर्ग -३, सर्वसाधारण महिला -२, प्रभाग-१०-सर्वसाधारण महिला -३, सर्वसाधारण -४, प्रभाग-११-नागरीकांचा मागास प्रवर्ग -३, सर्वसाधारण महिला -४, प्रभाग-१२-अनुसुचीत जाती-८, नागरीकांचा मागास प्रवर्ग महिला -३, सर्वसाधारण महिला -३ प्रभाग क्रमांक ११ मध्ये भाजप व अजीत पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेस ची अ नागरीकांचा मागास प्रवर्ग व ब मध्ये सर्वसाधारण महिला या जागाची युती फिसकटली. तेथे दोन जागेवर मैत्री पुर्ण लढत असल्याचे सांगण्यात आले.

### मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची दमछाक

■ वैजापूर नगर परिषदेसाठी प्रभाग निहाय निवडणूक होत आहे. तसेच निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवारांना जेमतेम तीन ते चार दिवसांचा कालावधी मिळाला असल्याने जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची चांगलीच दमछाक होत असल्याचे चित्र वैजापूर शहरात दिसून येत आहे. राजकीय पक्षाच्या उमेदवारांकडे त्यांच्या हक्काचे निवडणूक चिन्ह असून अपक्ष उमेदवारांना मोठी कसरत करीत मतदारांपर्यंत पोहोचावे लागणार आहे.

## न्यूज ब्रीफ

### वाघाडी सरपंचाची बिनविरोध निवड

**मंठा :** तालुक्यातील वाघाडी या गावातील सरपंच पदच्या निवडणुकीच्या विशेष सभेमध्ये धर्माबाई बापुराव पवार यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या बाजूने उपस्थित सहा पैकी सहा सदस्यांनी हात वर करून मतदान केले. त्यानतर सरपंच म्हणून पवार यांच्या बिनविरोध निवडीची घोषणा करण्यात आली. या विशेष सभेसाठी ग्रामविकास अधिकारी पी.एम. वाघ, तलाठी के. बी. डोईफोडे, नवनिर्वाचित पोलिस पाटील अंगदराव टेळके, ग्रामपंचायत कर्मचारी आसाराम वायसे यांनी कामकाज पाहिले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य फकीराम बापूराव बोडखे, ज्ञानेश्वर धुमा राठोड, अंबिका भाऊसाहेब टेकाळे, सुशिलाबाई गोकुळ राठोड, द्वारकाबाई गोकुळ लोंढे, ग्रामस्थ उपस्थित होते.

### हुंडा विरोधी सप्ताहाचे आयोजन

**जालना :** हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार राज्यस्तरावर आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हास्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि तालुकास्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी हे हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत. प्रत्येक हुंडा प्रतिबंधक अधिकारी आणि जिल्ह्यातील सर्व सुजान नागरिकांनी २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून तर त्यापुढील ७ दिवस हुंडा बंदी सप्ताह म्हणून साजरा करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### वालसावंगी ग्रामपंचायतने बांधले वनराई बंधारे



**धावडा :** भोकरदन तालुक्यातील वालसावंगी ग्रामपंचायतच्या वतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत येथील विविध भागात ओढ्या व नाल्याचे वाहणारे पाणी आडवण्यासाठी लोकसहभागातून वनराई बंधारे बांधण्यात आले. या बंधाऱ्यांमुळे वाहून जाणारे पाणी आडविण्यात आले असून यामुळे शेतकऱ्यांना रब्बी हंगामात पिकांना पाणी देण्यासाठी मोठी मदत होणार आहे. यावेळी ग्रामविकास अधिकारी सुनील पडोळ, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी, व ग्रामस्थांनी उपस्थीत राहून वनराई बंधारे तयार केले.

## मिशनमोडमध्ये कामे राबविण्याचे सीईओ यांचे आवाहन

# आता जिल्ह्यात घरकुल विशेष मोहीम

जालना / प्रतिनिधी

घरकुल बांधकामाला गती देण्यासाठी जालना जिल्हा परिषदेच्या वतीने २४ ते २८ नोव्हेंबर या कालावधीत पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेची अंमलबजावणी मिशन मोडमध्ये करण्यात यावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी शनिवारी केले.

या विशेष मोहिमेदरम्यान लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करणे, ई-केवायसी पूर्ण करणे, तसेच आवश्यक कागदपत्रांशी संबंधित अडचणी शिबिर पद्धतीने सोडवण्यात येणार आहेत. जमीन नसलेल्या पात्र लाभार्थ्यांना नियमानुसार जमीन उपलब्ध करून देणे आणि प्रत्येक तालुक्यात घरकूल बांधकामासाठी योग्य जागांची निवड करणे या बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे. पर्यावरणपूरक, अल्पखर्चिक नवीन घरकूल मॉडेल्स तयार करून त्यांची तत्काळ अंमलबजावणी करण्याचे निर्देश गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.



**घरकुलांना गती मिळणार**

■ या विशेष मोहिमेमुळे जिल्ह्यातील घरकूल बांधकाम प्रक्रियेला गती मिळून अधिकाधिक लाभार्थ्यांना वेळेत लाभ मिळणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

यासोबतच राज्य व केंद्र शासन पुरस्कृत घरकूल योजनांतील प्रलंबित प्रकरणांना त्वरीत मंजुरी देण्याचे आदेश देण्यात आले असून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पहिला हप्ता ३० नोव्हेंबरपूर्वी वितरित करण्याबाबतही स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत.



घरकुल बांधकामाच्या कामांवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक पंचायत समितीत एक विस्तार अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून आरएचई रोजगार सेवक आणि ग्रामसेवक यांनी संयुक्तपणे मस्टर नोंदी व घरकूल कामांची पडताळणी करावी, अशा स्पष्ट सूचनाही सीईओ मिन्नू पी. एम. यांनी दिल्या आहे.

## रॉडने मारहाण; उपचारादरम्यान तरुणाचा मृत्यू

जालना/प्रतिनिधी

गाडी जाळल्याच्या संशयातून एका तरुणाला रॉडने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी समोर आली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या तरुणाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे.



सागर भगवान आगलावे ( वय अंदाजे १८ वर्षे, रा. भवानीनगर, जालना ) असे मयत. तरुणाचे नाव आहे. शहरातील भवानीनगर भागात काही दिवसांपूर्वी सागर आगलावे याला गाडी जाळल्याच्या संशयावरून २ ते ३ जणांनी अडवून लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. या हल्ल्यात सागर गंभीर जखमी झाला होता. त्याला तातडीने जालना जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींच्या शोधासाठी पोलिसांचा तपास सुरू आहे. दरम्यान, जोपर्यंत आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत मृतदेह ताब्यात न घेण्याचा पवित्रा मयताच्या नातेवाईकांनी घेतला. त्यामुळे रुग्णालय परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

## निवडणूक फक्त सत्तेसाठी नव्हे तर विकासासाठी

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रतिपादन

परतूर/प्रतिनिधी

सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही निवडणूक फक्त सत्तेसाठी नसून सर्वांगीण विकासाची दिशा ठरवणारी आहे, असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा उपमुखमंत्री अजित पवार यांनी येथे केले.

परतूर नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अजित पवार यांनी शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी सभा घेऊन शक्तिप्रदर्शन केले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंद चव्हाण, सुरेश जेथलिया यांच्यासह निवडणुकीच्या रिंगणातील उमेदवारांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना पवार म्हणाले, अनुभवी, तरुण आणि नव्या चेहऱ्यांचा समतोल साधत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सक्षम उमेदवारांची टीम जनसेवेखातर उभी केली आहे.

ही निवडणूक फक्त सत्तेसाठी नसून विकासाची दिशा ठरवणारी असल्याचे सांगत परतूरचा विकास हा नियोजनबद्ध तर असायलाच हवा, पण तो सर्व समाजघटकांना सोबत घेणारा असला पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. पुढील पाच वर्ष निधीची कोणतीही कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही देखील पवार यांनी दिली.



**बारामतीसारखा विकास करू**

■ राज्यातील नगरपालिकांचा आगामी काळात बारामती आणि पिंपरी चिंचवडसारख्या शहरांप्रमाणेच विकास करून दाखवू , अशी ग्वाही देत परतूरमध्येही मोठ्या प्रमाणावर विकासकामे राबवण्याचा निर्धार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला.

## राजेवाडी येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत उभारला वनराई बंधारा

बदनापूर/प्रतिनिधी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत तालुक्यातील राजेवाडी येथे गट क्रमांक ८७६ मधील ओढ्यावर शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने श्रमदानातून वनराई बंधारा उभारण्यात आला. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या या कामामुळे गावातील जलसंवर्धनाच्या प्रयत्नांना नवी ऊर्जा मिळाली आहे.

यावेळी सरपंच कमलबाई गुसिंगे, प्रतापराव गुसिंगे, उपसरपंच रेखा गुसिंगे, नोडल समन्वय अधिकारी सुशिल बोंदर, शालेय समिती अध्यक्ष रंजित शेजुळ, मुख्याध्यापक जगत घुगे, सहाय्यक शिक्षक परमेश्वर मोरे, सुपडसिंग गुसिंगे, रामसिंग गुसिंगे, जगदिश गुसिंगे, अंगणवाडी सेविका पुष्पा ओहळ, रोजगार सेवक राजेंद्र घोरपडे, नितीन चाळगे आदींसह सहशिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमामुळे पावसाच्या पाण्याचा योग्य साठा होऊन भूजल पातळीत वाढ होण्यास मदत होणार आहे.



ग्रामीण भागातील जलसाठा व जल पातळी सुधारण्यासाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. शाळा, ग्रामपंचायत, ग्रामस्थांच्या सहभागातून आणि प्रशासनाच्या सक्रिय सहकार्याने उभारण्यात आलेल्या या बंधाऱ्यामुळे राजेवाडी परिसरातील जलसंपदा मजबुत होऊन शेती व पशुपालनाला आवश्यक तो फायदा होणार आहे. ग्रामस्थांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाबद्दल समाधान व्यक्त करून प्रशासनाचे आभार मानले.

## जामवाडी येथे संत भागीरथी माई पुण्यतिथी उत्सव



**जालना :** जामवाडी येथील संत भागीरथी माई यांच्या पुण्यतिथी उत्सव सोहळ्याला यंदा अभूतपूर्व उत्साह लाभला. अध्यात्म, भक्तिभाव आणि परंपरेचा समृद्ध संगम असलेल्या या महोत्सवाचा मुख्य आकर्षण ठरला. पवित्र नारळाची पारंपरिक तब्बल १ लाख १ हजार रुपयांची बोली घेण्याचा मान दीपक डोंगरे यांना मिळाला. सकाळच्या सत्रात हभप प्रभाकर महाराज सुरोशे यांनी संतवाणी, ओवी आणि काल्याचे कीर्तन सादर केले. कीर्तनानंतर दहीहंडी फोडून पवित्र नारळ काढण्यात आला.

## मोबाईल चोरीचा छडा; सपोनि संतोष माने व टीमचा एसपींकडून सत्कार

धावडा/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील पिंपळगाव रेणुकाई येथे काही दिवसापूर्वी मोबाईल चोरी व विक्री करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश करत आरोपींना जेरबंद करण्यात आले होते. या कारवाईत महत्वाची भूमिका बजावणाऱ्या पारध पोलीस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष माने, अंमलदार संतोष जाधव, गणेश निकम यांना उत्कृष्ट मालमत्ता हस्तगत २०२५ या पुरस्काराने गौरविण्यात आले.

पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन माने व त्यांच्या टीमचा गुरूवार, २० नोव्हेंबर रोजी गौरव करण्यात आला. २८ सप्टेंबर रोजी पारध पोलीसांना मिळालेल्या माहितीनंतर पिंपळगाव रेणुकाई गावात सपोनि संतोष माने यांनी तत्काळ पथकासह घटनास्थळी धाड टाकली. संशयितास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, त्याच्या ताब्यात १८ मोबाईल आढळून आले. या मोबाईलची किंमत २ लाख ६४ हजार रुपये इतकी असल्याचे तपासात निष्पन्न झाले. या कारवाईमुळे चोरीच्या मोबाईल विक्रीचे रॅकेट समोर आले होते. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलिस अधीक्षक कार्यालयात आयोजित कार्यक्रमात पारध पोलिसांना विशेष प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी पोलिस अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




## परतूर शहरात निवडणुकीसाठी ३६ मतदान केंद्र



परतूर/प्रतिनिधी

शहरात निवडणूक विभाग तसेच प्रशासनाची नगरपरिषद निवडणुकीसाठी जोरदार तयारी सुरु झाली आहे. परतूर शहरातील विविध प्रभागात एकूण ३६ मतदान केंद्रांची स्थापना करण्यात आली असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रणाली तायडे यांनी दिली आहे.

दरम्यान, काही प्रभागात दोन तर काही प्रभागात तीन मतदान केंद्रे असतील, अशी माहिती तायडे यांनी दिली. परतूर नगरपरिषद निवडणुकीसाठी एकूण ३३ हजार ९६ मतदार आहेत.१६ हजार ४०९ पुरुष तर १६ हजार ६८७ महिला मतदार आहेत. येत्या २ डिसेंबर रोजी निवडणुकीची मतदान प्रक्रिया पार पडणार असून दुसऱ्या दिवशी अर्थात ३ डिसेंबर रोजी निकाल घोषित करण्यात येणार आहे. शहराच्या विविध प्रभागांमध्ये ३६ मतदान केंद्रे असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे यांनी दिली आहे.

## शैक्षणिक संस्थांचे सुरक्षा लेखा परीक्षण करावे

### अंकुश पाचफुले यांची शिक्षण मंत्र्यांकडे मागणी

जालना/प्रतिनिधी

शहरासह जिल्ह्यातील सर्व अनुदानित, विनाअनुदानित, शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्गांचे सुरक्षा लेखा परीक्षण करावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अंकुश पाचफुले यांनी शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्याकडे केली आहे.

शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी सीटीएमके शाळेतील दुर्घटनेनंतर अंकुश पाचफुले यांनी शिक्षण मंत्र्यांना पाठवलेल्या ऑनलाईन निवेदनात म्हटले आहे की, जालना महानगरपालिका हद्दीत अनुदानित, विनाअनुदानित शाळा, महाविद्यालये तसेच खाजगी शिकवणी क्लासेसमध्ये दररोज हजारो विद्यार्थी शिक्षण घेण्यास जातात. तथापि काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सीसीटीव्ही कॅमेरे, अग्निशमन यंत्र अशा आवश्यक सुविधांचा अभाव असून यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. आजच्या घटनेतून बोध घेऊन सर्व शैक्षणिक संस्थांचे लवकरात लवकर सुरक्षा लेखा परीक्षण करण्यासाठी आदेश द्यावेत, अशी मागणी अंकुश पाचफुले यांनी केली आहे.



## अंबड नगरपालिका निवडणुकीत होणार तुल्यबळ लढती

# नगराध्यक्ष पदासाठी पाच, २२ नगरसेवक पदांसाठी ७५ उमेदवार रिंगणात

रामदास पटेकर

**अंबड :** येथील नगरपालिका निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत संपल्यानंतर नगराध्यक्ष पदासाठी एकूण १४ तर नगरसेवक पदाच्या २२ जागांसाठी १३२ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी ५, तर नगरसेवकपदासाठी तब्बल ७५ उमेदवार निवडणूक रिंगणात असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार विजय चव्हाण आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी मनोन उकिरडे यांनी दिली.

अंबड नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपा, महाविकास आघाडी तसेच शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने शेवटच्या दिवशी मोठी गर्दी केल्याने ही निवडणूक एकतर्फी होणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिला गटासाठी असून, यासाठी एकूण ५ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपाकडून देवयानी केदार कुलकर्णी व मविआच्या श्रद्धा शिवप्रसाद चांगले यांच्यामध्ये तुल्यबळ लढत होण्याची शक्यता वर्तविली जात असली तरी शिवसेना शिंदे गटाच्या वतीने देखील उमेदवार देण्यात आल्याने या निवडणुकीत चुरस निर्माण झाली आहे.

**दोन उमेदवारांना लाभलेला राजकीय वारसा**

■ भाजपाच्या वतीने निवडणूक रिंगणात असलेल्या देवयानी केदार कुलकर्णी यांचे सासरे स्वर्गीय बाबूराव कुलकर्णी तसेच श्रद्धा शिवप्रसाद चांगले यांचे सासरे सुरेश चांगले यांनी अंबडचे नगर परिषदेचे नगराध्यक्षपद भूषविलेले आहे. त्यामुळे या दोन्हीही उमेदवारांना राजकीय वारसा परंपरेने लाभलेला आहे. तसेच देवयानी कुलकर्णी यांचे पती केदार कुलकर्णी यांनी अनेक वर्षांपासून अंबड नगरपालिकेमध्ये उपनगराध्यक्ष पद तसेच नगरसेवक पद सांभाळले आहे. तसेच श्रद्धा चांगले यांचे पती शिवप्रसाद यांनी देखील गटनेते तसेच नगरसेवक पद भूषविले आहे. दोघांचाही युवक तसेच ज्येष्ठ मतदारांसोबत दांडगा संपर्क असल्यामुळे या निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठीची ही लढत नक्कीच चुरस निर्माण करणारी ठरणार आहे.



**राजेश टोपे शहरात तळ ठोकून**

■ अंबड नगरपलिकात महाविकास आघाडीकडून निवडणुकीची सूत्रे माजी मंत्री राजेश टोपे यांनी हाती घेतली आहेत. तसेच भाजपाच्या वतीने आमदार नारायण कुचे यांनी सूत्रे हाती घेतली आहेत. माजी आरोग्यमंत्री टोपे हे स्वतः मागील अकरा दिवसांपासून शहरात तळ ठोकून आहेत. आ. कुचे तसेच टोपे हे सर्व अकरा प्रभागाच्या बैठकीतून मार्गदर्शन करत आहेत. ही नगर परिषदेची निवडणूक या दोघांसाठी प्रतिष्ठेची ठरत असून कोण बाजी मारतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**मत विभाजनाचा मविआला फायदा ?**

■ अंबड नगरपालिकाच्या निवडणुकीत भाजपाने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महायुतीतील शिवसेना शिंदे गटाने नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्याने मतं विभागणी किती प्रमाणात होईल? व महायुतीत माताचे विभाजन झाल्याने याचा फायदा महविकास आघाडीला होईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे महायुतीत झालेल्या बिघाडीचे ऐनवेळी वरिष्ठाचा आदेश आल्यानंतर युतीमध्ये रूपांतर झाल्यास महाविकास आघाडीशी एकतर्फी निवडणूक होईल, असे जाणकार सांगतात. मात्र युती न झाल्यास महाविकास आघाडीला सरळ-सरळ या निवडणुकीत फायदा होऊ शकतो, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.

## अवैध विदेशी दारू वाहतुकीवर पोलिसांची कारवाई

जालना / प्रतिनिधी

तालुक्यात अवैधरित्या विदेशी दारूची वाहतूक करणाऱ्यावर जालना पोलिसांनी कारवाई केली आहे. या कारवाईत साडेतेरा हजार रुपये किंमतीचा विदेशी दारूचा साठा जप्त करण्यात आला. शनिवार, २२ नोव्हेंबर रोजी सकाळी तालुका जालना पोलिसांना एका व्यक्तीकडून अवैधरीत्या विदेशी मद्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी जालना तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून संबंधित व्यक्तीला रंगेहाथ ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडून विदेशी दारूचा साठा जप्त केला असून या मुद्देमालाची अंदाजे किंमत साडे तेरा हजार रुपये इतकी आहे. याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर सनसनाटी विजय

## पहिल्या ॲशेस कसोटीचा अवघ्या दोन दिवसांत निकाल





**पर्थ :** ॲशेस मालिकेतील पहिल्या कसोटीचा निकाल फक्त दोन दिवसात लागला. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडवर ८ विकेटने सनसनाटी विजय मिळून पाच सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. पहिल्या डावात इंग्लंडचा डाव फक्त १७२ धावांत संपुष्टात आला होता. त्यानंतर इंग्लंडच्या गोलंदाजांनी ऑस्ट्रेलियाला फक्त १३२ धावात रोखले आणि आघाडी घेतली होती. मिचेल स्टार्कच्या १० विकेट्स आणि ट्रेव्हिस हेडच्या वादळी शतकापुढे इंग्लंडचा 'बॅझबॉल' फिका पडला.

### मिचेल स्टार्क सामनावीर

ऑस्ट्रेलियाकडून दोन्ही डावात मिळून १० विकेट घेणाऱ्या मिचेल स्टार्कला सामनावीर पुरस्कार देण्यात आला. त्याने पहिल्या डावात ७ तर दुसऱ्या डावात ३ विकेट घेतल्या. सामन्या इंग्लंडच्या फलंदाजांनी अतिशय खराब कामगिरी केली. जो रुट सारखा अनुभवी फलंदाज पहिल्या डावात शून्यावर तर दुसऱ्या डावात फक्त ८ धावा करून माघारी परतला. इंग्लंडने दुसऱ्या डावात फक्त ६ चेंडूत तीन विकेट गमावल्या. ज्यात ब्रूक आणि रुट यांच्या विकेटचा समावेश होता.

इंग्लंडचा संघ दुसऱ्या डावात चमकदार कामगिरी करेल असे वाटत होते. मात्र त्यांच्या फलंदाजांनी निराशा केली. इंग्लंडचा दुसरा डाव फक्त १६४ धावात संपुष्टात आला. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या डावात विजयासाठी फक्त २०५ धावांचे लक्ष्य मिळाले. ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात इंग्लंडला त्यांच्याच स्टाइलने उत्तर दिले. कसोटीत बेझबॉल खेळासाठी ओळखल्या जाणाऱ्या इंग्लंडला त्याच प्रकाराने ऑस्ट्रेलियाने उत्तर दिले. ऑस्ट्रेलियाच्या दोन्ही फलंदाजांनी आक्रमक फलंदाजी केली. दुसऱ्या डावात ऑस्ट्रेलियाने पहिली विकेट ७५ धावांवर गमावली. मात्र सलामीवीर ट्रेव्हिस हेडने टी-२० स्टाइलने फलंदाजी केली. त्याने फक्त ६९ चेंडूत शतक पूर्ण केले. ॲशेस मालिकेतील हे सर्वात खास शतक मानले जात आहे. हेडने ८३ चेंडूत ४ षटकार आणि १६ चौकारांसह १२३ धावा केल्या. हेड बाद झाला तेव्हा ऑस्ट्रेलिया विजयाच्या जवळ पोहोचला होता. संघाच्या विजयाची औपचारीकता मार्नस लाबुशेनने अर्धशतकी खेळी करत पूर्ण केली.

# भ्रष्टाचाराचे आरोप: अखिलेश रेड्डी आयसीसी कडून निलंबित

**दुबई :** अमेरिकन क्रिकेटपटू अखिलेश रेड्डी यांच्यावर शुक्रवारी अबुधाबी टी-१० २०२५ शी संबंधित भ्रष्टाचार विरोधी संहितेचे तीन उल्लंघन केल्याचे आरोप ठेवण्यात आले आहेत. अबुधाबी टी-१० लीगमध्ये यूपी नवाब संघाकडून खेळणाऱ्या २५ वर्षीय ऑफ-स्पिनरला आयसीसीने तात्काळ निलंबित केले आहे आणि आरोपांना उत्तर देण्यासाठी १४ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. रेड्डी याच्यावर आयसीसीच्या भ्रष्टाचार विरोधी युनिटच्या कलम २.१.१, कलम २.१.४ आणि कलम २.४.७ चे उल्लंघन केल्याचा आरोप आहे.

मोबाईल डेटा आणि संदेश हटवून तपासात अडथळा आणण्याचा, सामन्यांचा निकाल किंवा इतर कोणत्याही बाबी दुरुस्त करण्याचा प्रयत्न करण्याचा आणि दुसऱ्या खेळाडूवर चुकीच्या पद्धतीने प्रभाव पाडण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे.



त्याने या वर्षी एप्रिलमध्ये अमेरिकेसाठी आंतरराष्ट्रीय पदार्पण केले. तेव्हापासून त्याने चार सामने खेळले आहेत, ज्यामध्ये त्याने फक्त एकच विकेट घेतली आहे. आयसीसीच्या या आरोपांमुळे अखिलेशच्या कारकिर्दीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जर त्याने समाधानकारक उत्तर दिले नाही तर त्याच्यावर आयसीसीकडून बंदी घातली जाऊ शकते.




# विवेक ओबेरॉयला आली होती पाकिस्तानमधून धमकी

बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉयला २००९ मध्ये, 'कुर्बान' चित्रपटाचे शुटिंग करताना, धमकीचा फोन आला. आता नुकत्याच एका मुलाखतीमध्ये अभिनेत्याने याबद्दल सांगितले आहे. सिनेमाच्या शुटिंगदरम्यान, विवेक ओबेरॉयला पाकिस्तानमधून फोन आला आणि त्याला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली.

पोलिसांना बोलावण्यात आले आणि चौकशी सुरू झाली. 'मी पोलिसांना सांगितले, 'मला माहित नाही की ते कोण आहेत. ते म्हणत होते की ते मला मारतील, ते सर्व काही उडवून देतील. त्यानंतर त्यांनी पाकिस्तानचा नंबर ट्रेस केला. जेव्हा त्यांनी मला सांगितले की ते खरे आहे, तेव्हा मला भीती वाटली.'

विवेक पुढे म्हणाला, 'मग मला माझ्या सुरक्षेची काळजी वाटली. सुरुवातीला मला वाटले की कोणीतरी दारू पिऊन मस्करी करत आहे. पण नंतर, मला माझ्या कुटुंबासाठी आणि माझ्या सुरक्षिततेसाठी बॉडीगार्ड नेमावा लागला. मी मुंबईत परतल्यावर पुन्हा धमक्या आल्या. त्यानंतर मला पोलिस संरक्षण घ्यावे लागले.'



# कलाकारांना 'तारक मेहता का उल्टा चश्मा'मुळे चांगली ओळख

तारक मेहता का उल्टा चश्मा मालिकेचे निर्माते असित मोदी यांनी कलाकारांच्या कॉन्ट्रॅक्ट साइनवर एक स्पष्ट वक्तव्य केले आहे. मालिका सोडून गेलेल्या कलाकारांनी त्यांच्यावर आरोप केले होते. काही कलाकार ही मालिका सोडून गेले आहेत. तर काही कलाकार परत या मालिकेत काम करताना आपल्याला पाहायला मिळतात.



असित मोदी यांनी या अफवांवरती भाष्य केले. ते म्हणाले, ''लोक म्हणतात कलाकारांच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये अजब असे नियम आहेत. तर त्या लोकांनी स्वतःच येऊन हे कॉन्ट्रॅक्ट पाहावे. आम्ही असे कोणतेच नियम तयार केले नाहीत. जसे कि स्त्री-पुरुष डेट नाही करणार. पण काही नियम आहेतच, कारण या मालिकेला आणि चॅनलला कोणताही धक्का बसणार नाही. सगळ्या कलाकारांना या 'तारक मेहता का उल्टा चश्मा' मालिकेमुळे चांगली ओळख मिळाली आहे. त्यामुळे त्यांना समजायला हवे की काही नियम हे बॉन्ड आणि सुरक्षिततेसाठी केले आहेत.''

मालिका सोडून गेलेल्या कलाकारांविषयी ते म्हणाले, ''कालाकारांनी आपल्या कामात बेस्ट दिले आहे. मी कधीच कोणाला मालिका सोडून जा असे स्वतः सांगितले नाही. पण काही कलाकार हे मालिका सोडून जातात, ते असे वक्तव्य करतात जी चूकीची असतात. त्यातील काही कलाकार परत यायची इच्छा व्यक्त करतात आणि आलेही आहेत. पण मालिका चालत राहिली पाहिजे. त्यामुळे या वातावरणात नियम आणि कायदे खूप गरजेचे आहेत.''




## बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**मस्ती ४ :** दुपारी २.१५, रात्री ९.१५ वा
**स्मार्ट सुनबाई :** सायंकाळी ५.४५
**हक :** रात्री ९.००

## खामगाव

**श्री गजानन टॉकीज**

**दे दे प्यार दे २: –** शो टाईम– दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकीज**

**द ताज स्टोरी :** शो टाईम– दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

## छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**उत : भावनांचा उद्रेक :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, **हक :** २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:०० **कंतारा ए लिजंड चॅप्टर १ :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**१२० बहादुर :** दुपारी ४: ३५, दुपारी १२:३०, २:३०, सायंकाळी ७:२५
**दे दे प्यार दे २ :** सायंकाळी ६:००, ७:००, रात्री ९:३०
**१२० बहादुर :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**दे दे प्यार दे – २ :** सकाळी ११ : ३०, सायंकाळी ६:३०, रात्री १०:००
**मस्ती ४ :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००,
**उत : भावनांचा उद्रेक :** दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०
**अभंग तुकाराम :** दुपारी १२ : ००

## वाशिम

**एच २ एम मूवी फ्लेक्स वाशिम**

**१२० बहादुर :** स. ०९:१५, दु. ०३:३०, रा.०९:२०
**मस्ती ४ :** स.०९:३० दु. १२:१५, सां. ०६:१५ दु. १२:३०, सायं ०६:२० दु.०३:१५, रा. ०९:३०

## अकोला

**मिराज सिनेमा**

**प्रेडॅटोर: बॅडलॅन्ड्स (हिंदी) :** स. ९.२० , सायं. ६.००, रात्री १०.४५ **थम्मा :** स. ९.३० , दु. १.४५, रा. १०.३० **तीन पायांचा घोडा :** स. ११.२५
**एक दिवाने की दिवानियत :** दु. २.४०, रा. ८.१५
**कडीपत्ता :** दु. ३.१५
**द ताज स्टोरी :** दु. ४.१० , रा. ११.१५
**हक :** दु. ५.३० , रा. ८.१५ , रा. ११

## जालना


**नीलम सिनेमा**

**दे दे प्यार दे –** दुपारी १२ : १५; ३ :१५; सायंकाळी ६ :१५; रात्री ९ :३० **रीलस्टार –** सायंकाळी ६ : ००

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**दे दे प्यार दे : सकाळी** ९ :००; ९ : १५; दुपारी १२ :००; १२ :१५; ३ : ००; सायंकाळी ६ : ००; रात्री ९ : ००; ९ :१५

# दैनिक महाभूमि शब्दसंगम 808



**–: आडवे संकेत :–**

1) हिंदू वर्षाचा पाचवा महिना, रामायणात राजा दशरथाने अनवधानाने या मातृपितृ ‍क्त बाळाचा वध केला
3) सारांश, गुंडाळा
6) महाराष्ट्रातील आळंदीजवळून वाहणारी नदी
10) कुळ
11) चेहऱ्यावरील हालचाल
13) तपश्चर्या
15) ओढा, झोंक
16) श्रीकृष्णाचा निर्दयी मामा
17) विमानाची धावपट्टी (इं.)
19) तोटा
21) अस्वल इ. प्राण्यांच्या तमाशावर पोट भरणारा
24) वस्त्र विणण्याचे यंत्र, तपास, मागोवा
25) ऐवज, द्रव्यसंख्या
27) आव्हान देणे
30) सोबती, मित्र
31) धातूची परीक्षा
33) एक सुगंधी तृण व त्याची मुळे
35) सहकारी संस्था सुरू करणारा प्रमुख
36) एका पौराणिक कथेनुसार पार्वतीचे एक नाव
37) मशीन, उपकरण
38) ध्रूव व ध्रूववृत्ते यामधील प्रदेश
39) चिन्ह, गुणधर्म
45) ज्याचा चेहरा पाहून भीती वाटेल असा
47) महाभारतात अज्ञातवासात असलेल्या युधिष्ठिराने धारण केलेले नाव
48) ललाट, भाल
51) विश्वातील वस्तूंचे परस्परांकर्षण
52) शेतात शेतकऱ्याने केलेली मेहनत
55) ज्ञान, ब्रम्हज्ञान
56) युद्धभूमी
59) कमळासारखे सुंदर असलेले डोळे
61) राजीनामा
62) वेळ, अवधी
63) कारण, पुढील योजना
65) इतरांपेक्षा समोर जाणे
67) शिजलेल्या भाताचा एकेक दाणा , गार, थंड
68) पूर्वीचा होऊन गेलेला
70) मध्ये, मधल्या वेळात
72) शोभिवंत रचना
73) दिवा विझविणे
74) देश स्थळाचे चित्र

**–: उभे संकेत :–**

2) स्वर्गलोकीच्या इंद्राचे आयुध
4) थट्टा, विनोद
5) सहाय्य
6) पावसाळयात आकाशात रंगीबेरंगी दिसणारी धनुष्याकृती
7) भाग, खंड
8) मौल्यवान वस्तू
9) विज्ञान शास्त्रात ज्याच्या मदतीने अतिशय लहान गोष्ट मोठी करून बघता येते असे यंत्र
10) वेलीप्रमाणे वाढलेला वंश
12) वनात रमणारा श्रीकृष्ण
14) घ्राणेंद्रिय
15) सुवर्ण
18) गति
20) समान
22) चांगल्या वर्तनाचा
23) गमन
26) बहुरुपी, डोंबारी, माकडांचा खेळ दाखविणारा
28) एक रंगप्रकार
29) दक्ष
30) संपूर्ण, सर्व
32) अनेक दिवस चालणारा धार्मिक समारोह
34) कमळ
35) पदवीसाठी विद्यापीठास सादर केलेला विस्तृत निबंध
36) क्षुल्लक प्रतीचे
40) अल्पकाळ टिकणारे
41) भारतात सतलज नदीवर असलेले जगातील सर्वात लांब धरण.
42) समाविष्ट, आत शिरणे
43) लक्ष वेधणारे, ओढणारे
44) वरच्या टरफलासहित तांदूळ
46) गुरूवारी पुण्यनक्षत्र येणे हा शुभ योग
47) लहान लहान खडे (हिं.)
49) लहान मुलांची खडू किंवा पेन्सिलीने लिहिण्याची फळी
50) प्रकाशणे, चमत्कृत होणे
53) हिंदीत संध्याकाळ
54) गवताची काडी
55) नम्र
57) विचार न करता केवळ सांगितले तेव्हडेच काम करणारा
58) लायकी
60) मृत्यू देवता
64) काळजीपूर्वक रक्षण
65) मोठी करवत
66) तोंडात घातलेला अन्नाचा गोळा, वाळलेले गवत, तृण
68) तुझे (सं.)
70) स्थिती, अवस्था
71) तपकीर


( उत्तर पुढील अंकी )

**मागील महाशब्दव्यूहचे उत्तर**



uday munde - 8446302691

# ड्रग्ज प्रकरणात श्रद्धा कपूरच्या भावाची होणार चौकशी



मुंबई पोलिसांच्या अंमलीपदार्थ विरोधी पथकाने ड्रग्ज तस्करीमध्ये लोकप्रिय इन्फ्लुएन्सर ओरी उर्फ ओरहान याच्यानंतर अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचा भाऊ सिद्धांत कपूरला चौकशीसाठी समन्स पाठवले आहे. सिद्धांत याला मंगळवारी जबाब देण्यासाठी हजर राहण्यास सांगण्यात आले आहे.

अमली पदार्थ विरोधी पथकाने सुमारे अडीचशे एमडी ड्रग्ज प्रकरणात संयुक्त अमिरातीहून प्रत्यार्पण करून आणलेला आरोपी मोहम्मद सलीम मोहम्मद सुहेल शेख याने बॉलिवूडच्या अनेक लोकप्रिय आणि बड्या कलाकारांसाठी तसेच राजकीय नेते यांच्यासाठी देशात आणि विदेशात ड्रग्ज पार्ट्या आयोजित केल्याचा खुलासा पोलिस चौकशीत करण्यात आला आहे. या प्रकरणाचा कॉलवर तपास सुरू करून सलीमने नाव घेतलेल्यांना चौकशीसाठी बोलावण्यास सुरुवात केली आहे. तपासामध्ये विक्रेत्यांपासून उत्पादकांपर्यंत मोठी साखळी उघडकीस आली आणि सुमारे २५० कोटी रुपये एमडीसह या प्रकरणात पोलिसांनी जवळपास १५ जणांना अटक करण्यात आली. परवीनला मिरा रोड इथला साजिद मोहम्मद आसिफ शेख हा अमली पदार्थ पुरवत असल्याचे समोर आले होते.

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

रविवार । २३ नोव्हेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

**न्यूज ब्रीफ**

### पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती

**तेल्हारा :** शहरात महाविद्यालयीन विद्यार्थी- विद्यार्थिनींनी शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती केली. तेल्हारा नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर नगरपरिषद कार्यालय व डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय यांच्यातर्फे महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी यांनी शुक्रवार, २१ नोव्हेंबर रोजी तेल्हारा शहरातील अग्रसेन टॉवर चौक, तेल्हारा बसस्थानक तसेच शहरातील विविध ठिकाणी पथनाट्याद्वारे मतदान जनजागृती केली. यावेळी नगरपरिषदेचे कर्मचारी, डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य गोपाल ढोले यांच्यासह प्राध्यापक, प्राध्यापिका, विद्यार्थिनी यांची उपस्थिती होती.

### जिल्ह्यात रंगणार अस्मिता लीग स्पर्धा

**अकोला:** खेलो इंडिया खेल से ही पहचान या केंद्र शासनाच्या उपक्रमांतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशन त्याच प्रमाणे महाराष्ट्र ॲथलेटिक्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता ॲथलेटिक्स लीग २०२५ या स्पर्धेचे आयोजन अकोला जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनद्वारे करण्यात आलेले आहे. या लीगचे प्राथमिक उद्दिष्ट क्रीडा स्पर्धामध्ये महिलांचा सहभाग वाढवणे, ॲथलेटिक्सला प्रोत्साहन देणे आणि जिल्ह्यांमधील तळागाळातील क्रीडा नैपुण्य (विशेषतः महिला) यांना राष्ट्रिय आंतरराष्ट्रिय पातळीवर देशा चे प्रतिनिधित्व करण्याची संधी उपलब्ध करुन देणे व देशातील क्रीडा संस्था मजबूत करणे असा आहे.

### शेतकऱ्यांना हरभरा बियाणे वितरण

**अकोला:** शेतकऱ्यांना दर्जेदार प्रमाणित बियाणे अनुदानित दरावर उपलब्ध व्हावे, कडधान्य पिकांच्या नवीन वाणाचा प्रचार प्रसार व्हावा व शेतकऱ्यांना अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने राष्ट्रीय अन्न व पोषण सुरक्षा अभियान कडधान्य व नवीन बियाणे अर्थसहाय्य २०२५-२६ अंतर्गत प्रमाणित बियाणे वितरण हरभरा (१० वर्षाआतील) बियाणे ५००० रुपये प्रति क्वि. (क्षेत्र ०.२० ते २.०० हे. मर्यादित वितरित करण्यात येत आहे. हरभरा या पिकाच्या अनुदान तत्वावर बियाणे लाभ मिळण्याकरिता सातबारा व फार्मर आयडीसह प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

**नगराध्यक्षसाठी ४१ तर सदस्यत्वासाठी ७१७ उमेदवार रिंगणात**

# नगर परिषद निवडणूक : १०९ उमेदवारांनी सोडले मैदान

अकोला / प्रतिनिधी

जिल्ह्यात पाच नगरपरिषदा व एका नगरपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी १४ तर सदस्यत्वासाठी दाखल केलेल्या ७१७ उमेदवारांनी अर्ज मागे घेत निवडणुकीतून माघार घेतली. आता नगराध्यक्षपदासाठी ४१ तर सदस्यत्वासाठी ७१७ जण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. थेट नगराध्यक्ष जनतेतून निवड होत असल्याने या निवडणुकीत चुरस वाढली आहे.

जिल्ह्यातील आकोट, मूर्तिजापूर, बाळापूर, तेल्हारा व हिवरखेड या नगरपरिषदेसह बार्शिटाकळी नगरपंचायतीसाठी निवडणुकीची प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंत अध्यक्षपदासाठी एकूण ७२ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ६१ वैध तर ११ अर्ज अवैध ठरले.

सदस्य पदासाठी एकूण ९३१ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ८५४ अर्ज वैध तर ७७ अर्ज अवैध ठरले. दरम्यान तिकीट न भेटल्याने नाराज झालेल्यानी पक्षात बंडखोरी करीत अर्ज दाखल केले आहेत. यातील काहींना शांत करण्यात पदाधिकाऱ्यांना यश आले आहे.

आता अपिल असलेल्या ठिकाणी २५ नोव्हेंबर पर्यंत माघारी घेता येईल आहे. त्यामुळे काही ठिकाणच्या लढती २५ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होतील तर २६ नोव्हेंबर रोजी उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होऊन चिन्ह याच दिवशी वाटप होणार आहेत.

**कुठे किती उमेदवार रिंगणात ?**

| नगर परिषद | सदस्य | नगराध्यक्ष |
|---|---|---|
| अकोट | १८७ | ८ |
| मूर्तिजापूर | ९५ | ६ |
| बाळापूर | १५७ | ९ |
| तेल्हारा | ९२ | ६ |
| हिवरखेड | ९९ | ७ |
| बार्शिटाकळी | ८७ | ५ |
| एकूण | ७१७ | ४१ |




### सर्वाधिक उमेदवार अकोटमध्ये

आकोट नगरपरिषदेत १७ प्रभाग असून ३५ सदस्यांसाठी १८७ उमेदवार तर अध्यक्ष पदासाठी ८ उमेदवार रिंगणात आहेत.बाळापूर नगरपरिषदेत १२ प्रभाग असून २५ सदस्यांसाठी ९५ तर अध्यक्षासाठी ६ उमेदवार मैदानात आहेत. मूर्तिजापूर नगरपरिषदेत १२ प्रभाग असून २५ सदस्यासाठी १५७ उमेदवार तर नगराध्यक्ष पदासाठी ९ उमेदवार रिंगणात आहेत. १० प्रभाग असणाऱ्या तेल्हारा नगरपरिषदेत २० जागांसाठी ९२ उमेदवार तर अध्यक्षपदासाठी ६ उमेदवार रिंगणात आहेत. तर हिवरखेड नगरपरिषदेत १० प्रभागात २० सदस्यत्वासाठी ९९ उमेदवार तर अध्यक्ष पदासाठी ७ उमेदवार रिंगणात आहेत. तर बार्शिटाकळी नगरपंचायत मध्ये १७ प्रभाग असून १७ सदस्यत्वासाठी ८७ उमेदवार तर नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवार रिंगणात आहेत.

## न्यू तापडियानगरमध्ये बिबट्या ; शोध सुरू

**परिसरात ठसे न आढळून आल्याने संभ्रम**

अकोला / प्रतिनिधी



न्यू तापडियानगरमध्ये पोलिस कर्मचारी विलास बंकावार यांच्या घरी शुक्रवारी सकाळी सुमारे ८.३० वाजता बिबट दिसल्याची चर्चा आहे. बंकावार यांच्या सासूसह शेजाऱ्यांनी जिन्यावरील टॉवरची काच फोडून प्राणी पळताना पाहिल्याचा दावा केला. माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली. परिसरात पाऊलखुणांचा शोध घेण्यात आला; मात्र कुठेही बिबट्याच्या खुणा आढळल्या नाहीत. परिस्थितीचे मूल्यमापन करताना वनकर्मचाऱ्यांनी नागरिकांना कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले असून, सतर्क राहण्याची सूचना केली आहे.

शुक्रवारी सकाळी बंकावार यांच्या घरातील जिन्यात बसलेला प्राणी त्यांच्या सासूंनी पाहिल्याचे सांगितले. त्यांनी आरडाओरडा केल्यानंतर त्या प्राण्याने टॉवरवरील काच फोडून पलायन केले. त्याच वेळी शेजाऱ्यांना बाजूच्या टिनशेडवर उडी मारल्याचा आवाज ऐकू आला. यामुळे घाबरलेल्या नागरिकांनी सिव्हिल लाइन्स पोलिस आणि वनविभागाला तत्काळ माहिती दिली. वनपाल गजानन गायकवाड, वनरक्षक संघपाल तायडे आणि मानद वन्यजीव रक्षक बाळ काळणे यांनी घटनास्थळी जाऊन तपास केला.

### नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन

नागरिकांनी कोणतीही भीती न बाळगता, सतर्कता आणि संयम राखवा. बिबट आढळून आल्यास वन विभागाचा टोल फ्री क्रमांक १९२६ वर किंवा वन विभागा अकोला यांचेशी संपर्क साधून त्वरित माहिती द्यावी, असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी विश्वास राम थोरात (प्रादेशिक) यांनी केले आहे.

## लिकेज दुरुस्त न केल्याने ग्रामपंचायतला ठोकले कुलूप

तेल्हारा / प्रतिनिधी

तालुक्यातील पाथर्डी येथे ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावून महिला सरपंचासोबत उर्मट भाषेत संवाद साधल्याचा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.

सरपंच प्रतीक्षा ठोंबरे यांनी कुलूप लावण्याबाबत विचारणा केली असता, वॉटर सप्लायमध्ये असून, ते दुरुस्त न केल्याने मी कुलूप काढणार नाही, असे आरोपीने सांगितले. त्याचवेळी त्याने महिला सरपंच प्रतीक्षा रोशन ठोंबरे यांच्याशी उर्मट भाषेत बोलत अपमानित केले. सरपंचांनी त्यास जाब विचारल्यावर तो तेथून निघून गेला.

घटनेनंतर आठ दिवसांनी आरोपी पुन्हा ग्रामपंचायत २ कार्यालयात येऊन कुलूप लावण्याची धमकी दिली व शिवीगाळ केली, असे फिर्यादी सरपंचांनी आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. सरपंच ठोंबरे यांनी २० नोव्हेंबर रोजी सायंकाळी तेल्हारा पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपी दबडघावविरुद्ध ३ गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक प्रकाश तुनकलवार यांच्या मार्गदर्शनाखाली हेड कॉन्स्टेबल राहुल तायडे पुढील तपास करीत आहेत.

## पोलिसांचे अवैध दारुअड्ड्यावर धाडसत्र ; मुद्देमाल जप्त

मूर्तिजापूर / प्रतिनिधी

ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत माना पोलिसांनी २० नोव्हेंबर रोजी ठाणेदार गणेश नावकार यांच्या नेतृत्वाखाली सहा ठिकाणी गावठी हातभट्टी व देशी दारूची अवैधरीत्या विक्री करणाऱ्यांवर कारवाई करत आरोपींना ताब्यात घेतले व ७४,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईदरम्यान अतुल रामदास इंगळे (रा. ब्रह्मी) याच्याकडून सीलबंद देशी दारूच्या ३२ बाटल्या, उत्तम रामचंद्र मेश्राम (रा. बल्लारखेड) याच्याकडून १४ बाटल्या, जीवनकला शिरसाट (रा. धामोरी बु.) हिच्याकडून ११ बाटल्या, सचिन रविकिरण हुमणे (रा. माना) याच्याकडून २२ बाटल्या, सुधीर रामचरण जयस्वाल (रा. कुरुम) याच्याकडून १५ बाटल्या, तसेच मोहन यशवंत सरदार (रा. कुरुम) याच्याकडून तब्बल ३४० लिटर सडवा मोह असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सर्व आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले.

या मोहिमेत ठाणेदार गणेश नावकार, पोलिस उपनिरीक्षक गणेश महाजन, मनोहर इंगळे, संदीप सरोदे, दीपक सोळंके, सुशील आठवले, पंकज वाघमारे, अक्षय आगलावे तसेच जयश्री मेंढे यांनी सहभाग घेतला.



### अवैध दारू अड्डयांवर बोरगाव मंजू पोलिसांची धाड

**बोरगाव मंजू :** पोलिस ठाण्याच्या हद्दीत रामगाव ते धोतर्डी परिसरात अवैध देशी दारू व हातभट्टी विरोधात कारवाई करण्यात आली. गुरुवारी सायंकाळच्या सुमारास केलेल्या या कारवाईत तीन जणांना अटक करून विविध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. ठाणेदार अनिल गोपाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक मनोज उघडे, रवींद्र धुळे आणि पथकाने छापा टाकला.

### उरळ पोलिसांची तीन ठिकाणी कारवाई

**उरळ :** उरळ पोलिस पथकाने कलंबी महागाव, अंत्री मलकापूर व आगर परिसरात अवैध देशी दारू व गावठी हातभट्टीवर कारवाई करत ३५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. रामसिंग कोरडा डाबेराव (अंत्री मलकापूर) याच्या ताब्यातून १५ लीटर गावठी हातभट्टी दारू, ९० लीटर सड़वा मोह जप्त केला. सिद्धार्थ सखाराम शिरसाठ (रा. आगर) याच्याकडून १० लीटर गावठी हातभट्टी दारू व ९० लीटर सडवा मोह असा मुद्देमाल जप्त केला.

## 'एकरी ११ क्विंटल कापूस खरेदी करा'

**प्रहारचा सीसीआय कार्यालयात ठिय्या**

अकोला / प्रतिनिधी

कापूस खरेदीची मर्यादा वाढवून प्रती एकर ११ क्विंटल कापूस खरेदी करण्याची मागणी करित, प्रहार जनशक्ती पक्ष अकोला जिल्ह्याच्या वतीने शुक्रवार २१ नोव्हेंबर रोजी भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) जिल्हा व्यवस्थापक कार्यालयात ठिय्या दिला.

सीसीआयमार्फत प्रती एकर ११ क्विंटल कापूस खरेदी करण्यात यावी, कापूस खरेदी प्रक्रियेतील जाचक अटी रद्द कराव्या, कापूस खरेदीसाठी सामूहिक सातबाऱ्यातील शेतकऱ्यांकडून प्रतिज्ञापत्र न घेता स्वयंघोषणापत्रावर कापूस खरेदी करण्यात यावी आदी मागण्यांसाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने अकोट ते अकोला पायदळ दिंडी काढण्यात आली. सीसीआयच्या अकोल्यातील जिल्हा व्यवस्थापक कार्यालयात ठिय्या देत प्रती एकर ११ क्विंटल कापूस खरेदी करण्याची मागणी करण्यात आली. खरेदीची मर्यादा वाढवून दिल्यास, त्यानुसार कापूस खरेदी करण्यात येणार असल्याचे आश्वासन सीसीआयच्या जिल्हा व्यवस्थापकांनी दिले. या आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाध्यक्ष कुलदीप वसू, छोटू कराळे, मनोज पाटील, बिट्टू वाकोडे, जीवन खवले, मुन्ना साबळे, ज्ञानेश्वर दहिभात, भय्या डिक्कर, ज्ञानेश्वर भिसे, अंकुश हिंगणकर आदी पदाधिकारी सहभागी झाले होते.

## जिल्ह्यातील १५ पैकी केवळ २ वाळूघाटांचा ई-लिलाव

अकोला / प्रतिनिधी

जिल्हा खनिकर्म विभागाच्या वतीने १५ वाळू घाटांच्या ई-लिलावाची प्रक्रिया २० नोव्हेंबर रोजी पार पडली. या प्रक्रियेत केवळ दोन घाटांचा लिलाव झाला असून त्यापोटी ५१ लाख ७६ हजार ४२८ रुपयांचा महसूल विभागाला प्राप्त झाला आहे.

उर्वरित ३६ वाळू घाटांचा दुबार लिलाव हा ४ डिसेंबर रोजी होणार असून २८ नोव्हेंबर पर्यंत ऑनलाइन अर्ज प्रक्रिया असणार आहे. गत तीन वर्षांपासून जिल्हयात वाळू घाटाच्या लिलावाचा गोंधळ सुरू आहे.मध्यंतरी राज्य सरकारने वाळू डेपो ही संकल्पना रूढ केली. मात्र जिल्हयात त्याला फाररसा प्रतिसाद मिळाला नाही. परिणामी अवैध वाळू माफियांना रस्ता खुला झाला व शासनाच्या महसुलाला चुना लागला. दरम्यान यंदा या प्रक्रियेत बदल झाला असून पूर्वीप्रमाणेच पर्यावरण विभागाची परवानगी मिळालेल्या वाळू घाट ई लिलाव पद्धतीने प्रक्रिया सुरुवात झाली. पंधरा वाळू घाटाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आता उर्वरित ३६ वाळू घाटांचा पुन्हा दुबार लिलाव होणार आहे.



### या घाटांचा झाला लिलाव

अकोला तालुक्यातील वडद खुर्द या घाटाचा ई लिलाव पार पडला. मनीष गिरी यांनी ३७ लाख ७४ हजार ४२० रुपयांची सर्वाधिक बोली लावत हा वाळू घाट घेतला. या घाटात ४,४५२ ब्रास वाळू उपलब्ध आहे.

**किमान तापमान १३.५ अंशांवर**

## अकोल्यात १५ दिवसांपासून थंडीचा कडाका

अकोला / प्रतिनिधी



शहरासह जिल्ह्यात मागील पंधरा दिवसांपासून थंडीचा कडाका वाढला असून, नागरिकांना प्रचंड गारठ्याचा सामना करावा लागत आहे. १७ नोव्हेंबर रोजी किमान तापमान ११.९ अंश सेल्सिअस इतके नोंदवण्यात आले. कमाल तापमानातही घट झाल्याने भर दुपारी सुद्धा वातावरणात गारवा जाणवत आहे.

मागील दिवसाच्या तुलनेत किंचित वाढ दिसली असली तरी थंडीची तीव्रता कायम आहे. दरम्यान, २१ नोव्हेंबर रोजी १३.५ अंश किमान तापमानाची नोंद झाली आहे. अचानक वाढलेल्या थंडीचा परिणाम आरोग्यावर दिसू लागला असून सरकारी व खाजगी रुणालयांमध्ये बाह्यरुग्णांची संख्या वाढली आहे. हवामान विभागानुसार, २१ नोव्हेंबरपासून थंडीची लाट कमी होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. हिमालय भागातील बर्फवृष्टीमुळे उत्तरेकडून वेगाने वाहणारे अतिथंड वारे महाराष्ट्रात येत असल्याने तापमानात मोठी घसरण झाली आहे. अकोला जिल्ह्यातील सर्वांत कमी किमान तापमानाची ऐतिहासिक नोंद २९ नोव्हेंबर १९१२ रोजी करण्यात आली होती. त्या दिवशी किमान तापमान केवळ ५.६ अंश सेल्सिअस इतके घसरले होते. यानंतरही विविध वर्षांत नोव्हेंबर महिन्यात तापमानात मोठ्या प्रमाणात घट झाल्याच्या नोंदी हवामान इतिहासात आढळतात.

### थंडी कमी होण्याची शक्यता

प्रादेशिक हवामान शास्त्र केंद्राच्या अंदाजानुसार, येत्या २६ नोव्हेंबरपर्यंत अकोल्यात शहरातील किमान तापमान लवकरच १२.८ अंश सेल्सिअस वरून वाढून १९ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. पूर्वेकडून वाहणाऱ्या वाऱ्यांमुळे थंडी कमी होईल, असे या विभागाने सांगितले आहे. अंदाजानुसार पुढील दिवसांमध्ये तापमानाची स्थिती २१ नोव्हेंबर : १५ अंश २२ नोव्हेंबर : १६ अंश, २३ नोव्हेंबर : १७ अंश, २४ नोव्हेंबर : १८ अंश, २५ नोव्हेंबर : १८ अंश, २६ नोव्हेंबर : १९ अंश अशी राहील. त्यामुळे गारठा कमी होण्याची शक्यता आहे.

वेस्टर्न डिस्टर्बन्स हिमालयाच्या पुढे सरकल्याने त्या भागात मोठ्या प्रमाणात बर्फवृष्टी झाली आहे. परिणामी विदर्भात थंडी वाढली आहे. आता पूर्वेकडून वारे वाहण्याची शक्यता असल्याने किमान तापमानात घट होण्याची शक्यता असून, ढगाळ वातावरणही राहण्याची दाट अंदाज आहे.

**– डॉ. प्रवीण कुमार,**
हवामान शास्त्रज्ञ, प्रादेशिक हवामानशास्त्र विभाग

## जीएमसी मध्येच मेडिकल सर्टिफिकेट सुविधा सुरू ठेवण्याची मागणी

**जिल्हाधिकाऱ्यांना वंचित बहुजन आघाडीचे निवेदन**

अकोला / प्रतिनिधी

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दुर्धर आजारांनी ग्रस्त रुग्ण, विद्यार्थी, दिव्यांग नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच शासकीय कर्मचाऱ्यांच्या आरोग्य तपासणीनंतर जिल्हा शल्यचिकित्सकांकडून देण्यात येणारे प्रमाणपत्र घेण्यासाठी जिल्हा स्त्री रुग्णालयात जावे लागते.

तपासणी जीएमसी मध्ये व सर्टिफिकेट जिल्हा स्त्री रुणालयात असे न करता जीएमसीमध्येच ही सुविधा सुरू ठेवण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे वंचित बहुजन आघाडीचे सामाजिक कार्यकर्ते पराग गवई यांनी केली आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेतच जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालय आहे. आता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची जुनी इमारत पाडली जाणार असल्याने सीएस ऑफिस जिल्हा स्त्री रुणालयात काही दिवसांसाठी हलविण्यात आले आहे. या निर्णयामुळे मेडिकल सर्टिफिकेट साठी जीएमसी मध्ये तपासणी करावी लागते तर सर्टिफिकेट घेण्यासाठी जिल्हा स्त्री रुणालयात जावे लागते. याचा नाहक त्रास रुग्ण, दिव्यांग, विद्यार्थी यांना होत. या निर्णयामुळे दररोज महाविद्यालयात तपासणीसाठी येणाऱ्या रुग्णांची प्रचंड गैरसोय होण्याची शक्यता असल्याने ही सेवा जीएमसीमध्येच उपलब्ध ठेवावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, जीएमसीमध्ये दुर्धर आजारांचे रुग्ण तसेच वन्द अपंग विद्यार्थी आणि शासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने तपासणीसाठी येतात. तपासणी झाल्यानंतर त्यांना लागणारे जिल्ह शल्यचिकित्सकांचे प्रमाणपत्र त्यास ठिकाणी मिळाल्यास सोईचे होईल. जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रमाणपत्र देण्याची सेवा अत्यावश्यक स्वरूपाची आहे. त्यामुळे एकाच ठिकाण तपासणीपासून प्रमाणपत्रापर्यंत सर्व सुविधा मिळण्याचे महत्त्व लक्षात घेत ही सेवा जीएमसीमध्येच कायम ठेवावी, अशी विनंती करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते पराग गवई, संकेत शिरसाट, मंगेश गवई, यशपाल जाधव, विशाल वाघ, प्रवीण गायगोळे, अरुण बलखंडे रवी पाटील, विशाल गोपनारायण, सुबोध पाटील, राजकिरण बागडे, पंकज दामोदर, भाऊसाहेब अंभोरे, रामदास तायडे हे निवेदन देतेवेळी उपस्थित होते.

## न्यूज ब्रीफ

### चिमुकलीवर अत्याचार प्रकरणी कठोर शिक्षेची मागणी



**शेगाव :** मराठा पाटील युवक समितीकडून शेगाव तहसीलदारांना निवेदन देऊन नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथील चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीवर तात्काळ कारवाई करत फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, अलीकडेच समाजात लहान मुलींसह महिलांवर अत्याचाराचे प्रमाण वाढले आहेत. नुकतेच नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे एका चिमुकलीवर नराधमाकडून अत्याचार करण्यात आला. शासनाने याची तात्काळ दखल घेवून आरोपीवर कडक कारवाई करत त्याला फाशीची शिक्षा द्यावी. असे निवेदनात नमूद केले आहे. निवेदन देतांना मराठा पाटील युवक समिती शेगाव तालुका अध्यक्ष ऋषिकेश हिंगणे, उपाध्यक्ष अविनाश कोकाटे, विद्यार्थी समिती तालुकाध्यक्ष सागर जवंजाळ, शहर अध्यक्ष नंदकिशोर सहस्त्रबुद्धे, नंदलाल उन्हाळे, सरऋषिकेश सहस्त्रबुद्धे, सौरव सहस्त्रबुद्धे, आशिष घाटे, कार्तिक वासमकार, मोहित वानखडे, अभिषेक दळी, आदित्य खेळकर, दुर्गेश हिंगणे, कृष्णा लढे, सतीश सूरपाठे, स्वप्निल इंगळे, अक्षय जवंजाळ, हर्षल पुंडकर, गोपाल हिंगणे उपस्थित होते.

### कपास किसान ॲपवर नोंदणीकरिता मुदतवाढ!

**खामगाव :** जिल्ह्यात सीसीआयमार्फत कापूस खरेदी करण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांना कपास किसान ॲपवर नोंदणी करावयाची आहे. महाराष्ट्र शासनाने नोंदणी करण्यास ३१ डिसेंबर पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी कपास किसान ॲपवर विहीत मुदतीत नोंदणी करून घ्यावी.

### निधन वार्ता

#### मजीत पटेल

**अमडापूर :** येथील मजित पटेल (८६ वर्ष) यांचे २१ नोव्हेंबर रोजी वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, ६ मुली व एक मुलगा असा परिवार आहे.

#### लिलाबाई फिरके



**बुलढाणा :** येथील लिलाबाई रघुनाथ फिरके यांचे २२ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ८९ वर्षे होते. त्यांच्या पश्चात ३ मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे .बुलढाणा नगर परिषदेच्या माजी उपाध्यक्षा कुंदा पाटील यांच्या त्या मातोश्री होत.

## घरकुल लाभार्थ्यांना ग्रामविकास अधिकाऱ्यांनी बजावली नोटीस

# घरकुल घोटाळा; घर न बांधता पैसा केला खर्च!

**जळगाव जामोद / प्रतिनिधी**




प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेले घरकुल बांधकाम न करता घरकुलाची रक्कम खर्च करून करारनाम्याचा भंग केल्याबाबत सुनगाव येथील ग्रामसेवक यांनी संबंधित लाभार्थ्यांना नोटीस पाठवून दिलेल्या हप्त्याचा बोजा त्या जागेवर चढविण्यात येणार असल्याच्या सुचना दिल्या आहेत. या कारवाईमुळे घरकुलाच्या नावावर पैसे घेवून घर न बांधता अपहार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव ग्रामपंचायत अंतर्गत पंचायत समितीकडून प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत नागरिकांना घरकुल मंजूर करण्यात आले आहे. दरम्यान घरकुल लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी पहिला, दुसरा आणि तिसरा हप्ता सुध्दा पंचायत समिती प्रशासनाकडून त्यांच्या बँक अकाऊंटमध्ये वर्ग करण्यात आला होता. परंतु सुनगाव येथील काही घरकुल लाभार्थ्यांनी सदर पैशाचा घरकुल बांधकामासाठी उपयोग न करता बेकायदेशिर रित्या तो पैसा इतरत्र खर्च करून अपहार करण्यात आल्याचे उघड झाले आहे. घरकुल लाभार्थ्यांकडून प्रस्तावित स्थळी कोणत्याही प्रकारचे घरकुल बांधकाम न करता द्वितीय व तिसरा हप्त्याचा प्रस्ताव बेकायदेशीरपणे सादर करून सदर हप्ता नियमबाह्य पणे प्राप्त करून घेतला.

त्यामुळे ग्रामपंचायत प्रशासनाची व पंचायत समिती प्रशासनाची दिशाभूल करून घरकुल मंजुरात पूर्वी केलेल्या करारनामाच्या अटी व शर्तींचा भंग झाला आहे. याबाबत ग्राम पंचायतच्या ग्रामसेवकांनी गावातील बोगस घरकुल लाभार्थ्यांना नोटीस पाठवून त्यांचेवर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. या नोटीसीमुळे घरकुलाचे अनुदान लाटणाऱ्या बोगस लाभार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

तसेच येत्या चार दिवसात प्रस्तावित ठिकाणी नव्याने घरकुल बांधकाम सुरू करण्यात यावे. तसा अहवाल ग्रामपंचायतला द्यावा जोपर्यंत आपण घरकुल बांधकाम पूर्ण करत नाही. तोपर्यंत याद्वारे आपल्या प्रस्तावित नमुना नंबर आठ जागा क्रमांक अनुक्रमे ८६९, ९४८, ५७५ वर रुपये दीड लाख रुपयांचा बोजा चढविण्यात येत आहे. असेही दिलेल्या नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. नोटीस दिल्यानंतरही घरकुल बांधकाम केले नाही तर फौजदारी कारवाई करण्यात येईल. असा इशारा नोटीसव्दारे ग्राम विकास अधिकारी हितेंद्र जोशी यांनी सूनगाव घरकुल लाभार्थ्यांना दिला आहे.

### दीड महिना उलटूनही कारवाई नाही

■ सुनगाव ग्राम पंचायतचे ग्रामसेवक हितेंद्र जोशी यांनी घरकुलाचे पैसे मिळूनही घरकुल बांधकाम न करणाऱ्यांना नोटीस देवून दीड महिना उलटला आहे. मात्र अद्याप त्यांचेविरूध्द कुठलीही कारवाई झाली नाही. शासनाच्या पैशाचा अपहार करणाऱ्यांवर केव्हा कारवाई करणार असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

### या लाभार्थ्यांना नोटीस

■ सुनगाव ग्राम पंचायत व्दारे गावात प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत पांडुरंग विठ्ठल पुसे, परसराम शंकर सातपुते, गजानन रामभाऊ मानकर यांना घरकुल मंजूर झाले आहे. तसेच त्यांना पंचायत समितीकडून घरकुल बांधकामासाठी हप्ताही प्राप्त झाला आहे. मात्र त्यांनी बांधकाम न करता पैसे खर्च केल्याचे निष्पन्न झाले आहे. उपरोक्त तिनही लाभार्थ्यांना १ ऑक्टोबर रोजी ग्रामसेवक हितेंद्र जोशी यांनी नोटीस बजावली आहे. मात्र अद्याप त्यांचेकडून कुठलेही बांधकाम सुरू करण्यात आलेले नसून ग्राम पंचायतकडून अद्याप कुठलीही कारवाई करण्यात आलेले नाही.

## अपघाती मृत्यू प्रकरणात गुन्हा दाखल

**मलकापूर / प्रतिनिधी**



मका विक्री करून घरी परतणाऱ्या ६० वर्षीय व्यक्तीचा मोटारसायकल अपघातात मृत्यू झाल्याची घटना १९ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास जांभुळधाबा येथील जिल्हा परिषद शाळेजवळ घडली. याप्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी संजय सुखदेव भंगाळे (५३) रा. वडजी माळेगाव ता. मोताळा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचे मोठे भाऊ प्रमोद सुखदेव भंगाळे (६०) हे बोदवड येथून मका विकून घरी परतले होते. संध्याकाळी सुमारे ५ वाजता ते नातेवाईकांना पैसे देण्यासाठी दुचाकी क्र.एमएच २९-९२४८ ने माळेगाव हरणखेड मार्गे मलकापूरकडे निघाले होते. जांभुळधाबा येथील जिल्हा परिषद शाळेजवळ समोरून येणाऱ्या मोटारसायकल क्र.एचएच २८-३७२८ च्या चालकाने भरधाव व निष्काळजीपणे वाहन चालवून प्रमोद भंगाळे यांना धडक दिली.

या धडकेत गंभीर जखमी झालेल्या प्रमोद भंगाळे यांना तात्काळ उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी मोटारसायकल चालक आरोपी अजय समाधान इंगळे (रा. चिंचखेड, ता. बोदवड) याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास मलकापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे ठाणेदार सतीश महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ. दिलीप तळवी करीत आहेत.

## नगरसेवकपदाच्या २१ जागेकरिता ८६ उमेदवार रिंगणात

**जळगाव जामोद :** नगर परिषद निवडणूकीच्या अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ४ नगराध्यक्ष पदाच्या तर ३५ नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून आता १३ नगराध्यक्षासाठी तर ११८ उमेदवार नगरसेवकासाठी निवडणूक रिंगणात आहेत.

अर्ज मागे घेणाऱ्यांमध्ये, नगराध्यक्ष पदाकरीता बाळू महादेव सिरसाट, मिलिंद विक्रम शेगोकार, राजेंद्र भावजी वाघ, अनिलकुमार किसन तायडे हे असून नगरसेवक पदासाठी शेख शहबाज शेख रहीम – १ ब, पवन बाळकृष्ण देशमुख १४ अ, स्वप्नाली कैलास शेगोकार-१५ अ, विठ्ठल शेषराव अवताडे १० ब, निर्मला उमेश राजगुरे १५ ब, पंकज हरिभाऊ देशमुख ५ ब, शुभम राजेंद्र लोखंडे १४ अ, अल्का गणेश नवथडे ८ ब, पूनम निखिल पारखेडे ७ ब, कविता शिवशंकर धनोकार ३ ब, शिवशंकर साहेवराव धनोकार ३ ब, पुरुषोत्तम चंद्रभान हाडोळे १४ अ, विलास तुकाराम मसने १४ अ, दिपक द्वारकाप्रसाद शर्मा ५ ब, जितेंद्र ब्रिजमोहन अग्रवाल ५ ब, प्रतीक प्रकाश ददगाळ ५ ब, मंगेश श्रीकृष्ण फुसे १४ अ, रुपाली मंगेश फुसे १४ ब, मुळे गणेश श्रीराम ११ अ, रवींद्र शामराव ठोंबरे २ ब, शैलेश जयवंत पटोकार ११ अ, महेश शंकर कलोरे २ ब, रुपाली गजानन नवथळे ८ब, मोहम्मद अरशाद अब्दुल कादर – १३ब, जब्बार बुडन बुडन १२ अ, गणेश अशोक देशमुख ९ ब, कल्याणी प्रमोद काठोळे १५ ब, खान कौसर जहाँ सुजात खान १२ अ, श्याम गजानन अढाव २ ब, नितेश रामदास आसोलकर ३ ब, योगिता नितेश आसोलकार १५ ब, कमलाकर तुळशीराम चव्हाण ६ ब, मंगला कमलाकर चव्हाण ५ अ, कमलाकर तुळशीराम चव्हाण ५ ब, शेख नासिर शेख युसूफ १० ब, पवन भाऊराव गवई १५ अ मधून उबाठा गटाचा अर्ज मागे घेतला असून काँग्रेसचा अर्ज कायम ठेवला आहे.

## वाढीव वीज बिलाच्या विरोधात शिवसेना उबाठाचे आंदोलन

**मलकापूर:** तालुक्यातील विवरा येथील वीज ग्राहकांना स्मार्ट मीटर बसविल्याने अव्वा चे सव्वा बिल आले असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला असून शिवसेना उबाठाच्या नेतृत्वात विवरा येथील महिला व ग्रामस्थांनी डफडे वाजवून महावितरण कंपनी कार्यकारी अभियंता आर.जी.तायडे यांच्या कार्यालयात ती बिले भिरकावून त्या वाढीव बिलाचा निषेध केला आहे.

महावितरण कंपनीच्या हुकूमशाही पद्धतीने सुव्यवस्थित असलेले ग्राहकांचे मीटर काढून त्या जागी स्मार्ट मीटर बसविण्याचा सपाटा सद्यस्थितीत जोरात सुरू आहे.विवरा येथील ग्रामस्थांना ४००,५००, ८०० असे बिल पूर्वी येत असल्याने व आता स्मार्ट मीटर बसविल्याने ते बिल २ ते १३ हजार रूपये पर्यंत येत आहे. अगोदरच



विवरा येथे महिनाभरापूर्वी ढगफुटी होऊन शेतजमीन खरडून गेली व घरातील अन्नधान्याची ही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

त्यातच वीज वितरण कंपनीने अव्वा चे सव्वा बिले देवून वायरमनने बिले भरण्याचा तगादा लावला अन्यथा वीज पुरवठा खंडित करण्याची धमकी दिल्याने संतप्त ग्रामस्थांनी याबाबतची माहिती शिवसेना उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांना दिल्याने शिवसेना पदाधिकाऱ्यांनी शंभर ते दीडशे ग्रामस्थ व महिलांना घेऊन विज कंपनी कार्यालयासमोर डफड वाजून अव्वाच्या सव्वा आलेली बिले वीज वितरण कंपनी कार्यालयातच भिरकावली व जोपर्यंत विवरा येथील ग्रामस्थांची बिले दुरुस्त करून दिल्या जात नाही. तोपर्यंत आम्ही बिले भरणार नाही व लाईट कापण्यास आलेल्या लाईनमनला चोप देण्याचा इशाराही यावेळेस शिवसेना विधानसभा संघटक राजेशसिंह राजपूत यांनी दिला आहे.

## आ. चैनसुख संचेती यांची अध्यक्षपदी निवड

**मलकापूर / प्रतिनिधी**



राज्याच्या विधीमंडळाच्या विविध समित्यांच्या सदस्यांचे आचरण कसे असावे याचे नीतिनियम समिती निश्चित करेल. याच माध्यमातून राज्य शासनाने विधीमंडळाच्या नीतिमूल्य समितीची स्थापना केली आहे. या समितीच्या अध्यक्षपदी जेष्ठ आमदार चैनसुख संचेती यांची निवड करण्यात आली आहे.

विधीमंडळाप्रती जनतेमध्ये असणाऱ्या विश्वासहर्तेला तडा जाऊ न देता ती अधिकाधिक दृढ व वृध्दीगत व्हावी यासाठी राज्य विधीमंडळाच्या सदस्यांनी लोकप्रतिनिधी या नात्याने राज्याच्या असलेल्या विविध दौऱ्यांच्यावेळी कोणते आचरण करावे व कोणते आचरण टाळण्यात यावे, दौरा कालावधीत कोणते संकेत पाळावे याबाबत नीतिमूल्य समिती शिफारस करणार आहे. राज्य विधीमंडळाने मान्यता दिल्यावर त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे. काही महिन्यांपुर्वी धुळे येथे राज्य विधीमंडळाची अंदाज समिती दौऱ्यावर असतांना या समितीचे अध्यक्ष अर्जुन खोतकर यांच्या स्वीयसहाय्यकाच्या शासकीय निवासस्थानातील खोलीमध्ये सुमारे १ कोटी ८० लाख रूपये सापडले होते. त्यानंतर ६ महिन्याचा कालावधी उलटल्यानंतर विधीमंडळाची नीतिमूल्य समिती स्थापन करण्यात आली आहे.

## भाराकाँच्या रुकय्या यास्मीन खलील अहमद अविरोध

**मलकापूर / प्रतिनिधी**

नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीत भाराकाँचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार अतिकऊर रहेमान जवारीवाले यांची बहिण रुकय्या यास्मीन खलील अहमद ह्या प्रभाग क्र. ६ अ मधून अविरोध निवडून आल्या आहेत.

नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीची निवडणूक प्रक्रिया पार पडत आहे. उमेदवारी दाखल करणे, छाननी आणि उमेदवारी मागे घेणे या प्रक्रिया आजपर्यंत पार पडली. २१ नोव्हेंबर रोजी उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी प्रभाग क्र.६ अ मधून उभ्या असलेल्या भाराकाँच्या उमेदवार रूकय्या यास्मीन खलील अहमद ह्या पहिल्यांदाच निवडणुकीत उभ्या होत्या. त्यातही त्यांच्या विरोधातील सर्वच उमेदवारांनी माघार घेतल्याने त्यांची निवड ही अविरोध झाली आहे. मलकापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष पदाचे भाराकाँचे उमेदवार अतिकऊर रहेमान जवारीवाले यांचे नियोजन आणि त्यांची असलेली पकड यामुळे त्यांची बहिण पहिल्यांदा न. प. निवडणुकीत उभी असतांनाही अविरोध निवडून आली आहे. त्यांच्या निवडीने भाराकाँने निवडणुकीपुर्वीच आपले खाते उघडले आहे.

## मुख्याध्यापक निलंबित

**संग्रामपूर / प्रतिनिधी**

शासनाचे आदेश वेशीवर टांगून शालेय पोषण आहार वाटपात निष्काळजीपणा दुर्लक्ष केल्याप्रकरणी बावनबीर येथील जिल्हा परिषदेच्या मराठी उच्च प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नरहरी विश्वनाथ टिकार यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे.

जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचे पत्र क्रमांक कार्यासन ४/५८ ५९ / २०२५ २० नोव्हेंबर रोजीचे पत्रानुसार २१ नोव्हेबर रोजी पंचायत समिती बीडीओ माधव पायघन यांनी ही कारवाई केली.

## के.के. अग्रवाल महाविद्यालयात संविधान जनजागृती कार्यक्रम

**मलकापूर / प्रतिनिधी**

श्रीमती कावेरीदेवी केदारमल अग्रवाल कला-वाणिज्य महाविद्यालय, मलकापूर येथे २१ नोव्हेंबर रोजी अनुगामी लोकराज्य महाभियान संस्था व श्रीमती के. के.अग्रवाल महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संविधानाची पंचाहत्तरी निमित्त विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावर्षी भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण होत असून, राज्यभर राबविण्यात येणाऱ्या संविधान पंचाहत्तरी उपक्रमात महाविद्यालयाने उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. उत्कर्ष बक्षी उपस्थित होते. त्यांनी संविधानाची प्रस्तावना,



संविधानातील महत्त्वपूर्ण तरतुदी तसेच संविधानासमोरील संभाव्य धोके याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या सोबत अनुगामी लोकराज्य महाभियान संस्थेचे जनसेवक गौरव तायडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य एस. आर. राजपूत होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी तरुण पिढीने समजून घेतली पाहिजे, असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्रीकांत ठाकूर यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. प्रिती देशमुख यांनी केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. डॉ. उमेश राऊत यांनी केले. या कार्यक्रमास गोविंद विष्णू महाजन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य शेले, प्रमोद कपले तसेच एम.ई.एस. ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य विलास राणे यांची विशेष उपस्थिती लाभली.

## स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका, ५० टक्केपेक्षा जास्त आरक्षणाचा मुद्दा

# ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवणाऱ्यांवर संकट!

**खामगाव / प्रतिनिधी**

होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकासंदर्भात सर्वोच्च न्यायालयातील दाखल याचिकेचा निकाल अद्याप न लागल्याने निवडणुक अडचणीत येण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवणाऱ्या अनेक उमेदवारांचा हिरमोड होण्याचे संकेत आहेत.

नगर पालिका निवडणुकानंतर लगेच जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणूक होण्याची शक्यता होती. परंतु ग्रामीण भागातील ह्या निवडणुका लांबण्याची शक्यता आहे. कारण, ८ ते १८ डिसेंबरपर्यंत हिवाळी अधिवेशन नागपूरला होत असून, आचारसंहितेत अधिवेशन



घेता येत नसल्याने निवडणूक लांबण्याची शक्यता आहे. त्यातच ओबीसी प्रवर्गातील आरक्षण हे सर्वोच्च न्यायालयाच्या ५० टक्केच्या आरक्षण मर्यादेच्यावर जात असल्याने व या आधीच ओबीसी व इतर आरक्षण संदर्भात सुप्रीम कोर्टात दाखल असलेल्या याचिकेवर सुनावणी न झाल्याने ओबीसी प्रवर्गातून उमेदवारी दाखल करत असलेल्या उमेदवारांवर परत निवडणूक होण्याची शक्यता आहे. निवडून आल्यानंतरसुद्धा एखाद्या वर्षाने कोर्टाच्या आदेशाने परत निवडणूक लागल्यास दोनवेळा निवडून येण्यासाठी कसोटी लागणार असून, ओबीसीमधून उमेदवारी मागणाऱ्या उमेदवारांची संख्या मात्र यामुळे कमी झाल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. बरेच जण आता ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढण्यास इच्छुक नसल्याने राजकीय पक्षांची मात्र गोची झाली आहे.

### आरक्षणाचा मुद्दा ऐरणीवर

■ राज्य घटनेनुसार आरक्षण मर्यादा ही कोणत्याही परिस्थितीत ५० टक्केपेक्षा जास्त जाता कामा नये, यासाठी अगोदरच २०१७ मध्ये याचिका दाखल असून, त्याचा निर्णय पुढील वर्षी लागण्याची शक्यता आहे. मागीलवेळी निवडणूक झाल्यावरसुद्धा काही जागेवर परत निवडणूक घ्यावी लागली होती. मात्र आता ओबीसी प्रवर्गातून निवडणूक लढवली व निवडून आले तरी समस्या उभी राहणार आहे. असे चित्र दिसून येत आहे.

### जि.प. आणि पं.स. निवडणूक लांबण्याची शक्यता!

■ येत्या ८ ते १८ डिसेंबर या कालावधीत नागपूर हिवाळी अधिवेशन पार पडणार आहे. त्यामुळे अधिवेशन काळात आचारसंहिता लावता येणार नाही. म्हणून आगामी ग्रामीण भागातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका ह्या जानेवारी अथवा फेब्रुवारी महिन्यात होण्याची शक्यता राजकिय वर्तुळात वर्तविली जात आहे.

## शासकीय हमीभावाने सोयाबीन खरेदीचा शुभारंभ

**सोनाळा / प्रतिनिधी**

येथील खरेदी विक्री संघाच्या नाफेड केंद्र अंतर्गत शासकीय हमीभावाने सोयाबीन खरेदीचा शुभारंभ कृषी खरेदी विक्री पणन महासंघ येथे १९ नोव्हेंबर रोजी करण्यात आला आहे.सर्वप्रथम काटा पूजन करून प्रवीण विजय गांधी, विजय रामचंद्र गांधी, सचिन वासुदेव या शेतकऱ्यांचा शाल, टोपी व शेला देत सन्मान करण्यात आला. त्यानंतर ५ हजार ३२८ रुपये प्रति क्विंटल हमीभावाने सोयाबीन खरेदीला सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी खरेदी विक्री संघाचे व्यवस्थापक एम.पी. ताठे, केंद्रप्रमुख प्रदीप ताथोड, ग्रेडर विशाल राजपूत, यांच्यासह कृषी उत्पन्न बाजार समितीचे सहा. सचिव विनोद पुंडकर, रियाज खान, शालिग्राम घाटे यांच्यासह खरेदी विक्री व बाजार समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

## बदली झालेल्या शिक्षकांना कार्यमुक्त करा

### प्राथ. शिक्षक संघाचे बीईओंना निवेदन

**संग्रामपूर / प्रतिनिधी**

जिल्हा प्रशासनाने ऑनलाईन बदली केलेल्या शिक्षकांना स्थानिक पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने कार्यमुक्त करावे, अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघ संग्रामपूर तालुका शाखेच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात गटशिक्षणाधिकारी टाले यांना दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, बदलीसाठी पात्र असलेल्या शिक्षकांची रितसर ऑनलाईन बदली करण्यात आली असताना त्यांना तालुका स्तरावरून कार्यमुक्त करण्यात येत नसल्याने या सर्व शिक्षकांनी तालुका प्राथमिक संघाकडे अर्ज करून न्याय मागितला आहे. ऑनलाइन बदली झालेल्या शिक्षकांना मुख्य कार्यकारी अधिकारी बुलढाणा यांनी ९ सप्टेंबर २०२५ च्या आदेशाने कार्यमुक्त केले. पण पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने या शिक्षकांना अजूनही कार्यमुक्त केले नाही. त्यांना लवकर कार्यमुक्त करण्यात यावे. तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या काही शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक असल्याची वस्तुस्थिती आहे. तर काही शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे आहेत. याचा ताळमेळ शिक्षण विभागाने बसवून विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान टाळावे. अशी मागणी तालुका शिक्षक संघाच्या वतीने करण्यात आली आहे. निवेदनावर संघटनेचे राज्य सरचिटणीस गौतम मारोडे, तालुका अध्यक्ष शामलकुमार कौळकार सल्लागार मिलिंद सोनोने सरचिटणीस अनिल धनभर उपाध्यक्ष भीमराव वानखडे यांच्या सह्या आहेत. निवेदन देतेवेळी बदली झालेले शिक्षक सुद्धा बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक महाभूमि

# वाशिम भूमि

रविवार । २३ नोव्हेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### पथनाट्यातून मतदान जनजागृती

**कारंजा:** नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने जिल्हा स्वीप अभियानांतर्गत कारंजा येथे एनसीसी विद्यार्थ्यांनी शहरातील प्रमुख ठिकाणी पथनाट्य सादर करून मतदान जनजागृती केली. जयस्तंभ चौक, सावित्रीबाई फुले चौक, पोहो वेश, झाशी राणी चौक, बसस्थानक व तहसील परिसरात सादर झालेल्या पथनाट्यांनी नागरिकांचे लक्ष वेधले. 'माझं मत माझा अधिकार' आणि 'जबाबदार नागरिक बना' अशा घोषणांनी शहरात जनजागृतीचे वातावरण निर्माण झाले. उपक्रमाचे मार्गदर्शन निवडणूक निर्णय अधिकारी कैलास देवरे, सहाय्यक निवडणूक अधिकारी कुणाल झाल्टे, मुख्याधिकारी महेश वाघमोडे आणि स्वीप नोडल अधिकारी श्रीकांत माने यांनी केले. अधिकाऱ्यांनी या उपक्रमामुळे मतदानाचा टक्का वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली.

### मूल्यवर्धन प्रशिक्षणात ५३१ शिक्षक सहभागी

**मानोरा:** शिवाजीनगर येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत घेण्यात आलेले 'मूल्यवर्धन ३.०' प्रशिक्षण तीनही टप्प्यांत यशस्वीरीत्या पूर्ण झाले. २० नोव्हेंबर रोजी तिसरा व अंतिम टप्पा उत्साहात पार पडला. पंचायत समिती मानोराअंतर्गत ऑक्टोबर ते नोव्हेंबरदरम्यान जिल्हा परिषद, अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांमधील शिक्षकांसाठी तीन दिवसीय तालुकास्तरीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षणादरम्यान गटशिक्षणाधिकारी अनिल पवार यांनी शिक्षकांना मूल्यवर्धन उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. तालुकास्तरीय समन्वयक म्हणून विषय साधन व्यक्ती धनराज मेहल्डे यांनी प्रभावी समन्वय साधला. प्रवीण बेलखेडे व रवींद्र राऊत यांनी प्रशिक्षणार्थी शिक्षकांचे मार्गदर्शन केले. मानोरा तालुक्यातील ११ केंद्रांमधील ५३१ शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग नोंदवला.

### १४ नगराध्यक्ष, २५६ नगरसेवक उमेदवार; तिकीटवाटपावरून खदखद

# अटी तटीची लढत : नगराध्यक्ष व नगरसेवक निवडणुकीत बहुरंगी चुरस

**वाशिम / प्रतिनिधी**




नगरपरिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर वाशिममध्ये राजकीय तापमान चांगलेच वाढले आहे. नगराध्यक्षपदासाठी अटीतटीची लढत अपेक्षित असताना, नगरसेवक पदासाठीही तितकीच चुरस निर्माण झाली आहे. महायुतीत भाजप आणि अजित पवार गट आमने-सामने आले असून महाविकास आघाडीकडून उद्धवसेना रिंगणात उतरली आहे. त्याशिवाय वंचित, एआयएमआयएम आणि आम आदमी पार्टीचे उमेदवारही असल्याने बहुरंगी लढत तयार झाली आहे.

मतविभाजनाचा परिणाम कोणाला फायद्याचा ठरेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाशिम नगराध्यक्ष पदाची जागा नामांकित प्रवर्गासाठी आरक्षित असल्याने जातीय समीकरणे विशेष महत्वाची ठरली आहेत. पक्षांनी उमेदवार निवडताना हे गणित लक्षात घेतले असून लहान पक्ष व अपक्षांकडे किती मते जातात यावरही निकालाची दिशा अवलंबून राहणार आहे.

नगराध्यक्षपदासाठी एकूण ३२ अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर ३० अर्ज वैध ठरले, तर ८ अर्ज बाद झाले. त्यानंतर ३ नगराध्यक्षपदाचे उमेदवार आणि नगरसेवकपदासाठी अर्ज केलेल्या ५० जणांनी माघार घेतल्यानंतर लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे. तिकिटवाटपाच्या पार्श्वभूमीवर काही पक्षांनी 'आयाराम' प्रकारातील नव्या चेहऱ्यांना उमेदवारी दिल्याने जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचा सुर उमटत आहे.

#### धनंजय घुगे यांच्या 'हटके' पोस्टरची चर्चा

■ भारतीय जनता पक्षातील काही निष्ठावंत कार्यकर्त्यांनी तिकीटवाटपाबाबतचा संताप विविध माध्यमांतून व्यक्त केला असून त्यात ज्येष्ठ स्वयंसेवक व जुने भाजपा कार्यकर्ते धनंजय घुगे यांची नाराजी विशेष चर्चेत आहे. धनंजय घुगे यांनी शहरात अनोख्या पद्धतीने पोस्टर आणि बॅनर लावून 'पुन्हा एकदा उमेदवारी कापल्याबद्दल' धन्यवाद असा उपरोधिक संदेश दिला आहे. त्यांच्या बॅनरवर त्यांनी विविध निवडणुकांमध्ये आपली उमेदवारी कापण्यात आल्याचे खुलेपणाने नमूद केले असून यामुळे सोशल मीडियावर चर्चेची जोरदार लाट उसळली आहे. पक्षात अनेक वर्षे काम करूनही दरवेळी तिकीट न मिळण्याचा आक्रोश त्यांनी अनोख्या अंदाजात व्यक्त केला.

#### नगरसेवक पदाच्या ३२ जागेसाठी २५६ उमेदवार

■ वाशिम नगरपरिषद निवडणुकीत सर्वाधिक उमेदवार रिंगणात असून नगराध्यक्षपदासाठी तब्बल १४ उमेदवार उभे आहेत. १६ वार्डांतील ३२ जागांसाठी तब्बल २५६ उमेदवार स्पर्धेत असल्याने निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे.

#### लक्ष्मण इंगोले, नागोराव ठेंगडे यांची माघार

■ नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांमध्ये २१ नोव्हेंबर रोजी मोठी हालचाल पाहायला मिळाली. उध्दवसेनेचे लक्ष्मण इंगोले आणि भाजपमध्ये प्रवेश केलेले नागोराव ठेंगडे यांनी आपली उमेदवारी माघार घेतली आहे. त्यांच्यासोबत सलीम बेनीवाले यांनीही अर्ज मागे घेतल्याने नगराध्यक्षपदाच्या लढतीतून तिघांची माघार झाली.




# 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' विशेष मोहीम

### अभियानात विविध बाबींची जनजागृती

**वाशिम / प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जागतिक शौचालय दिन (१९ नोव्हेंबर) निमित्त जिल्ह्यात 'हमारा शौचालय, हमारा भविष्य' ही विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये वैयक्तिक आणि सार्वजनिक शौचालयांची तपासणी, दुरुस्ती, सुशोभीकरण आणि रंगरंगोटी करून ती वापरात आणली जाणार आहेत.

ही मोहीम मानवी हक्क दिनापर्यंत म्हणजे १० डिसेंबर २०२५ पर्यंत राबविण्यात येणार असून सर्वांनी त्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले. मोहिमेचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्या हस्ते झाला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण गणेश कोवे, पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आत्माराम बोंद्रे, धैर्यशील पाटील आणि राम श्रृंगारे उपस्थित होते.

#### ५ डिसेंबरपर्यंत अभियान

■ २१ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत जिल्ह्यात विविध जनजागृती उपक्रम राबविले जातील. शाळा, ग्रामसभा, स्वयंसहाय्य गट, युवक मंडळे, निवृत्त सैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते यांना सहभागी करून स्वच्छता, सुरक्षित मलनिस्सारण आणि हवामान अनुकूल स्वच्छता या विषयांवर व्यापक जनजागृती केली जाणार आहे.

# किरकोळ वादातून शस्त्राने भोसकून खून

### मंगरूळपीरच्या मंगलधाम भागातील घटना; मुख्य आरोपी अटक

**मंगरुळपीर / प्रतिनिधी**



शहरातील मंगलधाम झोपडपट्टी येथे किरकोळ कारणावरून झालेल्या भांडणात एका व्यक्तीचा धारदार शस्त्राने भोसकून खून झाल्याची घटना २२ नोव्हेंबर रोजी घडली. पोलिसांनी या प्रकरणी चार आरोपींवर गुन्हा दाखल करून एका आरोपीस अटक केली आहे.

फिर्यादी वैभव ज्ञानेश्वर खाडे (२३, रा. मंगलधाम झोपडपट्टी) यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्या घरावरील विद्युत तारेवर पतंगाचा धागा अडकला होता. तो धागा हटवताना विजेची तार तुटून नुकसान होऊ शकते असे सांगितल्याने आरोपी कार्तिक गजानन गायकवाड (२०), गीता गजानन गायकवाड आणि दोन अल्पवयीन मुलांशी वाद झाला. वाद वाढताच आरोपी कार्तिक गायकवाड यांनी फिर्यादीचे वडील ज्ञानेश्वर खाडे यांच्यावर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी चार आरोपींवर खुनाचा गुन्हा दाखल करून कार्तिक गायकवाडला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

# पथनाट्य व फ्लॅश मॉबद्वारे मतदान जनजागृती

**मंगरुळपीर / प्रतिनिधी**



नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा निवडणूक विभागाच्या स्वीप उपक्रमांतर्गत मंगरूळपीर शहरात एनसीसी विद्यार्थ्यांनी पथनाट्य आणि फ्लॅश मॉबच्या माध्यमातून प्रभावी मतदान जनजागृती राबवली. शहरातील विविध ठिकाणी विद्यार्थ्यांनी संवादप्रधान नाट्यप्रयोग, घोषणाबाजी आणि आकर्षक फ्लॅश मॉब सादर करून नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले.

या जनजागृती उपक्रमांना शहरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. बसस्थानक, शिवाजी चौक बायपास, बिरबलनाथ मंदिर परिसर, जुनी नगरपरिषद, दर्गाह परिसर, तहसील कार्यालय परिसर तसेच जिल्हा परिषद हायस्कूल येथे या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या उत्साहपूर्ण सहभागामुळे प्रत्येक ठिकाणी मतदानाबाबत जागरूकतेचे वातावरण निर्माण झाले. 'तुमचे मतदान तुमचा अधिकार', 'लोकशाहीला बळ देण्यासाठी मतदान हक्क बजावा', 'नागरिकत्वाची खरी पूर्तता मतदानातून' अशा प्रभावी संदेशांद्वारे विद्यार्थ्यांनी मतदारांना लोकशाहीतील सहभागाचे महत्त्व लक्षात आणून दिले. या उपक्रमासाठी जिल्हा निवडणूक कार्यालय, स्थानिक प्रशासन तसेच शैक्षणिक संस्थांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमादरम्यान निवडणूक निर्णय अधिकारी व उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव तसेच स्वीपचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# 'त्या' नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**वाशिम / प्रतिनिधी**



नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील डोंगराळे गावात तीन वर्षीय चिमुकलीवर १६ नोव्हेंबर रोजी एका नराधमाने अमानवी कृत्य करून तीची हत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली.

या घटनेने राज्यभरात संतापाची लाट उसळली असून वाशीममधील विविध सामाजिक संघटनांनी या प्रकरणातील आरोपीला फाशी देण्याची मागणी करत जिल्हाधिकारी यांच्यामार्फत महाराष्ट्र शासनाला २१ नोव्हेंबर रोजी निवेदन सादर केले. या निवेदनामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, देशात व राज्यात अशा अमानवी आणि विकृत घटनांची मालिका सुरू असून समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत आहे.

अशा प्रकारांना पायबंद घालण्यासाठी शासनाने कठोर उपाययोजना करणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे डोंगराळे येथील चिमुकली यज्ञावर अत्याचार करून तिचा जीव घेणाऱ्या नराधमास त्वरित फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. निवेदन देताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रवीण पट्टेबहादूर, सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक संघटनेचे आर. पी. कांबळे, ब्राम्हणवाडा ग्रामपंचायत सदस्या सीमा बोरकर, समता सैनिक दलाच्या महिला कमांडर कविता डोंगरदिवे, संघर्ष प्रतिष्ठानच्या सीमा देशमुख, शिवसेना शिंदे गटाच्या संतोषी भंडारी, उषा वानखेडे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

### धारदार चाकूसह युवक अटक

**मंगरूळपीर / प्रतिनिधी**

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थापन केलेल्या स्थिर सर्वेक्षण पथकाने २१ नोव्हेंबर रोजी कारवाई करत एका युवकाकडून धारदार चाकू जप्त केला आणि त्यास पोलिसांच्या ताब्यात दिले.

यावेळी क्रमांक एमएच २४ एएफ ६६९७ या वाहनास थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनातून कोणतीही संशयास्पद सामग्री न मिळाल्याने चालकाची झडती घेण्यात आली. त्यावेळी काळ्या कव्हरमध्ये ठेवलेला एक धारदार चाकू आढळून आला. चौकशीत चालकाने आपले नाव सौरभ पांडुरंग साखरे (२२, रा. हिसई ता. मंगरूळपीर) असे सांगितले.

### वेगाची एक झेप विजयाकडे धाव!



**वाशिम :** अस्मिता ॲथलेटिक्स लीग २०२५-२६ अंतर्गत वाशिममध्ये झालेल्या मुलींच्या धावण्याच्या स्पर्धेला उत्साहपूर्ण प्रतिसाद मिळाला. ट्रॅकवर धावपटूंनी दाखवलेली जिद्द, वेग आणि स्पर्धात्मकता वातावरणात रंगत आणणारी ठरली. प्रत्येक धावपटूने विजयाच्या दिशेने जोरदार झेप घेत प्रेक्षकांची दाद मिळवली. क्रीडांगणावर उमटलेला हा क्षण केवळ वेगाचा नव्हे, तर आत्मविश्वास आणि मेहनतीचा उत्सव ठरला.

### २६ नोव्हेंबरला चिन्हवाटप; फक्त चार दिवसांमध्येच करावा लागणार जोरदार प्रचार

# अपक्षांसाठी 'चिन्ह' संकट! सध्या नावावरच प्रचार

**वाशिम / प्रतिनिधी**



जिल्ह्यातील नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीत अपक्ष उमेदवारांपुढे अनपेक्षित अडचण उभी राहिली आहे. यंदा पहिल्यांदाच माघारीनंतर तब्बल सहा दिवस निवडणूक चिन्हाविना प्रचार करण्याची वेळ येत आहे. अपिलांच्या प्रक्रियेमुळे चिन्हवाटपाचा दिवस उशीराने निश्चित झाल्याने अपक्षांना केवळ चार दिवसांमध्येच चिन्हासह प्रचाराचा जम बसवावा लागणार आहे.

नगरपालिकांच्या दाखल अर्जांवरील अपिलांचा निकाल २५ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे २६ नोव्हेंबरला चिन्हांचे वाटप होणार आहे.

अपक्ष उमेदवारांना याच दिवशी चिन्ह मिळणार असल्याने त्यांना २७ ते ३० नोव्हेंबर असे केवळ चार दिवस प्रत्यक्ष चिन्हासह प्रचारासाठी मिळणार आहेत. साधारणपणे माघारीच्या दिवशीच निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येते. प्रचार साहित्य, बॅनर, पोस्टर, सोशल मीडिया कॅम्पेनची दिशा त्या दिवसापासूनच ठरते. पण यंदाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या विलंबामुळे अपक्षांना सध्या केवळ आपल्या नावाचा प्रचार करावा लागत आहे. निवडणूक विभागाकडूनही हा विलंब अपिलांच्या प्रक्रियेचा परिणाम असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. २१ नोव्हेंबर ही उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत होती. गुरुवारी जिल्ह्यातील १२३ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. शुक्रवारी आणखी किती जण माघारी घेतील, याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. अपिलांच्या निकालानंतरच पुढील प्रक्रिया सुरळीत होणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

#### चार दिवसांचा प्रचार

■ २६ नोव्हेंबरला चिन्हांचे वाटप होताच ३० नोव्हेंबरपर्यंत प्रचाराची मुदत संपणार आहे. म्हणजे अपक्षांना अवघ्या चार दिवसांत घराघरांत चिन्ह पोहोचवून वातावरण निर्मिती करावी लागणार आहे.

#### पक्षांच्या उमेदवारांना 'नो टेन्शन'

■ पक्षांकडून लढणाऱ्या उमेदवारांची निवडणूक चिन्हे निश्चित असल्याने त्यांना कोणताही विलंब भासणार नाही. त्यांनी चिन्हासह जोरदार प्रचार सुरू केला आहे.

### सावरगाव बर्डे शाळेत तंबाखूमुक्तीची शपथ

**वाशिम / प्रतिनिधी**

राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अनिल कावरखे व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अविनाश पुरी यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद उच्च प्राथमिक विद्यालय, सावरगाव बर्डे येथे तंबाखूजन्य अंमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला.

कार्यक्रमात तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा, तंबाखूमुक्त शाळा संकल्पना, तसेच तंबाखूचे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी तंबाखूमुक्तीसाठी उपलब्ध टोल फ्री क्रमांकाची माहिती घेतली. तसेच सर्वांनी सामूहिक शपथ घेतली.

# महाटीईटीसाठी परीक्षार्थी सज्ज; आज २२ केंद्रांवर परीक्षा

**वाशिम / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील तब्बल ८ हजार २७० परीक्षार्थी महाटीईटी २०२५ परीक्षा देणार असून, या परीक्षेचे पारदर्शक, सुरळीत आणि सुरक्षित आयोजन करण्याची सर्व तयारी प्रशासनाने पूर्ण केली आहे.

महाटीईटी परीक्षा २३ नोव्हेंबर २०२५ रोजी दोन सत्रांत होणार असून पहिला पेपर सकाळी १०.३० ते दुपारी १.०० तर दुसरा पेपर दुपारी २.३० ते सायं. ५.०० या वेळेत घेण्यात येणार आहे. पहिल्या सत्रासाठी १५ आणि दुसऱ्या सत्रासाठी २२ परीक्षा केंद्रे निश्चित केली असून सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही, फेस रिडिंग आणि मेटल डिटेक्शन यांसह कडक सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. परीक्षेसाठी निर्धारित प्रमुख केंद्रांमध्ये शिवाजी विद्यालय, मुलीबाई चरखा इंग्लिश स्कूल, राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय, बाकलीवाल विद्यालय, सुशिलाताई जाधव विद्यानिकेतन, मालतीबाई सरनाईक कन्या विद्यालय, माऊंट कार्मेल स्कूल, दि वर्ड स्कूल, आर.ए. कॉलेज, श्री लालबहादुर विद्यालय, मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालय, नवोदय विद्यालय, रेखाताई कन्या विद्यालय, झेड.पी. हायस्कुल, सय्यद मोहसीन उर्दू हायस्कुल, लॉयन्स विद्यानिकेतन, नारायणा किड्स, समर्थ इंग्लिश स्कूल, विद्याभारती माध्यमिक शाळा, शरदचंद्र पवार विद्यालय, काशिरामजी पाटील विद्यालय आणि श्रीमती राधादेवी बाकलीवाल कन्या विद्यानिकेतन यांचा समावेश आहे.

## न्यूज ब्रीफ

### युवती बेपत्ता

**मोताळा :** नांदुरा तालुक्यातील फुली येथून २२ वर्षीय युवती २१ नोव्हेबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास बेपत्ता झाल्याची घटना उघडकीस आली. याबाबत मुलीच्या आईच्या तक्रारीवरुन बोराखेडी पोलिसांनी मिसींग दाखल केली आहे. बोराखेडी पोलिस स्टेशन हद्दीतील फुली ता. नांदुरा येथील ज्योती श्रीकृष्ण सरोदे यांनी पोलिसात तक्रार दिली की, घरात त्यांची मुलगी प्रीती श्रीकृष्ण सरोदे (वय २२) ही २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास कुणाला काहीही न सांगता निघून गेली. तीचा आजुबाजुच्या परिसरात शोध घेतला असता ती मिळून आली नाही. युवतीची उंची ५ फुट २ इंच, रंग गोरा, बांधा सडपातळ आहे, अशा फिर्यादीवरुन बोराखेडी पोलिसांनी मिसींग दाखल केली आहे.

### शेतकऱ्यास मारहाण; गुन्हे दाखल

**सिंदखेड राजा :** तालुक्यातील जऊळका येथील शेतकऱ्याने स्वतः च्या कष्टाच्या कापसाचे थकित पैसे मागितल्यावरून त्याच्यावर व्यापाऱ्यांनीच हल्ला चढवला. मारहाण, जातीवाचक शिवीगाळ आणि जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी कापसाचा व्यापारी आणि त्याच्या कुटुंबातील चार जणांवर किनगाव राजा पोलीसांनी अॅट्रॉसिटी सह विविध कलमाखाली गुन्हे दाखल केले आहे. जऊळका येथील शेतकऱ्यांनी लिंगा येथील कापसाचे व्यापारी जायभाये यांच्याकडे कापसाचे १,३७,७०९ रुपये बाकी होते. तक्रारदार प्रल्हाद नामदेव साळवे (वय ५९) रा. जऊळका यांनी विक्री केलेल्या १९ क्विंटल २६ किलो कापसाचे १, ३७,७०९ रुपये मागितले. यावेळी व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यासोबत वाद घातला. तसेच १८ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता साळवे दांपत्य आणि पुतण्या शिवाजी साळवे हे पैसे मागण्यासाठी आरोपींच्या घरी गेले असता आरोपी प्रल्हाद जायभाये यांनी पैसे कोर्टातूनच घ्या, असे म्हणत फिर्यादीची कॉलर पकडून लोटपोट केली. पवन जायभाये यांनी फिर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करून अपमानित केले.

### तृतीयपंथी स्मृतीदिन साजरा

**बुलढाणा :** समाज कल्याण कार्यालयामार्फत बुलढाणा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलींचे शासकीय वसतीगृहात २१ नोव्हेंबर रोजी तृतीयपंथीय स्मृतीदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी समान हक्क, संवेदनशील व सन्मानावर भर देण्यात आला. २० नोव्हेंबर २००५ रोजी तृतीयपंथीय समुदायाला भेडसावणाऱ्या अन्याय, भेदभाव आणि हिंसाचाराच्या विरोधात नोंद झालेल्या घटनांच्या स्मरणार्थ हा दिवस पाळला जातो. त्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रथमच अशा प्रकारचा अधिकृत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे बाल कल्याण समिती सदस्य अधिवक्ता अनुराधा वावगे यांनी तृतीयपंथीयांसाठी उपलब्ध कायदे, दस्तऐवजांमध्ये होणारे बदल, शिक्षण, आरोग्य, आर्थिक मदत आणि इतर कल्याणकारी योजनांची माहिती तपशीलवार दिली.

## बुलढाणा पोलिसांची कारवाई ; २० दुचाकी जप्त

# विविध ठिकाणाहून दुचाकींची चोरी ; दोन जण गजाआड

**बुलढाणा / प्रतिनिधी**



जिल्ह्यातील विविध ठिकाणाहून दुचाकी चोरणाऱ्या आरोपीस बुलढाणा पोलिसांनी अटक केली आहे. दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांमुळे पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांनी यासंदर्भातील गुन्ह्यांची उकल करण्याचे आदेशीत केले होते. त्यानुसार, शहर ठाणेदार रवी राठोड यांनी एक पथक तयार करून एकत्रित अहवाल तयार केला आणि कारवाई सुरू केली.

शहर पोलिसांच्या पथकाने दुचाकी चोरीच्या विविध प्रकरणांचा सखोल अभ्यास केला. दरम्यान, शहर हद्दीत १६ नोव्हेंबर रोजी दाखल असलेल्या तक्रारी नुसार तपास केला असता मोठ्या शिताफीने आरोपी शिवाजी रामदास राठोड (६१ वर्ष, रा. डोंगर खंडाळा) ह.मु. वाशिम यास तात्काळ ताब्यात घेवून विचारपुस करण्यात आली. या प्रकरणाची तक्रार ताजमोहम्मद अहमद सैयद (रा. तानाजी नगर, बुलढाणा) यांनी दिली होती. त्यानुसार, स्टेट बँक ऑफ इंडीयाच्या बाजुला त्यांची उभी असलेली दुचाकी चोरी गेली होती.

आरोपी शिवाजी राठोड याची पोलीस कोठडीत कसून चौकशी केल्यानंतर चोरी केलेल्या दुचाक्या त्याचा सहकारी सुधाकर चंद्रकांत अटकोरे (३८ वर्ष रा. शिरला, जि. हिंगोली) याला दिल्याचे त्याने सांगितले. वरीष्ठांच्या परवानगीने जिल्हा हिंगोली येथून तपास पथकाने तब्बल २० दुचाकी जप्त केल्या.

**कारवाई पथक..**

■ जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर पाटील यांच्या आदेशान्वये शहर ठाणेदार रवि राठोड, पोलीस उपनिरीक्षक रवि मोरे, अश्विनी गाडे, माधुरी साळुंके, पोहेकॉ संतोष वाघ, पोहेकॉ संदिप कायंदे, सुनिल जाधव, महिला पोहेकॉ सुनिता खंडारे, पोकॉ विशाल बनकर, विनोद बोरे, मनोज सोनुने, पोना अमोल गवई (पोस्टे चिखली) व पोहेकॉ राजु आडवे, पोकॉ कैलास ठोंबरे तांत्रीक विश्लेषण विभाग बुलढाणा यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली.

# गौण खनिज प्रकरणी संयुक्त कारवाईचे निर्देश

**चिखली / प्रतिनिधी**



जिल्ह्यातील वाळू, मुरुम, दगड आदी गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी स्वतः रस्त्यावर उतरून कारवाई केल्यानंतर आता सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पोलिस अधिकारी, प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) आणि संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना अवैध उत्खनन व वाहतुकीविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

पोलिस, आरटीओ आणि महसूल प्रशासनाने अशा तक्रारींची गंभीर दखल घेऊन संयुक्तपणे अवैध उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. जिल्ह्यात सुमारे ४० वाळू घाट आहेत. या घाटांची तपासणी करून अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक रोखावी. वाळू घाट परिसरातील गावांतील गौण खनिज वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करावी. तसेच पोलिस आरटीओ आणि महसूल प्रशासनाने पथक नेमून नियमितपणे गस्त करावी. अवैध वाळू उत्खनन आणि वाहतूक करणाऱ्यांकडून दंडही वसूल करावा. संशयित आणि विनाक्रमांकाच्या वाहनांवर कारवाई करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. खडकपूर्णा धरणातून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याच्या घटनांबाबत महसूल भागातील अधिकाऱ्यांना तत्काळ कारवाई करावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी दिल्या आहेत.

# शोषणमुक्त समाजासाठीच बिरसा मुंडा यांचे उलगुलान: प्रशांत सोनोने

## बिरसा मुंडा जयंतीनिमित्त कार्यक्रम

**बुलढाणा / प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय अशा समग्र क्रांतीस्तव, शोषणमुक्त भयमुक्त समतामूलक समाज निर्मितीसाठी बिरसाचे उलगुलान हे आआंदोलन उभारले, असे प्रतिपादन मुलनिवासी मुक्ती मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत सोनोने यांनी केले.

समशेरसोंग पारधी अगिवासी आश्रमशाळा येथे बिरसा मुंडाच्या १५० व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन जाहीर के. ओ. कवस्कर यांच्या हस्ते करण्यात आले. प्रारंभी जननायक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहारार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यता आली. राजेश गवई, सिघ्र कत्री साहित्यिक सुरेश बंद, मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल हिवाळे, तसेच संस्था चालक युवराज पवार, चकताई पवार, प्रमिलालाई पवार प्रामुख्याने उपस्थित होते. पुढे बोलताना प्रशांत सोनोने म्हणाले की, सृष्टीच्या उत्पती पासूनच आदिवासी मूळ मालक आहेत.

बिरसाची सुध्दा सिंह गर्जना होती. आदिवासी हा जल, जंगल, जमीनचा दावेदार आहे, मालक आहे, असे बिरसामुंडा यांनी सांगितले होते. भारताचा प्रथम स्वातंत्र्य संग्राम १८५७ चा स्वातंत्र्य लढा नव्हे तर १८५५ साली आदिवासी क्रांतिकारक सिध्दू, कानू, चांद, भैरव व त्यांच्या भगीनी फुलो, झानो यांनी उभारलेला सामूहिकतेने लढलेला भारताचा प्रथम स्वातंत्र्य लढा होय, असे त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाची सुरुवात शाहीर बावस्कर यांनी जननायक धरती आबा बिरसा मुंडाचा पोवाडा सादर करून केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक युवराज पवार यांनी केले. आभार विजय परदेसी यांनी मानले.

**समाजाचा इतिहास पुनर्जिवीत करणे गरजेचे : बावस्कर**

■ उलगुलान हे केवळ इंग्रजाविरोधात नाही तर दिक्कू म्हणजे बाहेरून आलेल्या तमाम शोषकांच्या विरोधात उभारण्यात आले होते. यात जमीनदार, सावकार, शेटजी, भटजीं, पादरी यांचा देखील समावेश करण्यात आला आहे. सन १९२० मानगढ राजस्थान येथील युध्दात सुध्दा १७०० आदिवासी इंग्रजांशी लढत शहीद झाले होते, पण कोणत्याही इतिहासाच्या पुस्तकात यांची नोंद नाही. त्यामुळे आदिवासींचा हा जाज्वल्य इतिहास पुनर्जिवीत करून प्रकाशात आणणे आत्यंतिक गरजेचे असल्याचे के. ओ. बावस्कर यांनी सांगितले.

# प्रा. डॉ. कानडजे यांना राज्यस्तरीय ‘साहित्य वैभव’ पुरस्कार

**बुलढाणा/प्रतिनिधी**



माजी प्राचार्य, मातृभाषा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. एस. एम. कानडजे यांना प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय ‘साहित्य वैभव’ पुरस्कार जाहीर झाला आहे. श्रीफळ, शाल स्मृतिचिन्ह आणि दहा हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

सुप्रसिद्ध विचारवंत साहित्यिक कै. डॉ. सदाशिव त्र्यंबक कुल्ली यांच्या स्मृतिदिनी २३ नोव्हेंबर रोजी कवी -कादंबरीकार श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येईल, अशी माहिती व्रिक्ष फाउंडेशन तसेच प्रगती सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्ष सुजाता कुल्ली यांनी दिली आहे.

‘साहित्य वैभव’ हा पुरस्कार डॉ.सदाशिव कुल्ली यांच्या स्मृती प्रित्यर्थ वाङ:मयीन क्षेत्रात उल्लेखनीय महत्त्वाची कामगिरी करणाऱ्या साहित्यिकांचा सन्मान करण्यासाठी दिला जातो. यापूर्वी तीन साहित्यिकांना हा पुरस्कार दिला असून कोरोना काळानंतर आता तो नव्याने सुरू करण्यात आला आहे. डॉ. एस. एम. कानडजे यांचे चार समीक्षा ग्रंथ प्रकाशित झाले असून त्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठासाठी डॉ. अनंतराव शिरसाट यांच्या सहकार्याने तीन पाठ्यपुस्तके संपादित केली. ‘वाचे बर्वे कवित्व’ हा त्यांचा अलीकडे प्रसिद्ध झालेला समीक्षा ग्रंथ सध्या चर्चेत आहे. त्यांचे विविध वाङ:मयीन नियतकालिकात तसेच दैनिकात सातत्याने लेखन प्रकाशित होत असते.

साहित्यिकांच्या वाङ्मयीन कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि लेखकांना लिहिण्यासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून हा पुरस्कार दिला जातो. असे प्रगती वाचनालयाच्या वतीने सुजाता कुल्ली यांनी सांगितले आहे.

# खो–खो चषक ; यजमान संघांची यशस्वी घोडदौड



**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्हा खो-खो असोशिएशन व आदिती अर्बन यांच्या संयुक्त विद्यमाने होत असलेल्या ज्युनिअर विदर्भ राज्यस्तरीय खो-खो ‘‘अदिती अर्बन चषक ‘‘ अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटनीय सामन्यांना शुक्रवारी सुरूवात झाली. यामध्ये मुलींच्या यजमान बुलढाणा संघाने वर्धा संघावर ९ गुण आणि एका डावाने विजय मिळविला.

कर्णधार प्रियंका भानुदास घूबे हिने आपल्या संघासाठी क्षेत्र रक्षणादरम्यान ४ मीनीट ४५ सेकंद, आरती अनंता घूबे हिने २ मीनिटांची तर पुजा घूबे हिने नाबाद खेळी केले. गोंदिया विरुद्ध भंडारा सामना मुलींचा संघाने ५ गुण १ गडी राखुन जिंकला. तर, मुलांच्या यजमान बुलढाणा संघाने वाशिम संघाचा १३ गुणांनी पराभव करून सामना जिंकला. अकोला विरुद्ध वर्धा सामन्यात वर्धा संघाने ३ गुण आणि एका डावाने, वाशिम चंद्रपूर विरुद्ध चंद्रपूर सामना चंद्रपुरने ३ मिनिट ४० सेकंड राखून जिंकला. साखळी पहदतीने सुरु असलेल्या या सामन्यांमध्ये विदर्भातील ११ जिल्ह्यांचे मुला मुलींचे २२ संघ सहभागी झाले असुन ही स्पर्धा रविवार, २३ नोव्हेंबर रोजी पार पडणार आहे.

# जिल्हा कारागृहाजवळ एकाला मारहाण ; गुन्हा दाखल

**बुलढाणा/प्रतिनिधी**

वाहन भाड्याच्या वादातून तिघांनी मिळून एकाला मारहाण केल्याची घटना बुलढाणा शहरात घडली. याप्रकरणी जखमी मोहम्मद इकबाल अब्दुल रज्जाक (वय ४२, रा. फिरदोस कॉलनी, अकोला, ह.मु. बुलढाणा) यांनी २० नोव्हेंबर रोजी शहर पोलिसांत तक्रार दाखल केली असून, त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारीनुसार, १५ नोव्हेंबर रोजी मोहम्मद यांच्या ओळखीचे शफाक बागवान व चालक मसंदे यांच्या माध्यमातून कुंदन रावसाहेब झिने यांच्या मामाचे वाहन १८०० रुपये रोजाने भाड्याने घेण्याचे ठरले होते; मात्र दुसऱ्या दिवशीच वाहन खराब झाल्याने ते घरासमोर उभे ठेवण्यात आले. १८ नोव्हेंबर रोजी कुंदन झिने आणि दोन अनोळखी व्यक्तींनी मोहम्मद यांना भेटून गाडी भाड्याबाबत बोलायचे आहे असे सांगितले. त्यानंतर त्यांनी तक्रारदाराला मोटारसायकलवर कारंजा चौकात नेण्याचे सांगून जिल्हा कारागृहाच्या पाठीमागे असलेल्या दर्याजवळ नेले. तेथे तिघांनी मिळून वाहनभाडे विषयावरून वाद घालत मारहाण केली. कुंदन झिने याने मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# डॉ. सदाशिव त्र्यंबक कुल्ली यांच्या स्मृतिदिनानिमित्त ‘ज्ञानदान’

**बुलढाणा/प्रतिनिधी**



साहित्यिक आणि मार्क्सवादी विचारवंत डॉ. सदाशिव त्र्यंबक कुल्ली यांची पुण्यतिथी २३ नोव्हेंबर रोजी साजरी करण्यात येत आहे. त्यानिमित्ताने दरवर्षी ज्ञानदानाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात येतो. यावर्षी या कार्यक्रमांतर्गत ‘संत साहित्याचे वर्तमा’ या विषयावर नांदेड येथील नामांकित वक्ते, कवी, कादंबरीकार श्रीकांत देशमुख यांचे व्याख्यान होईल.

बळिवंत, आषाढमाती हे काव्यसंग्रह आणि पिढीजात ही त्यांची कादंबरी जाणकारांच्या पसंतीस उतरली आहे. तसेच ‘बोलावे ते आम्हीच’ या त्यांच्या कवितासंग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. खामगाव येथील डॉ.दादा कवीश्वर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न होणार असून याप्रसंगी प्राचार्य डॉ. गोविंद गायकी हे प्रमुख अतिथी असतील. या कार्यक्रमात सुप्रसिद्ध समीक्षक डॉ. एस. एम. कानडजे यांना राज्यस्तरीय ‘‘साहित्य वैभव‘‘ हा पुरस्कारही प्रदान करण्यात येईल. शाहूनगरमधील प्रगती सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात सायंकाळी ६वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास साहित्य रसिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन व्रिक्ष फाउंडेशन आणि प्रगती वाचनालयाच्या अध्यक्ष सुजाता कुल्ली यांनी केले आहे. डॉ. कुल्ली यांची ओळख महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध साहित्यिक आणि मार्क्सवादी विचारवंत अशी असून, संहित्याच्या माध्यमातून त्यांनी जनप्रबोधन केले आहे.

# शेतकऱ्यांना कापूस कीड रोगाबाबत मार्गदर्शन

**मोताळा / प्रतिनिधी**

तालुक्यातील खरबडी येथे केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर तसेच कृषी विज्ञान केंद्र जळगांव जामोद बुलडाणा यांच्या द्वारे सुरू असलेल्या विशेष कापूस प्रकल्पातील प्रगतशील शेतकरी नथ्थु नारखेडे यांच्या प्रक्षेत्रावर २१ नोव्हेंबर रोजी प्रक्षेत्र दिवस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास खरबडीचे भागवत किनगे तर मार्गदर्शक म्हणून कृषी विज्ञान केंद्र जळगाव जामोद प्रकल्पाचे नोडल अधिकारी अनिल गाभणे, शाखज्ञ संजय उमाळे, उपकृषी अधिकारी पी.एस. पाटील, खरबडी येथील कृषी सहायक तायडे, शिरवा कृषी सहायक ठाकरे, ग्रामपंचायत सदस्य गणेश कीनगे, सामाजिक कार्यकर्ते गणेश निकाळजे तसेच राशी सिड्सचे प्रतिनिधी यांची उपस्थिती होती. यावेळी अनिल गाभने यांनी ापूस पीक किड व रोग नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले.



ठाकरे यांनी कृषीतील नवीन तंत्रज्ञान तर उमाळे यांनी माती नमुने तपासून सेंद्रिय कर्ब कसा वाढविणे, पाटील यांनी कृषीच्या नवीन योजनेबाबत मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन सचिन नावकर यांनी तर आभार आशिष चव्हाण यांनी केले.

## शासन निर्णयाची अंमलबजावणी ; ग्रामस्थांचा प्रतिसाद

# रुईखेड मायंबा येथे ५० टक्के घरपट्टी, पाणीपट्टी माफ

**रुईखेड मायंबा / प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार, एक रकमी करसवलतीमुळे पाणीपुरवठ्यासारख्या योजना प्रभावित होत असतील त्या संबंधीचा निर्णय ग्रामपंचायती स्तरावर घेतल्या जात आहे. ५० टक्के घरपट्टी, पाणीपट्टी माफ या योजनेसंदर्भात बुलढाणा तालुक्यातील रुईखेड मायंबा ग्रामपंचायतीने निर्णय काढत योजनेची अंमलबजावणी सुरू केल्याची माहिती सरपंच सुरेखा अनिल फेपाळे यांनी दिली.

राज्यातील ग्रामपंचायतीच्या थकीत करवसुलीला वेग देण्यासाठी राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ग्रामपंचायतीच्या निवासी मालमत्ता करासह (घरपट्टी), पाणीपट्टी आणि दिवाबती करावर एकरकमी भरल्यास मागील २०२४-२५ थकबाकीपैकी ५० टक्के सवलत व चालू वर्षाचा पूर्ण कर देण्याची घोषणा केली आहे. ही योजना ३१ डिसेंबरपर्यंतच लागू असणार असून सर्व जिल्हा परिषदांना सदर अंमलबजावणीचे आदेश देण्यात आले आहेत. राज्यातील अनेक ग्रा. पं. मध्ये करवसुली अपुरी असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली होती. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायती आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हाव्यात तसेच विकास कामांसाठी निधी उपलब्ध व्हावा, यासाठी ही करसवलत योजना आवश्यक राबवली जात आहे. थकीत कराची एकरकमी वसुली झाल्यास ती रक्कम थेटविकास प्रक्रियेत वापरता येणार आहे. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना या मोहिमेचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी देण्यात आली असून प्रत्येक ग्रामपंचायतीत ही योजना प्रभावीपणे राबवली जाणार आहे.



**ग्रामसेवकांवरील ताण होणार कमी**

■ हजारो रुपयांमध्ये कर असलेल्या ग्रामपंचायतींना या शासनाच्या ५० टक्के सवलतीमुळे दिलासा मिळणार आहे. तसेच करांची वसुली न झाल्यास वरिष्ठ अधिकारी कारवाई करत असल्याने ग्रामसेवकांवर मोठ्या प्रमाणात ताण येत होता. तो कमी होणार आहे. सदर निर्णयामुळे मोठ्या लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना मोठ्या प्रमाणात लाभ होणार आहे.

रुईखेड मायंबा येथील सरपंच सुरेखा अनिल फेपाळे यांच्या पुढाकारामुळे गावकऱ्यांना ५० टक्के सूटची दवंडी देऊन व बॅनर फ्लेक्स लाऊन जनजागृती करण्यात आली आहे.

### टिपू सुलतान जयंती उत्साहात

**धामणगाव बढे :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही धामणगाव बढे येथे शेर ए हिंद हजरत टिपू सुलतान यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रारंभी टिपू सुलतान चौकातील मंडपात आयोजित कार्यक्रमात मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते. चौकात स्थापित असलेल्या हजरत टिपू सुलतान यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना भावपूर्ण आदरांजली वाहण्यात आली आणि त्यांच्या शौर्याचे स्मरण करण्यात आले. यावेळी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांकडून कडेकोट सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली होती. धामणगाव बढे पोलीस स्टेशनचे ठाणेदार नागेश जायले यांनी स्वतः संपूर्ण परिसरामध्ये कडक निगराणी ठेवली, ज्यामुळे हा समारंभ शांततापूर्ण वातावरणात पार पडला. टिपू सुलतान जयंतीच्या निमित्ताने, वक्त्यांनी त्यांची वीरता, प्रशासकीय क्षमता आणि स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे योगदान याबद्दल माहिती दिली.

# अदानी ग्रुपला ई क्लास जमीन देण्यास विरोध

## डोमरूळ ग्रामस्थांचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**बुलढाणा/प्रतिनिधी**



डोमरूळ येथील ई क्लास जमीन आदानी ग्रुप कंपनीला देण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप होत आहे. तहसीलदार यांनी याबाबत निविदा काढली असून जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया देखील सुरू झाल्याची माहिती असून ही जमीन कंपनीला देण्यास ग्रामस्थांनी नकार दिला आहे. यासंदर्भातील निवेदन शिवसेना तालुकाप्रमुख गजानन धंदर यांच्यासह ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे दिले.

निवेदनात म्हटले आहे की, बुलढाणा तालुक्यातील डोमरुळ येथील गट क्र.५७ मध्ये ८ हेक्टर ८९ आर शेतजमन ई क्लास मध्ये होती. यापुर्वी सदर शेतजमिनीमध्ये अंदाजे सन १०१९ चे आसपास एम.एस. ई.बी. चे १३३ केव्हीचे केंद्र झाले आहे. तदनंतर २०नोहेंबर रोजी उर्वरीत गट क्र.५७ मध्ये हेक्टर ८९ मध्ये मोजणी साठी भुमी अभिलेख कार्यालय बुलढाणा व अदाणी ग्रुप कंपनीचे प्रतिनिधी आले होते. दरम्यान, ग्रामस्थांनी जमिन मोजणी व अधिग्रहण करण्यापासुन त्यांना रोखले. शेतजमिन अदाणी ग्रुप ऑफ कंपनीच्या ताब्यात गेल्यास आमच्या गावाला कुटल्याही प्रकारची ई-क्लासची जमिन उपलब्ध राहणार नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. सदर शेतजमिनीवर सन २०१८-१९ पासुन ५००० पेक्षा जास्त वृक्षाची लागवड ग्रामपंचायत मार्फत लागवड झालेली आहे. कंपनीचा सौर प्रकल्प सदर जमिनीवर झाल्यास वृक्ष तोड होईल, यामुळे पर्यावरणाचे नुकसान होईल. सदर जमिन गावाच्या उपयोगाची असून कंपनीला ती देऊ नये, अशी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनावर तंटामुक्ती अध्यक्ष श्रीकृष्ण रामराव पडोळ,सदस्य रवि सुगदेव जाधव, शिवसेना तालुका उपप्रमुख मयुर अनिल पडोळ,गीता तुषार धंदर, गजानन धंदर, संतोष पडोळ, किशोर पडोळ, किरण दळवी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.